
साप्ताहिक
# माणूस
१० जुलै ८२, दीड रुपया




## रविंद्रनाथांचं शांतिनिकेतन आता इतिहासजमा झालंय. आता राहिलाय
## ठोस स्वार्थी व्यवहार..

काळ राज्यात.....

वार्तापत्र ३२

'केसरी'च्या किमतीत वाढ

राज्यांत सर्वत्र दूध-पुरवठा सुरळीत : आंदोलन फसले



एशियाड

आता मुक्काम दिल्ली

Welcome Players!

# माणूस

¤

वर्ष : बाविसावे

अंक : पाचवा

१० जुलै १९८२

किंमत : दीड रुपया

¤

संपादक

श्री. ग. माजगावकर

¤

सहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

¤

वार्षिक वर्गणी

पन्नास रुपये

¤



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

¤

: पत्ता :

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ३०

दूरध्वनी : ४४३४५९

¤

मुखपृष्ठ

अनंत सालकर

¤


# आंदोलन : गरिबांचे, असंघटितांचे....

दूध उत्पादकांचे आंदोलन पहिल्याच दिवशी फसलेले होते. पाचव्या दिवशी यावर शेतकरी संघटनेचे नेते श्री. शरद जोशी यांनी शिक्कामोर्तब केले हे चांगलेच झाले. गरिबांची आंदोलने उभी करणे, या आंदोलनांना यश लाभणे तसे अवघडच असते. त्यातून हे गरीब पूर्णत: असंघटित, विखुरलेले. संघटित असूनही, व एकाच शहरात केन्द्रित असूनही, कामगारांची आंदोलने फसतात. पाच पाच महिने संप केले तरी सरकार ताठर ते ताठरच राहते, तर गावोगाव, तुरळकपणे दूध पुरवठा करणाऱ्या लहान व गरीब शेतकऱ्यांचा पराभव होणे, यात आश्चर्य ते काय ? आणि भूषण ते कोणते ? शिवाय यावेळी सर्व प्रमुख वृत्तपत्रांचा सरकारला आतून पाठिंबा. आंदोलन फसत असल्याच्या बातम्या देताना वृत्तपत्रांच्या या पाठिंब्याला कशा अगदी उकळ्या फुटत होत्या ! एकीकडे या उकळ्या आणि दुसरीकडे आपल्या किंमतीत वाढ केल्याची एका प्रमुख वृत्तपत्राची घोषणाही ! (पहा–केसरी, मंगळवार दि. ९ जून १९८२) हीच तर गंमत आहे. इतर उत्पादक आपल्या उत्पादनखर्चात वाढ झाली की, चटकन आपल्या विक्री किंमतीत वाढ करून घेतात आणि हे साहजिकही असते. पण देशातील बहुसंख्य जनता ज्या व्यवसायात गुंतलेली आहे त्या व्यावसायिकांना, लहान व मध्यम शेतकऱ्यांना मात्र, उत्पादनखर्च कितीही वाढला तरी वर्षानुवर्षे नुकसान सोसत राहून आपला व्यवसाय चालू ठेवावाच लागतो. दुधाचा उत्पादनखर्च वाढला आहे, दूध उत्पादकांची वाढीव दूध दराची मागणी योग्य आहे, असे या क्षेत्रातील सर्व तज्ज्ञांचे मत. मग हे तज्ज्ञ गुजरातेतील डॉ. कुरियन असोत की महाराष्ट्रातले श्री अण्णा साहेब शिंदे असोत. या सर्वांनी दुधाचे भाव वाढवून दिले पाहिजेत असे आंदोलन सुरू होण्यापूर्वीच सांगितले. जी वृत्तपत्रे शरद जोशींना अगदी पाण्यातच पाहतात, त्यांनीही दूध उत्पादकांच्या मागणीचा विचार व्हायला हवा, अशी थोडी समजुतीची भूमिका घेतली. ग्राहकांचा प्रश्नच नव्हता. कोल्हापूरचा अपवाद वगळता महाराष्ट्रात कुठेही ग्राहकांनी आपला विरोध एखाद्या कृतीद्वारे नोंदवल्याची घटना घडलेली नाही. सिनेमाच्या तिकिटासाठी आपण चारपाच रूपये सहज फेकतो. नाटकाचे तिकिट दहा रूपये झाले तरी चांगली नाटके आपण पाहतोच. तेव्हा ग्राहकांनी दुधाच्या भाववाढीला फारसा विरोध केला नसता. सगळ्याच वस्तुचे भाव चौपट झालेले आहेत. मग दुधासाठी दुप्पट पैसे मोजायलाही हरकत नव्हती. आजही ज्यांच्याजवळ पैसे आहेत, ते खाजगी विक्रेते लावतील तो भाव निमूटपणे देतच आहेत आणि ज्याना दूध मुळी परवडतच नाही, ते आहेत ते भाव कायम ठेवले तरी दुधाचा चहा काही पिऊ शकणार नाहीतच. शिवाय प्रत्येक ग्राहक हा दुसऱ्या बाजूने उत्पादकही असतो. उत्पादनातील अडचणींची त्यालाही थोडीफार जाणीव असते. तेव्हा दूध उत्पादकांनी अधिक नेट धरला असता, थोडे ताणून धरले असते तर ग्राहकांच्या विरोधाची असली नसलेली धारही बरीच बोथट झाली असती. असे घडले नाही, दूध उत्पादक पुरवठा रोखू शकले नाहीत. दुधाचे पैसे आले नाहीत तर मुलाची फी भरायला पैसे कुठून आणावेत अशा विवंचनेत असलेला हा बहुसंख्य वर्ग. त्यामळे आंदोलन उभेच राहिले नाही. कांदा आणि ऊस उत्पादकांचे आंदोलन उभे राहिले, काही भरीव यश या आंदोलनामुळे शेतकऱ्याच्या पदरात पडले. त्यामानाने निपाणी आंदोलनाचे यश कमी. कारण कांदा–ऊस उत्पादकापेक्षा तंबाखू उत्पादक अधिक गरीब. पण दूध उत्पादक तर तंबाखू उत्पादकापेक्षाही कमजोर. आपला माल तो एक दिवसही तसाच पाडून ठेवू शकत नाही. दूध हा नाशिवंत पदार्थ. त्यामुळे तंबाखू आदोलनाइतकाही जोर दूध आंदोलनाला चढणे शक्य नव्हते. शिवाय तंबाखू–ऊस–कांदा आदोलनाची युद्धभूमी मर्यादित. ठराविक व मोक्याच्या जागी आंदोलकांना आपली शक्ती केन्द्रित करून शासन यंत्रणेवर दबाव टाकता आला. उलट दूध उत्पादक विखुरलेला. या अडचणीत भर टाकायला वर आणखी दुष्काळाचे सावट. तेव्हा प्रतिष्ठेचा प्रश्न वगैरे न करता दूध उत्पादकांनी माघार घेतली हे योग्यच झाले. नेतृत्वाचा यात समंजसपणा दिसला व दुर्मिळ असा खिलाडूपणाही. फसलेली आदोलने वर्षा-

नुवर्षे नाही तरी व्यक्तीच्या किंवा संघटनेच्या खऱ्याखोटया प्रतिष्ठेसाठी चालवली जातात. बाद झाले तरी नेते तंबूत परत जायला तयार नसतात. खरीखोटी कारणे सांगून खेळपटचांवर रेंगाळतात. या पार्श्वभूमीवर शेतकरीनेत्यांचा खिलाडुपणा, पराभव स्वच्छ मान्य करून तंबूत परत जाण्याचा निर्णय निश्चितच उठावदारपणाचा आहे. महत्त्व शेवटी लढाईला आहे. एखादी चकमक अंगावर आली म्हणून फारसे बिघडत नाही.
□

एक बरे झाले. शेतकरी नेते फक्त श्रीमंत शेतकऱ्यांची आंदोलने करतात हा आक्षेप यापुढे थोडातरी कमी घेतला जाईल. सगळ्याच शेतीमालाला रास्त भाव मिळावे यासाठी वास्तविक शेतकरी संघटना निघाली. जी आंदोलने शक्य होती ती छेडली गेली. गरीब, असंघटित, विखुरलेल्या दूध उत्पादकांचे आंदोलन समजा सुरुवातीला छेडले गेले असते तर आज जो पराभव पाचव्या दिवशी मान्य करावा लागला, तो पाचव्या तासालाच त्या वेळी पत्करावा लागला नसता का? शेवटी ही एक दीर्घकाळ चालणारी लढाई आहे. प्रश्न अर्थव्यवस्थेचे संपूर्ण वळण बदलण्याचा आहे. सत्ता आणि संपत्ती आज शहरी संघटितांकडे आहे. मग ते संघटित मालक असोत की पुढारलेल्या कारखानदारीतले मजूर असोत. या वर्गाकडून सत्ता आणि संपत्ती खेडेगावातील गरीब व मध्यम शेतीमाल उत्पादकाकडे खेचून आणण्याची लढाई अल्पकालीन, एक टप्प्याचीच कशी असेल? कधी श्रीमंत शेतकरी लढाईत दिसतील कधी मागासलेले इतर शेतकरी विभाग हलतील. जागृती वाढते आहे की नाही, हे पाहणे महत्त्वाचे. दूध आंदोलनाने ही जागृती वाढली का? उत्तर होकारार्थी द्यावे लागेल; पण त्याचबरोबर संघटना कमकुवत व बरीच भोंगळ आहे हेही कबूल करावे लागेल. प्रथमपासूनच शेतकरीनेत्यांनी या संघटनात्मक अंगाकडे दुर्लक्ष केलेले आहे. सुरुवातीच्या काळात हे दुर्लक्ष खपून गेले, फार महागात पडले नाही. पण लढाई जसजशी पुढे जाईल तसतसे या अंगाला महत्त्व येणारच. एखादे अपयश उपकारक ठरते; पण केव्हा? जर त्याचा अन्वयार्थ नीट लावला गेला, चुकांची पुनरावृत्ती टाळली गेली तरच. गेल्या चार वर्षातील शेतकरी संघटनेचे यश तसे मोठे आहे. शेतकरी जागा निश्चत झालेला आहे; पण शेतकरी–विरोधी शक्ती व व्यवस्था फार प्रबळ आहे. त्यामुळे केवळ जागृती यापुढच्या वाटचालीला पुरी पडणार नाही. संघटनात्मक जोड द्यावीच लागणार आहे. ही जोड कशी द्यायची? संघटनेचा आकार, प्रकार कोणता ठेवायचा? या बाबींकडे आता पूर्वीपेक्षा अधिक लक्ष पुरविणे आवश्यक आहे. जागृती म्हणजे शक्ती नव्हे. जागृती झालेली आहे. शक्ती अद्याप खूप कमवायची आहे. शक्ती नसेल तर अर्थव्यवस्थेला नवीन वळण लागणार कसे? लावणार कोण?

–श्री. ग. मा.

---

## पुणेवार्ता

# मंजुश्री सारडा

## जिवंत पोस्टर्स !

सकाळी उठून उत्साहानं वर्तमानपत्र वाचावं असं हल्ली वाटतच नाही. पहिल्या पानावरच्या मथळ्यांवर नजर टाकली की, नजरेच्या टप्यात एखादी तरी खून, बलात्कार, दरोडेखोरी, फसवणुकीची बातमी येते. घटनेतला news element, संबंधित व्यक्तींचं समाजातलं स्थान आणि त्यांचे हितसंबंध लक्षात घेऊन बातम्या त्या त्या प्रमाणात highlight केल्या जातात. गुन्हेगारीच्या आरोपाच्या बातम्या आपण सकाळच्या पहिल्या चहाबरोबर 'ह्यूमन इंटरेस्ट स्टोरी' म्हणूनच वाचतो. एखाद्या मथुरा, शैलावर झालेला अन्याय इतका काही भयानक असतो की, बातमी वाचल्यावर काही तास, काही दिवस अस्वस्थ जातात. काही तरी करायला पाहिजे म्हणून थोडा वेळ मन पेटून उठतं. बस्स! इतकच! पुढे सगळं जैसे थे. शैला काय किंवा मथुरा काय, यांच्याशी माझं नातं कुठलं? म्हटलं तर कोणतंच नाही आणि म्हटलं तर खूप जवळचं. समाज जीवनाच्या सध्याच्या भन्नाट गतीत हे प्रश्न निर्माणच होऊ शकत नाहीत.

नुकताच झालेला मंजुश्री सारडाचा मृत्यू (हो, मृत्यूच कारण. खून अजून शाबित व्हायचा आहे.) ही अशीच एक खळबळ माजवणारी घटना. शैला लाटकर प्रकरण निवळतंय, तोच सारडा प्रकरण उद्भवलं. वर्तमानपत्रांनी भरपूर प्रसिद्धी केली. मंजुश्रीचे लग्नातले छान छान फोटो रोज पेपरमध्ये झळकत होते. फोटो बघून लोक म्हणत होते, 'किती गोड होती, गेली बिचारी!' 'तिच्या आई–वडिलांना काय वाटेल?' किंवा 'हा सारडा फासावर लटकला पाहिजे.' आणि अगदी परवा एकानं केलेली कॉमेंट औरच होती. म्हणाला, 'रोज सतराशेसाठ खून होताहेत, त्यात याची इतकी पब्लिसिटी करण्यासारखं काय आहे? आणि हा तर अगदीच निरुपद्रवी खून. सायनाइड दिलं आणि संपलं. काही खून डोकं वापरून इतके मस्त केलेले असतात.' इथे मात्र चमकले या चारपैकी एखादी कॉमेंट करूनच आपण थांबणार आहोत का? मंजुश्री सुखवस्तू कुटुंबातली, नवरा केमिकल इंजिनिअर, दोघंही सुशिक्षित. लाटकरची केस याला समांतरच आहे. दुसरी गोष्ट 'रोज सतराशेसाठ खून होतात, त्यात काय एवढं?' या प्रतिक्रियेची. एकीकडे भन्नाट गती आणि एकीकडे इतकी थंड उदासिनता यातला विरोधाभास गोंधळून टाकणारा आहे.

मंजुश्री प्रकरणानंतर 'स्त्री'च्या विद्याताईंना भेटले. तिथेच 'लोकविज्ञान'ची मेधा जोशी भेटली. या केसबाबत किमान निषेध नोंदवण्यासाठी तरी आपण काय करू शकतो, हेच बोलण्यासाठी तीही आली होती. मेधा म्हणाली, 'माझ्या हॉस्टेलमधल्या मुलींना; पण याबद्दल खूप चीड आहे. त्यांनाही काही तरी करावंस वाटतंय!' घरात बसणाऱ्या, अगर नोकरी करणाऱ्या मध्यमवर्गीय, मध्यवयीन बायकांबद्दलही असंच म्हणता येईल. 'स्त्री' म्हणून अशा प्रकारच्या केसमध्ये involvement ही असतेच. नव्हे असावी.

आपल्या मर्यादांमध्ये राहून या विरुद्ध नक्की काय करता येईल याचा विचार करण्यासाठी सर्वजण परत एकदा भेटलो. (जागा,– IMDR) मिटिंगला २५–३० मुलं–मुली जमली होती. विद्याताई, वसुधा सरदार, नीलम गोरे, समर नखाते हेही होतेच. या वाईट घटनेच्या पार्श्वभूमीवर

काही चांगली हालचाल करता येईल का यावर चर्चा केली. सगळ्यांच्या बोलण्यात एक मुद्दा होता तो म्हणजे स्वतः मुलींनी अशा प्रकारच्या स्त्री–अत्याचाराच्या प्रश्नांबाबत काही ठाम, उघड बांधिलकी जाणीवपूर्वक स्वीकारण्याची आज गरज आहे. हा मुद्दा जितका सहज पटतो (वैचारिक पातळीवर) तितकाच तो आचरणात आणणं अवघड. आपआपल्या चार भिंतीत बांधिलकीच्या गप्पा मारणं सोपं; पण मंजुश्रीशी उघड बांधिलकी दाखवणं सध्याच्या सामाजिक चौकटीत बायकांना अवघड वाटतं. यातूनच चालत्या–बोलत्या पोस्टरची कल्पना पुढे आली. स्त्रियांच्या प्रश्नांचं प्रातिनिधिक चित्रण करणारी पोस्टर्स हातात घेऊन मुलं अगर मुलीच 'जिवंत पोस्टर' म्हणून उभी रहातील, येणाऱ्या जाणाऱ्याशी संवाद साधतील, प्रतिक्रिया आजमावतील, शक्य झाल्यास आपल्यात सामावून घेतील. पोस्टर्सद्वारा जाणीव जागृतीचा (हा खरा वापरून गुळगुळीत झालेला शब्द; पण इथे त्याच्या खऱ्या अर्थासहित) प्रयत्न करून, अधिक संघटित होऊन समाजातल्या किडलेल्या प्रवृत्तीवर जाहीर निषेध करण्याचं नक्की झालं.

'पोस्टर कॅम्पेन' नारी मंचातर्फे सोमवार ५ जुलैपासून रविवार ११ जुलैपर्यंत शहराच्या मध्यावर्ती भागात करण्याचं ठरलं. त्यानंतरचा भाग म्हणजे कमिशनरना लेखी निवेदन पाठवणे. सारडा–प्रकरणाची योग्य न्यायालयीन चौकशी व्हावी आणि सामाजिक गुन्हेगारीला पायबंद बसवण्याच्या दृष्टिकोनातून अशा खटल्याचे निकाल लागावेत (अर्थातच आरोपीला शासन हे व्हायलाच हवं!) व संवेदनशील समाजमन निर्माण व्हावं अशा अर्थाचं एक निवेदन १५ जुलै रोजी महिला संघटनांच्या साक्षीने कमिशनरसाहेबांना देण्यात येईल.

शेवटचा मुद्दा वकिलांबाबत, न्यायालयीन संकेतानुसार जिथे उघड उघड गुन्हा दिसतो, आरोपी समोर असतो तरीदेखील गुन्हा सिद्ध होईपर्यंत वकिलाची बुद्धिमत्ता (आरोपीच्या ऐपतीप्रमाणे कमीअधिक) वापरण्याचा त्याला हक्कच आहे. खाजगी आणि सरकारी वकिलाची निष्णात (व्यावसायिक) आणि कमी निष्णात (सरकारी) अशी सहज वर्गवारी करता येते. अशा परिस्थितीत सगळी व्यवस्था तीच ठेवून फक्त वकिलानीच सामाजिक बांधिलकी वगैरे ठेवावी हे म्हणणं अवघडच आहे. श्री. सत्यरंजन साठे म्हणतात त्याप्रमाणे क्लायंट बघून फी ठरवणारे वकील न्याययंत्रणा भ्रष्ट करत असतातच [श्री. सत्यरंजन साठे यांनी ICSSR तर्फे घेतलेल्या सर्व्हेमध्ये २४३ वकिलांपैकी जवळजवळ सर्वांनी न्यायसंस्था भ्रष्ट असल्याचे सांगितले.] आणि लॉ कॉलेजमध्ये असताना बांधिलकी वगैरे मानणारा मुलगा वकील झाल्यावर त्या भ्रष्ट दुष्टचक्राचाच भाग बनतो. याविरुद्ध जाण्यासाठी आज संस्थात्मक, संघटनात्मक प्रयत्न हवेत.

तेव्हा सध्या नारी मचातर्फे सर्व वकीलमडळींना आम्ही एक आवाहन करत आहोत की, जिथे ढळढळीत गुन्हे दिसतात तिथे तरी किमान आपलं बुद्धिचातुर्य वापरून गुन्हेगाराना सोडवण्याचा खटाटोप करू नये. जमल्यास न्यायालयीन यंत्रणेचा योग्य आदर राखूनच अशा 'चॅलेंजिंग' केसेस लढवाव्यात. सर्व वकीलमंडळींनी कृपया आत्मपरीक्षण करावे आणि सामाजिक व्यवस्थेचा एक महत्वपूर्ण भाग म्हणून स्वत.ला तपासून पहावे. नाही तर अन्य मार्ग वापरून ही चळवळ पुढे नेण्याचा प्रयत्न केला जाईलच. स्त्री विषयक प्रश्नाबाबत जागरुकतेने विचार आणि कृती करणाऱ्या अधिकाधिक व्यक्तीचा सहभाग 'मंचा'ला अपेक्षित आहे.

सोमवारपासून पोस्टर-प्रदर्शनं सुरू होतील. सोमवारी – डेक्कन, मंगळवारी – व्होलगा चौक, बुधवारी–संगमचौक (बाजीराव रोड) गुरुवारी – कॉमनवेल्थ, शुक्रवारी – शनिवारवाडा, शनिवारी शिवाजीनगर आणि रविवारी– मंडई अशा प्रदर्शनाच्या जागा निश्चित झाल्या आहेत. सर्व थरातल्या लोकांपर्यंत पोचण्यासाठी 'जिवंत पोस्टर्स'ची कल्पना आज तरी उचलावीशी वाटते आहे. उद्देश एकच, तात्काळ संवाद साधता यावा, प्रतिक्रियांचं स्वरूप कळावं आणि यातूनच मंचाचं काम अधिकाधिक परिणामकारक व्हावं.

मंजुश्रीच्या नुकत्याच झालेल्या असहाय्य मृत्यूमुळे हे लिहावसं वाटलं. अशा अनेक 'मंजुश्री' तुमच्या, माझ्या घरात, आजूबाजूला वावरताहेत. या संपूर्ण असुरक्षित अवस्थेत स्वत.च्या स्वतंत्र व्यक्तिमत्त्वासाठी झगडणं आपल्याला अशक्य आहे का? मुळीच नाही. गरज आहे आपल्या संकुचित, असुरक्षित, गोडस कोषातून बाहेर येण्याची. हे अवघड आहे, पण अशक्य नाही. मोकळा श्वास घेण्यासाठी आपण हा प्रयत्न करायलाच हवा.

नारी मंचाला उत्स्फूर्त प्रतिसाद अपेक्षित आहे तो याच साठी!

— मेधा देशपांडे

मुंबई वार्ता

# माझे चित्रपट

## — श्याम बेनेगल

तसं पाहिलं तर कलेनं फक्त कलात्मक आनंद आणि करमणूक द्यावी की, लोकशिक्षणाचा भार वाहावा हा मुद्दा सनातन आणि तेव्हापासूनच वादग्रस्त ठरलेला आहे. कथा, काव्य, कादंबरी या साऱ्या वाङ्मयप्रकाराबाबतीत ही चर्चा मागच्या पिढीत खास रंगली होती आणि अजूनही रंगतेच. 'कलेसाठी कला की, जीवनासाठी कला' ऊर्फ फडके–खांडेकर वाद या नावानं ती तेव्हा प्रसिद्धीला आली. त्या प्रश्नाचं उत्तर पूर्वी सापडलेलं नव्हतं आणि पुढंही त्याचं सरळमार्गी, एकेरी उत्तर सापडेल असं वाटत नाही. खरं म्हणजे दलित साहित्याच्या निमित्तानं हा वाद पुन्हा एकदा उपस्थित होईल की काय, अशी रास्त शंका वाटत होती; पण दलित साहित्यातला एकूण विद्रोह, त्यांची जळजळीत भाषा आणि विदारक अनुभव यानंच बरीच माणसं थरारून गेलेली आहेत; पण अजूनही त्यातल्या साहित्यिक मूल्यांबाबत म्हणाव्या तितक्या तात्त्विक पातळीवर चर्चा पोचत नाही. आरोप–प्रत्यारोपातच ती अडकून रहाते आहे.

पण ही सारी प्रस्तावना कशासाठी? तर ती अशासाठी की, चाकोरीबाहेरचा अनुभव, कथावस्तु, चाकोरीबाहेरील पद्धतीनं मांडणाऱ्या चित्रपटाला मात्र ते अस्तित्वात आल्यापासून 'आर्ट फिल्म' असं नामाभिधान करण्यात येतं, आणि चित्रपटासारखं त्यामानानं नवं आणि भरपूर तडजोड करण्यासारखं माध्यम असूनही त्यांनी कलाविषयक प्रश्न उपस्थित केलेले आहेत. कलात्मक चित्रपटाविषयी होणारी चर्चा अगदी मित्र–मैत्रिणीच्यात असली, तरी कुठे तरी तात्त्विकतेला स्पर्श करते. या चित्रपटावरती रागावणारा असा जो एक वर्ग आहे तोच खूप मोठा आहे. आपली भूमिका मांडताना हा वर्ग असे काही मुद्दे मांडतो की, पाहिजे कुणाला ती डोकेदुखी? आपल्याला बुवा पिक्चरमधून टाइम पास हवा आणि हवी

दोन घटकांची करमणूक. असं म्हणताना ते या माध्यमाकडे फक्त रंजनात्मक दृष्टिकोनातूनच पहात असतात आणि याची जाण अशा चित्रपटाचे निर्माते, दिग्दर्शक श्याम बेनेगल याना पुरेपूर झालेली दिसते.

त्यांना आपली ही भूमिका मांडायला नुकतंच 'इंडियन मर्चण्टस् चेम्बर 'नं बोलवलं होतं. विषयही रोखठोकपणे ' माझे चित्रपट' असाच दिलेला होता आणि बेनेगलनी आपलं भाषण अशा एका मुद्द्यापाशी येऊन थांबवलं की, शीर्षकातल्या प्रश्नाचं उत्तर त्यात आडवळणानं आणि चतुराईनं आलं ! त्यानी ' माझे चित्रपट ' काय आहेत, हे सांगण्याऐवजी काय नाहीत, हेच अधिक सागितलं. म्हणजे त्यांनी पूर्णपणे व्यावसायिक असलेल्या चित्रपटाना ' मदबुद्धी ' म्हटलं ! कारण या चित्रपटातल्या प्रसंगांची गुफण, असलीच चुकून–माकून तर कथेतली समस्या, हे सारं समजायला तुमचं वय साधारण नऊ-दहा असलं तरी पुष्कळ झालं ! त्यानंतर येणाऱ्या आणि होत जाणाऱ्या परिपक्व बुद्धीला आव्हानात्मक असं काही त्यात सापडणारच नाही ! – असं म्हणत, माझ्या चित्रपटात ते सापडेल अशी अप्रत्यक्षरीत्या ग्वाही दिली.

पण बेनेगल इथेच थाबले नाहीत, हे महत्त्वाचं. त्याना केवळ आपल्याच चित्रपटाचा नव्हे तर व्यावसायिक चित्रपटाचा अन्वयार्थ लावून पहायचा आहे. त्यांच्या मते सर्व रसाचा परिपोष करते ती श्रेष्ठ कलाकृती अशी भारतीयाची सौदर्यदृष्टी सागते; पण यामुळेच नृत्य (यात भरतनाटयम्पासून डिस्कोपर्यंत सर्वांचा अंतर्भाव करायला हवा) आणि धडाधड हाणलेले संवाद आणि गीताचा मारा यामधून कारुण्य म्हणजे विधवा आई, बहीण इत्यादी दुय्यम अनाथ अबलांची पांढऱ्या साडीतली रडारड, श्रृगारासाठी देशोदेशींच्या बागेतली पकडापकडी, वीररसासाठी एकटया नायकानं पिंप ठेवलेल्या गोदामात नाही तर बरंच काचसामान असलेल्या हॉटेलात तमाम शत्रुसैन्याशी केलेली मारामारी. हास्य आणि बीभत्स याची गठडी बहुतेक एकत्रच वळण्यात येते ! एकूण काय बेनेगल याच्या मते ही बिर्याणी आहे. ते याचाही शोध घेऊ इच्छितात.

भारतीय चित्रपटाचा इतिहास पाहिला, तर त्याचं मूळ अर्थातच १९ व्या शतकाच्या अखेरच्या ब्रिटिश रगभूमीतच सापडेल. तत्कालीन रंगभूमी तेव्हा आधिक्यानं मेलोड्रामाचेच प्रकार करत असे, तेव्हापासूनच मेलोड्रामाचा सूर जो लागला त्याचे साद आणि प्रतिसाद अजून काही विरलेले नाहीत. सगळ्या रसाचा परिपोष होतो खरा; पण तरीही या चित्रपटांत मला रस वाटत नाही. माझ्या मते मला जे सागायचं आहे, ते असल्या चित्रपटातनं मला कधीच सागता येणार नाही. मला जाणवणारी सामाजिक परिस्थिती व्यक्त करायला या रुळलेल्या वाटा कामाच्या नाहीत. मला नव्या वाटाच शोधल्या पाहिजेत. या नव्या वाटा यशस्वी होतीलच असं नाही; पण तो प्रयत्न जरूर असेल.

भाषणानंतर बेनेगलना काही प्रश्न विचारण्यात आले. त्यातल्या काही प्रश्नांचा उल्लेख इथं करायला हवा. उदाहरणार्थ–एकानं विचारलं–तुमचा चित्रपट समजा पडला, तर तुम्ही काय करता ? त्याचं उत्तर एकदम प्रामाणिक–साधारणत: महिनाभर शरमेन तोंड खाली असतं आणि लोकात मिसळत नाही; पण अजून तरी प्रत्येक वेळी त्यातून सावरलो आहे. यावर उपप्रश्न असा–म्हणजे काय केलंत ? त्यांच उत्तर अतिशयच नेमक होतं–मला जाणवलेला अनुभव, कथावस्तु, मला आव्हानात्मक वाटली; पण त्यामागची कारणं ही व्यक्तिगत स्वरूपाची असतील. असा खाजगी अनुभव सार्वत्रिक पातळीवर रुचेल, पटेल, समजेल अस नाही. तेव्हा मी शहाणा होऊन पुढच्या वेळी कथावस्तुकडे अधिक डोळस वस्तुनिष्ठपणे पहाण्याचा यत्न करतो.

व्यावसायिक चित्रपटात रुळलेल्या वाटा म्हणजे तरी काय ? आई–मुलगा, बाप–लेक, भाऊ–बहीण आणि पती–पत्नी याच्या सबधाचा एक घट्ट ओतीव साचा आहे. या साच्याबाहेरचे कोणतेही संबध दाखवले जात नाहीत. प्रत्यक्ष जीवनातही इतका साचेवदपणा असत नाही. तसच भूमिकाच्या बाबतीत त्यांच्या प्रतीही मूळ नमुन्याबरहुकुम तयार होत असतात. सर्वसाधारणपणे तीन प्रकारच्या भूमिका असतात–१) चागला माणूस–बहुतेक वेळी नायक आणि नायिका. जोडीला त्याची माँ और डॅडी या अंकल–हेही ठरलेलंच. २) वाईट माणूस–तसा हा वाईट नसतोच मुळी ! त्यानं फक्त वाईटपणाचा बुरखा घेतलेला असतो. हा रोल कुणाचा ? बहुधा नायक–नायिकेची फाटाफूट करणारी खलनायिका सावत्र आई, कॅब्रडान्सर इत्यादी. ह्या माणसाचा गाभा फणसासारखा आतून गोड असल्यानं चित्रपटाच्या शेवटी त्याना सुधारण्याची आणि माफी मागण्याची संधी दिली जाते. ३) दुष्ट माणूस–या मंडळीना अनेकदा लहान मुलापासून ते बुढी माँ पर्यंत सगळ्याचा छळ करण्याचं कत्राट धाऊक दिलेलं असतं. ह्यांच्यात बुरखापद्धती नसल्यामुळ आणि ते खरेच दुष्ट असल्याचं ठरवल्यामुळं त्याचा नायनाट करण्यात येतो....किंवा नवीन पद्धतीप्रमाणे शिटी वाजवत सरतेशेवटी येणाऱ्या ' कोई भी अपनी जगासे न हिले ' वाल्या पोलिसाच्या हवाली त्याला केलं जातं. ही असली पात्रं मला नकोत. मला बदललेल्या समाजपरिस्थितीत हेच सगळे सबंध पुन्हा तपासून पहायचे आहेत. चागले, वाईट आणि दुष्ट हे गुण दाखवण्याकरता मला तीन पृथक् माणसं नकोत. एकाच भूमिकेत हे सगळं असू शकतं. केवळ मानवी सबधाचंच नाही, काळ इतका झपाटयानं बदलला आहे की, युगाचीही व्याख्या परत करावीशी वाटते. आपल्याला अनुभवाला येणारं सुष्ट-दुष्ट माणसाचं हे कलियुग महाभारताच्या चिरतन काव्याच्या आधारे शोधायचय. ' कलयुग ' या माझ्या चित्रपटातल्या भूमिकेत कलियुगाच्या पार्श्वभूमीवर बदललेले माणसा–माणसातले सबध काय असू शकतात, की ते अजूनही ५००० वर्षांपूर्वी कौरव–पाडव जसे भाडले तसे भाडतात हा प्रश्न उपस्थित केला आहे. असे प्रश्न जर माडायचे असतील, तर त्यांच्यात नवरसाचा परिपोष करण्याची धडपड मी चित्रपटाच्या आउट ऑफ द वे जाऊन करणार नाही.

यावर एक असा प्रश्न आला की, तुमच्या चित्रपटातल्या नायिका या स्त्री–मुक्तीबाबत उदासीन वाटतात. असं का ? ही बदललेली परिस्थिती नाही काय ? बेनेगल म्हणतात–परिस्थिती बदलली आहे यात शंकाच नाही; पण त्यामुळे मी माझ्या स्त्रीपात्राना ओढूनताणून स्त्री–मुक्तीविषयक व्याख्यान झोडायला लावायच, हे त्या भूमिकेच्या स्वरूपाला पटण्यासारखं असेल, तरच ते मी दाखवीन. तरीही मला वाटतं की, माझ्या चित्रपटातली स्त्रीपात्रं शहरी असतील तेव्हा स्त्री–मुक्तीविषयी भाष्यं करणार नाहीत, तर प्रत्यक्षात आणून दाखवतील.

बेनेगलाचं हे भाषण कलात्मक आणि व्यापारी चित्रपटांवर प्रकाश टाकणारं तर होतच; पण व्यापारी चित्रपटाची त्यांनी उडवलेली टोपी पहाणं हे कुठलाही तसा चित्रपट बघण्याहून अधिक मनोरजक होतं !

—ललिता बर्वे

**परराष्ट्र**

# समान हक्क
## अमेरिकन महिलांचा लढा

वा. दा. रानडे

**स्त्री**–पुरुष समान हक्कांची हमी घटनेनेच द्यावी यासाठी अमेरिकन महिलांनी गेली दहा वर्षे चालविलेल्या लढ्यात त्यांना हार खावी लागली आहे. 'अमेरिकन संघराज्यात किंवा त्याच्या कोणत्याही राज्यात स्त्री–पुरुषांना समान हक्क कायद्याने नाकारता येणार नाहीत किंवा त्यांचा संकोचही केला जाणार नाही.' अमेरिकन घटनेत ही विसावी दुरुस्ती समाविष्ट करण्यात यावी यासाठी अमेरिकन महिला गेली अनेक वर्षे आंदोलन करीत आहेत. दहा वर्षांपूर्वी काँग्रेसच्या दोन्ही सभागृहांनी मोठ्या बहुमताने ही दुरुस्ती मंजूर केली. अमेरिकन घटनेप्रमाणे ही दुरुस्ती घटनेचा भाग बनविण्यासाठी तिला काँग्रेसेच्या मंजुरीशिवाय ३८ राज्यांची मंजुरीही मिळायला हवी. ती मिळण्यात काही अडचणी येतील असे वाटत नव्हते. पहिल्याच वर्षी बावीस राज्यांनी या दुरुस्तीस संमती दिली. १९७७ पर्यंत ३५ राज्यांनी संमती दिली. त्यानंतर मात्र एकाही राज्याने ही दुरुस्ती चर्चेसाठी घेतली नाही. या घटनादुरुस्तीबाबत निर्णय घेण्यासाठी राज्यांना ३० जून १९८२ पर्यंत मुदत दिलेली होती. आवश्यक तेवढ्या ३८ राज्यांची संमती न मिळाल्याने ही दुरुस्ती अखेर बारगळली. मध्यंतरीच्या काळात पाच राज्यांनी घेतलेला निर्णय फिरविला आणि घटनादुरुस्तीत दिलेली संमति काढून घेणारे ठराव पास केले. असे करता येते का असा घटनात्मक वाद त्यातून निर्माण झाला असून अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयापर्यंत तो प्रश्न गेला आहे.

राज्यांकडून आवश्यक तेवढा अनुकूल प्रतिसाद मिळाला नसला तरी अमेरिकन लोकमताचा वाढता पाठिंबा या दुरुस्तीस मिळाला आहे असे जनमतकौलाचे निर्णयावरून दिसते. १९७५ पासून दरवर्षी या दुरुस्तीच्या बाजूने ५९ टक्के नागरिक पाठिंबा दर्शवीत होते. या उन्हाळ्यात घेतलेल्या जनमताच्या कौलात हे प्रमाण चार टक्क्यांनी वाढून ६३ टक्क्यांपर्यंत गेले आहे. अध्यक्ष रेगन व त्यांच्या रिपब्लिक पक्षाचा या दुरुस्तीला विरोध असल्याने त्या पक्षास महिलांचा पाठिंबा कमी होत आहे. अध्यक्षीय निवडणुकीत रेगन यांना मिळालेल्या मतांची स्त्री-पुरुष विभागणी करता असे दिसून आले. स्त्री–पुरुषांपेक्षा स्त्रियांची मते आठ टक्के कमी आहेत.

'नॅशनल ऑर्गनायझेशन फॉर विमेन' या अमेरिकन महिलांच्या संघटनेने गेल्या डिसेंबरात या मागणीसाठी निर्णायक मोहीम करण्याचे ठरवून निधी उभारला. महिन्याला तेरा लाख डॉलरप्रमाणे दोन महिन्यांत एवढा निधी जमला की अमेरिकन डेमोक्रॅटिक पक्ष सबंध वर्षात एवढा निधी उभारू शकला नसता. या मागणीबद्दलची आपली तीव्र भावना व्यक्त करण्यासाठी इलिनोइस राज्यात सहा महिलांनी विधिमंडळापुढे अन्नसत्याग्रह केला; पण त्याचा उपयोग झाला नाही.

अमेरिकन महिलांच्या या आंदोलनासंबंधात एक प्रश्न असा उपस्थित केला जात आहे की, या आंदोलनाची आवश्यकता आहे का? अमेरिकन समजात आज प्रत्यक्षात स्त्री–पुरुष, समान हक्क आहेतच; मग घटनेने हमी द्यावी अशी मागणी कशासाठी? घटनात्मक हमी ही मुख्यत: प्रतीकात्मक स्वरूपाची आहे; पण एक परिणाम किंवा निकष म्हणूनही त्याला महत्त्व आहे. आतापर्यंतचे कायदे तसेच यापुढे होणारे कायदे या निकषावर पारखून त्यात स्त्री–पुरुष भेदभाव कोठे केलेला नाही ना हे तपासून पाहता येईल. अमेरिकेच्या संघराज्य सरकारने केलेले ८०० कायदे स्त्री–पुरुषांच्या बाबतीत भेदभाव करणारे आहेत असे १९७७ मध्ये केलेल्या एका अभ्यासात आढळून आले. मॅसॅच्युसेट्स राज्याने १९७६ मध्ये स्त्री–पुरुष समान हक्काची ही घटनादुरुस्ती आपल्या घटनेत समाविष्ट केली.

त्यानंतर विधिमंडळाने राज्याच्या कायद्यांची या निकषावर तपासणी सुरू केली. विवाह, ज्यूरीची कर्तव्ये, मरणोत्तर सवलती, कामगारांना संरक्षण वगैरेसंबंधी कायद्यांत स्त्री–पुरुषांना समान न लेखता भेदभाव केला असल्याचे आढळून आले. हा भेदभाव रद्द करून हे कायदे दुरुस्त करण्यास विधिमंडळास चार वर्षे लागली. घटनेत समान हक्कांची हमी नसेल तर अनेक कायद्यांत स्त्री–पुरुषांबाबत ज्या भेदभावाच्या तरतुदी आहेत त्या कायम राहतील असा युक्तिवाद या घटनादुरुस्तीचा पुरस्कार करणाऱ्या महिला मांडतात. घटनेची हमी नसेल तर कायदादुरुस्तीची ही प्रक्रिया फारच रेंगाळेल, असे त्यांना वाटते.

अमेरिकन घटनेतील चौदाव्या दुरुस्तीने स्त्री–पुरुषांना कायद्याचे समान संरक्षण दिलेले आहे. त्यातून स्त्रियांना समान हक्क मिळालेलेच आहेत. मग आणखी ही दुरुस्ती अनावश्यक आहे असाही एक युक्तिवाद केला जातो; पण तेथील सर्वोच्च न्यायालयाने यासंबधांत दिलेले निर्णय लक्षात घेता स्त्रियांना समान हक्क मिळण्यास आणि कायद्यात या दृष्टीने असलेल्या त्रुटी दूर होण्यास चौदावी दुरुस्ती पुरेशी आहे असे अमेरिकन महिलांना वाटत नाही म्हणून त्यांना ही नि:संदिग्ध घटनादुरुस्ती हवी आहे. सध्या अपयश आले असले तरी त्यामुळे नाउमेद न होता हा लढा पुढे चालू ठेवण्याचा आणि ही घटनादुरुस्ती काँग्रेसमध्ये पुन: मांडण्याचा निर्धार काही महिलाकार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे. मतदानाचा हक्क मिळविण्यासाठी अमेरिकन महिलांना ७८ वर्षे लढावे लागले. स्त्री-पुरुष समान हक्कांची हमी घटनेने मिळविण्यासाठी एवढा दीर्घकालीन लढा द्यावा लागेल असे त्यांना वाटत नाही.

अध्यक्ष रेगन आणि रिपब्लिकन पक्ष यांचा या घटनादुरुस्तीस तर विरोध आहेच; पण स्त्री–पुरुष भेदभावविरोधी काही कायद्यातील सध्याच्या तरतुदींची व्याप्ति कमी करण्याचे त्यांचे प्रयत्न आहेत. शिक्षणविषयक कायद्यात 'टायटल नाइन' या दुरुस्तीने संघराज्याची मदत मिळणाऱ्या शिक्षणसंस्थांत स्त्री–पुरुष भेदभाव करण्यास बंदी केलेली आहे. सर्व विद्यापीठांना आणि शाळांना हा कायदा लागू न करता संघराज्याचे अनुदान मिळणाऱ्या शिक्षणसंस्थांपुरताच तो मर्यादित करावा अशी दुरुस्ती रेगन सरकार करू पहात आहे. स्त्रियांचे खेळ वगैरेसाठी मिळणाऱ्या मदतीत त्यामुळे कपात होईल. घटनेनेच स्त्री–पुरुष समान हक्काची हमी दिल्यावर सरकारला असे करता येणार नाही.

प्रत्येक कायद्याची छाननी करून भेदभाव करणाऱ्या तरतुदी आम्ही रद्द करू असे आश्वासन रेगन यांनी दिले होते. राज्यांच्या कायद्यांचा विचार करण्यासाठी त्यांनी नेमलेल्या अभ्यासगटाची बैठक फक्त गेल्या वर्षी एकदा भरली. त्यानंतर झालीच नाही आणि संघराज्याच्या कायद्याची छाननी करण्यासाठी नेमलेल्या समितीची तर अजून बैठकही बोलावण्यात आलेली नाही. ही दिरंगाई थांबविण्याचा एकच मार्ग म्हणजे स्त्री–पुरुष समान हक्कांची घटनात्मक हमी ही मागणी मिळविण्यात अमेरिकन महिला आज पराभूत झाल्या असल्या तरी लोकमताच्या वाढत्या दडपणापुढे ती फार काळ नाकारता येणार नाही. □

## आपण क्रिडाप्रेमी

# एशियाड-दिल्ली

## खेळा, खूप खेळा !
## पण असूया, चीड, राग या दुर्गुणांना लांब ठेवून....

नवव्या आशियाई स्पर्धांच्या वातम्या वृत्तपत्रे, रेडिओ, टी. व्ही. सारख्या संवाद-माध्यमातून इतक्या काही गाजताहेत की, प्रत्यक्ष नोव्हेंबर महिना उजाडेपर्यंत संयोजकाच्या चष्म्यातून 'सगळं ठीक होईल ना', या काळजीनं तुमच्या-माझ्यासारखे जातिवंत Host जरा अस्वस्थ झालेत. 'एशियाड'-१९८२ चे सामने दिल्लीत १९ नोव्हेंबर ते ४ डिसेंबरपर्यंत आयोजित केले आहेत. यजमानपदाचा गौरवशाली मान मिळालेल्या भारत देशाला यावर कितीही अफाट खर्च करावा लागला (अंदाजे रक्कम सातशे कोटी) तरी तो करावाच लागणार आहे. प्रश्न प्रतिष्ठेचा आहे. पाच वर्षांपूर्वी घेण्यात आलेल्या निर्णयानुसार ठरलेल्या वेळी, ठरल्या ठिकाणी, अत्याधुनिक सुखसोयींसह क्रीडा-स्पर्धा ठरल्याप्रमाणे भारत भरवू शकतो याची ही कसोटी आणि कोणत्याही भारतीयाने काळजीपूर्वक लक्ष घालावे अशी ही घटना !

आशियाई क्रीडास्पर्धांची सुरुवात झाली १९५१ मध्ये. 'ऑलिंपिक्स' स्पर्धांच्या धर्तीवर आशिया खंडातील देशांच्या क्रीडा-स्पर्धा भरवाव्यात आणि नव्याने स्वातंत्र्य प्राप्त झालेल्या देशांतील जनसमूहात विश्व-बंधुत्व, विश्वास आणि विज्ञानाद्वारे प्रगती साधण्याची ईर्षा निर्माण व्हावी या उद्देशाने स्वर्गीय पं. नेहरूंच्या पुढाकाराने आशियाई स्पर्धांची सुरुवात झाली. ४ मार्च १९५१ रोजी राष्ट्रपती स्व. डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी दिल्लीतील नॅशनल स्टेडियमवर तुताऱ्यांच्या निनादात आणि तोफांच्या सलामीने हजारो उत्साही प्रेक्षकांच्या साक्षीने आशियाई क्रीडास्पर्धांचं उद्घाटन केलं होतं. शांती आणि सद्भावनेचं प्रतीक म्हणून हजारो कबुतरं त्या दिवशी निळ्या आकाशात सोडली होती. बारा स्पर्धक-देशांचे ध्वज डौलात फडकत होते. पं. जवाहरलाल नेहरू खेळ पहाण्यासाठी जवळजवळ दररोज नॅशनल स्टेडियमवर येत होते. सूर्यकिरणांनी प्रज्वलित केलेली क्रीडाज्योत सतत आठ दिवस स्टेडियमवर तेवत होती. त्या वेळी पंडितजी म्हणाले होते, 'खेळा, खूप खेळा ! पण असूया, चीड, राग या दुर्गुणांना लांब ठेवून खऱ्या खिलाडू वृत्तीनं खेळा !'

पहिल्या क्रीडामहोत्सवात अफगाणिस्तान, बर्मा, सिलोन, इंडोनेशिया, इराण, जपान, नेपाळ, फिलिपाइन्स, सिंगापूर, थायलंड, व्हिएटनाम यांनी भाग घेतला. यजमान देशाचा भारत संघ अर्थातच होता. स्पर्धेत जपान पहिल्या क्रमांकावर, भारत दुसऱ्या क्रमांकावर आणि इराण तिसऱ्या क्रमांकावर होता. पांढऱ्याशुभ्र पार्श्वभूमीवर पूर्ण तेजाने तळपणारा सूर्य व आशियाई क्रीडासंघटनेचे बोधवाक्य 'Ever onwords' (आगे बढो!) आणि त्याखाली अकरा तारे असलेला क्रीडाध्वज या नवव्या आशियाई स्पर्धांच्या निमित्ताने पुन्हा एकदा भारतात फडकणार आहे !

आशियाई स्पर्धांचं आयोजन करण्याचा हा गौरवशाली मान आपल्याला मिळावा या हेतूने सर्व राष्ट्रं अहमहमिकेनं प्रयत्न करताना दिसतात. ४ मार्च ते ११ मार्च १९५१ दरम्यान झालेल्या पहिल्या आशियाई क्रीडास्पर्धेनंतर १९५४ साली मनिला, १९५८ साली टोकिओ, १९६८ मध्ये जाकर्ता, १९६६, १९७० आणि १९७८ अशा तीन वेळा या स्पर्धांचं यजमानपद मिळवण्याचा मान बँकॉकनं पटकावला. १९७४ मध्ये हाच मान तेहरानला मिळाला होता. क्रीडामहोत्सवाच्या वाटचालीतले हे मैलाचे दगड. १९५१ नंतर तब्बल तीस वर्षांनी हा मान पुन्हा एकदा भारताकडे आला आहे.

१९६२ पर्यंत पाकिस्तानने या स्पर्धांना मान्यता दर्शवली नव्हती; पण जकार्ता (१९६२) व बँकॉक (१९६६) स्पर्धेपासून मात्र हे चित्र बदललं आणि आता नवव्या स्पर्धेत तर सुमारे तीस देश सामील होत आहेत. चीन, जपान, कोरिया, हाँगकाँग, इराण, कुवेत, पाकिस्तान, ब्रह्मदेश, मंगोलिआ, सौदी अरेबिआ, सीरिया, दुबई, लाओस, व्हिएटनाम, सिंगापूर या देशांना अधिकृत आमंत्रणं कधीच रवाना झाली आहेत.

दिल्ली 'एशियाड'-८२ चे मानचिन्ह (MASCOT) आहे एक पाय उंचावून, सोंड वेळावून आनंदाने नाचणारा 'अप्पू'. भारतीय गजराज बुद्धिमान, ताकदवान आणि चपळ समजले जातात. गजराजाच्या उत्साही, खेळकर बछड्याची 'अप्पू' म्हणजे दुर्लभ प्रतिमा आणि कपाळावर तळपता सूर्य आहेच. साऱ्या जगभर हे प्रतीक भारतीय आहे हे सांगण्याची गरजच नाही. ऑलिंपिक्सच्या धर्तीवर मूळ 'बोधचिन्ह' सर्वत्र एक ठेवून ज्या देशात स्पर्धा आयोजित केल्या जातात त्या देशाने आपल्या आवडी-प्रमाणे 'मानचिन्ह' ठरवण्याची पद्धत आहे. एशियाड-८२ ची निशाणी आहे-'जंतर-मंतर'. जंतरमंतर म्हणजे सोळाव्या शतकात तयार झालेला भारतीय स्थापत्यशास्त्राचा

अत्यंत कल्पक नमुना. भारताच्या प्रगतीचे हे खरेखुरे प्रतीक. सूर्याचा प्रदेश सूचित करणारा सूर्यतारा त्यावर आहेच.

आशियाई स्पर्धांचे आयोजन दोन संस्थांच्या सहयोगाने करण्यात येणार आहे. भारत सरकारने मंत्रिमंडळाच्या बैठकीत या स्पर्धांचे नियंत्रण, संयोजन आणि व्यवस्थापन करण्यासाठी खास ठरावही केला असून त्याची सर्व सूत्रं शिक्षणमंत्र्यांकडे सोपवली आहेत. सूत्र-संचालन आणि खास व्यवस्थापन अशी दोन समित्यांची प्रथम रचना करून त्यांच्याकडे खेळ, निवास, देशी-परदेशी खेळाडूंचे प्रशिक्षण, . मैदाने-इमारती, रस्ते यांचे बांधकाम, प्रसिद्धी, प्रवेश-पत्रिकांची विक्री आणि व्यवस्थापन या बाबी सोपवल्या आहेत.

या दोन प्रमुख समित्यांच्या अंतर्गत आणखी तीसच्या वर इतर उपसमित्या आहेतच. या दोन समित्यांचे प्रमुख श्री. बुटासिंग असून उपप्रमुख श्री. राजा भालिंदरसिंग आहेत. दिल्ली नगरपालिका, दिल्ली नगर प्राधिकरण, अखिल भारतीय ऑलिंपिक कमिटी (IOC), भारत सरकारची परराष्ट्र, औद्योगिक, बांधकाम, मजूर, दळण-वळण इत्यादि मंत्रालयांच्या सहकार्याने समितीचे कामकाज चालते.

समित्यांमध्ये २२७ व्यक्तींचा समावेश असून त्यात भारतातील खेळाडू, त्यांच्या देशातील संस्था, खेळांबद्दल लिहिणारे पत्रकार, लेखक, सामाजिक संस्था-चालक, उद्योगपती ही मंडळी आहेत. संचालक मंडळाचे ३३ सभासद असून, त्यांत सर्वश्री आर. एन. मिर्ठा, चरणजितसिंग यांसारखे लोकसभा-सदस्य असून कुमुदबेन जोशी, बुटासिंग, कृष्ण राव आणि उमरावसिंग असे लष्करी अधिकारी आहेत. विश्वविख्यात क्रीडासंयोजक जी डी. सोंधी यांच्या खास देखरेखीखाली मैदाने आणि अंतर्गत क्रीडामंदिराचे बांधकाम करण्यात आले आहे. जून महिन्याच्या शेवटी स्पर्धांच्या प्रथम चरणाची समाप्ती होईल तर ऑक्टोबरपर्यंत स्पर्धांची पूर्ण तयारी झालेली असेल.

### कबड्डीचे भाग्य

एशियाड – ८२ च वैशिष्ट्य म्हणजे भारतात राष्ट्रीय खेळ 'कबड्डी' आणि मलेशियाचा सेपक-टकराव (Sepak-Tak-raw) हे खेळ या वेळी प्रदर्शनीय क्रीडाविभागात खेळले जाणार आहेत. 'कबड्डी' खेळासाठी गेल्या वर्षी जपानने खास आमंत्रण देऊन भारतातून एक प्रवीण खेळाडूपथक नेलं होतं आणि तिथे साठ स्वतंत्र सामने आयोजित करून सर्वांना आश्चर्याचा सुखद धक्का दिला होता. या दोन खेळांकडे सध्या क्रीडा-रसिकाचे लक्ष आहे.

सुमारे २५ क्रीडाप्रकारात भाग घेणाऱ्या खेळाडूंची तयारी तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली वेग घेत असतानाच एशियाडनगरीचे बांधकाम युद्धपातळीवर सतत चाललं आहे. एशियाडनगरीची रचना एखाद्या टुमदार खेड्याप्रमाणे केली आहे; पण बांधकाम आणि सुविधा इतक्या अत्याधुनिक आहेत की, या एशियाडनगरीला आधुनिक युगातलं 'मिनी शहर' म्हणायला हरकत नसावी. या Sports Village मध्ये मिनि-हॉस्पिटल आहे. करमणुकीसाठी एक पूर्ण सांस्कृतिक केन्द्र आहे. २५०० लोक एकत्र बसू शकतील असं भव्य ऑडिटोरियम बांधण्यात येत आहे. उच्च प्रतीची मल्टीचॅनेल व्यवस्था फिलिप्सने खास परिश्रम घेऊन तयार केली आहे. प्रेक्षागृहाची रचना अशी आहे की, नृत्य, नाट्य, कला यांच्या कोणत्याही आविष्काराला पुरेपूर न्याय दिला जाईल. सगळ्यात महत्त्वाची ती रेस्टॉरंटस्. २५०० लोक एकत्र बसू शकतील असा अतिभव्य 'डायनिंग-हॉल' या खेड्यात बांधला आहे. थोडक्यात काय, एशियाडनगरी म्हणजे परदेशी पाहुण्यांसाठी तयार केलेलं 'Home away from home' आहे.

एशियाडनगरीतली खेळाडूंची व्यवस्था अशी काही आहे की बस्स! इन्डोअर स्वीमिंग पूल, इन्डोअर स्टेडियम, मेन स्टेडियम, खेळाडूंसाठी तीन हजार खोल्या, सुमारे तीन हजार खेळाडूंसाठी स्वतंत्र डायनिंग-हॉल. या प्रकारच्या बांधकामाचं आधुनिकीकरण, वातानुकूलीकरण करण्यासाठी इलेक्ट्रॉनिक्स उपकरणे आहेतच. याशिवाय खेळाडूंसाठी सर्व प्रकारच्या सोयी, सुविधा, अत्याधुनिक क्रीडासाधनं; वाहतुकीसाठी नवे रस्ते, वीज, पाणी, नवे फ्लाय ओव्हर ब्रिज, रिंग रेल्वे, कार-पार्किंगसाठी भुयारी जागा इत्यादि सुखसोयी निर्माण होत आहेत. हिंदी आणि इंग्रजीतून क्रीडाविषयक माहिती देणारा ३ मजल्याएवढा उंच गुणफलक ८५ लाख रुपये किंमत देऊन हंगेरीहून मागविण्यात आला आहे. व्हॉलीबॉल, फुटबॉल, हँडबॉल-इत्यादि खेळांसाठी लागणारे साहित्य निकामा ही जपानी कंपनी विनामूल्य पुरवणार आहे. सिको ही दुसरी जपानी कंपनी इलेक्ट्रॉनिक्स गुणफलक व इतर साहित्य देणार आहे.

### उद्घाटन–पं. रविशंकर

या भव्य सोहळ्याचं उद्घाटनही तसंच भव्य होणार! उद्घाटनाची जबाबदारी आंतरराष्ट्रीय कीर्तीचे कलाकार पं. रविशंकर यांच्यावर टाकली आहे. जूनच्या मध्यापासून आपल्या सुमारे दीडशे सहकाऱ्यांच्या मदतीने पंडितजींनी तयारीला सुरुवातही केली आहे. त्यांच्या दिमतीला लष्कर, पोलीस व सीमा सुरक्षा दलातील बॅंडची आठ पथकं सूर आणि नृत्यमानवंदनेच्या कार्यक्रमासाठी देण्यात आली आहेत. पंडितजींना या कार्यक्रमासाठी सर्वश्री विजय राघव राव, अशित देसाई; अप्पूनी करथा, पंडित नरेंद्र शर्मा, आनंद शंकर (मुलगा) आणि सौ. तनुश्री शंकर (पत्नी) सहकार्य करणार आहेत. याशिवाय वादक, नर्तक, मंचव्यवस्था इत्यादीसाठी शेकडोंचा सहभाग आहे.

एशियाड ८२ मध्ये प्रथमच स्पर्धेच्या रात्री निरनिराळ्या स्पर्धक-देशांतील सांस्कृतिक पथके मनोरंजनाचा कार्यक्रम सादर करणार आहेत. चीन, जपान, पाकिस्तान यांसारख्या देशांतून खेळाडूंच्यासह या सांस्कृतिक कला-कार्यक्रमासाठी शेकडो लोक येतील असा अंदाज आहे.

एशियाडचा शेवटचा महत्त्वाचा भाग म्हणजे प्रवेशपत्रिका! तिकिटांचे दोन प्रमुख भाग पाडण्यात आले आहेत. 'श्रीमंत देणगीदार सदस्यांसाठी' आणि सर्वसाधारण क्रीडाप्रेमींसाठी. देणगीदारांच्या तिकिटांचं प्रवेशमूल्य सुमारे १०,०००, ५,०००, २,०००, १,००० असं आहे. सामान्य वर्गासाठी मात्र दैनंदिन प्रवेशपत्रिका आहेत. तिकिटाची रक्कमही परवडू शकेल अशी प्रतिदिनी १५-५-३ अशी आहे खेळाच्या प्रकारानुसार काही ठिकाणी तिकिटाची रक्कम बदलती आहे. तिकीट-खरेदी-विक्री-

पृष्ठ २६ वर

## कामगार वृत्त

# भारत पेट्रोलियम

### राष्ट्रीयीकरण झाले असूनही....

मुंबईतील तुर्भे येथील भारत पेट्रोलिअम कार्पोरेशनच्या कामगरांनी व्यवस्थापना-विरुद्ध पाच महिने मुदतीचा दीर्घ लढा देऊन शेवटी अंशत: यश मिळविले आहे.

पूर्वीच्या बर्मा शेल कंपनीचे १९७५ साली राष्ट्रीयीकरण झाल्यानंतर या कंपनीला हे नाव मिळाले. या कंपनीत १९७७ पर्यंत राजा कुलकर्णी यांची इंटकप्रणीत पेट्रोलिअम एम्प्लॉईज युनियन कामगारांचे नेतृत्व करीत होती; पण कित्येक वर्षे रेंगाळलेल्या मागण्या मिळवून देण्यास ही युनियन कुचकामी ठरल्याने कामगारांनी या युनियनला रामराम ठोकला. त्यानंतर या कंपनीत भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन रिफायनरी एम्प्लॉईज युनियन, प्रोसेस टेक्निशियन्स अँन्ड अॅनालिस्ट युनियन आणि पेट्रोलियम वर्कमेन्स युनियन या तीन संघटना कामगारांचे प्रतिनिधित्व करू लागल्या.

१९७५ साली राष्ट्रीयीकरण झाल्यानंतर साहजिकच या कंपनीचे व्यवस्थापन केंद्र सरकारकडे आले. या सरकारने कामगारांच्या फायद्यासाठी वेळोवेळी जे कायदे केले, त्यापासून या कामगारांना कसे वंचित ठेवण्यात आले याचे धडधडीत उदाहरण भारत पेट्रोलिअम हे आहे! या रिफायनरीमध्ये काम करणाऱ्या १५०० कामगारांपैकी सुमारे ९०० कामगार असे आहेत की, जे गेल्या काही वर्षांपासून हंगामी काम करीत असून त्यांचा पगारही निश्चित रकमेचा आहे. त्यांना भत्ते आणि इतर सोयीसवलतींचा फायदा मिळत नाही. ४५० रुपयांपासून ६५०–७०० रुपयांपर्यंत या कामगारांना एक ठराविक रकमेचा निश्चित पगार मिळतो. २४० दिवसांच्या सलग नव्हे तर खंडित सेवेनंतर कोणत्याही कामगाराला कायम करण्यात यावे असा सरकारचा कायदा असतानाही या कंपनीत पाच–पाच वर्षे कामगारांना हंगामी ठेवण्यात आले आहे.

सरकारच्या या गैरमार्गी, बेकायदेशीर धोरणांविरुद्ध लढण्यासाठी या कंपनीतील तीन युनियन्सनी १९८१ साली एक समन्वयसमिती स्थापली. जे नेतृत्व लढाऊ असून सरकारला शह देऊ शकेल अशा नेतृत्वासाठी या समन्वयसमितीने डॉ. दत्ता सामंतांचे नेतृत्व स्वीकारले. सामंत म्हटले की, अलीकडे सर्व मालकांचे पित्त खवळते! या कंपनीतही तेच झाले. सामंतांच्या नेतृत्वाखाली कामगारांनी लढा पुकारण्याआधीच व्यवस्थापकांनी एका पहाटे शिस्तीची लेखी हमी दिल्याशिवाय कामगारांना कामावर यायला मज्जाव केला. व्यवस्थापनाची ही कृती कामगारांना मानहानिकारक वाटल्याने त्यांनी आतमध्ये न जाता बाहेर राहणेच पसंत केले. अशा प्रकारे या कंपनीत लढा सुरू झाला.

कामगार बाहेर राहिल्याने उत्पादन ठप्प झाले. फक्त पहिले एक–दोन आठवडे! मग व्यवस्थापनाने कामगारांना खिंडीत पकडण्यासाठी अधिकाऱ्यांना कामास लावले. त्यांच्या मदतीला सीमा सुरक्षादलाचे जवान व गृहरक्षक दिले आणि रिफायनरीचे उत्पादन ८० टक्क्यापर्यंत सुरूही केले.

सरकारच्या या कृतीने सामान्य कामगार भयभीत झाला; तरी त्याने आपला संयम सोडला नाही. नंतर समन्वयसमितीला असे आढळून आले की, ज्यासाठी आपण डॉ. सामंतांना येथे आणले त्यांच्या नावाविषयी व्यवस्थापनाच्या मनात असलेल्या अॅलर्जीमुळेच ही कोंडी फुटण्यास अडचण येत आहे! त्यांनी तशा प्रकारे डॉ. सामंतांना विनंती केल्यानंतर डॉ. सामंत या सर्व प्रकरणातून बाजूस सरकले अगदी आनंदाने! मग वाटाघाटीचा मार्ग खुला झाला.

या वाटाघाटीनुसार पाच महिन्यांच्या प्रदीर्घ कालानंतर झालेल्या एका करारानुसार ही कंपनी १८ जूनपासून पूर्ववत सुरू झाली आणि कामगार खूप मोठ्या आनंदाने, नाही म्हटले तरी किंचित समाधानाने तरी कामावर परतले.

समाधानाने म्हणण्याचे कारण असे की, सीमा सुरक्षा दलाच्या जवानांमार्फत सरकारने आधीच येथे उत्पादन चालू केले होते. कारकुनाचा एक वर्ग पंधरवड्यापूर्वीच कामावर हजर झाला होता. असे असतानाही अंशत: वाढ मिळवून देणारा हा जो तडजोडीचा करार झाला त्यामुळे कामगार किमान ताठ मानेने तरी कामावर परतला.

हा जो करार झाला तो सर्वंकष नाहीच! तात्पुरत्या मलमपट्टीचाच हा प्रकार आहे. या कंपनीत जुने आणि नवे असे कामगार आहेत. राष्ट्रीयीकरणानंतर जे लोक कामास लागले ते नवीन कामगार; तर पहिल्यापासून काम करणारे जुने कामगार! नवीन कामगारांना कायम करून त्यांना जुन्यांचे सर्व फायदे मिळावेत आणि जुन्यांचे सेवानिवृत्तीचे वय ५५ वरून ५८ करावे ही युनियनची कित्येक वर्षांपासूनची मागणी!

करारानुसार जुन्यांची मागणी मंजूर झाली. सेवानिवृत्तीचे वय ५८ वर्षे केले; पण तेही सरळपणे नव्हे! ५५ वर्षांनंतर या कामगारांचा पगार गोठवला जाणार आहे व त्यांना तोच पगार मिळणार आहे. फक्त त्यात वार्षिक वेतनवाढीची भर आहे.

जुन्यांच्या मानाने नवीन कामगारांना काहीच मिळाले नाही. त्यांना तात्पुरती १०० रुपये पगारवाढ १ जून १९८२ पासून मंजूर करण्यात आली असून त्यापैकी ३८२ कामगारांना त्यांचे काम व त्यांना दिलेले वेतन यातील विषमता दूर करून नवीन वाढीव वेतन मंजूर करण्यात आले. त्यांच्या पगाराचे स्केल ठरवून त्यांना इतरही सेवासवलती द्याव्यात ही युनियनची मागणी अद्यापही तशीच भिजत पडून राहिली आहे. कामगारांचा मुख्य प्रश्न अनिर्णितच राहिला.

कामगार-नेतृत्व कसे असावे आणि नसावे यावर भाष्य करणारे आपले सरकार स्वत:च्याच अखत्यारीत असणाऱ्या कारखान्यात काय चालते हे पहायला जराही तयार नाही. ताकदीच्या आधारावर कामगारशक्ती खर्ची करण्याचेच सरकारी धोरण दिसते. कायदे स्वत: केलेले असले तरी सरकार त्याकडे पहावयास तयार नाही. मग याविरुद्ध डॉ. सामंतांसारखा एखादा कामगारनेता जर दंड थोपटून उठला, तर त्याविरुद्ध सर्वांनी एवढा का गहजब गाजवावा असा प्रश्न जर कोणी केला तर त्यात गैर ते काय?

**— मोहन शंकर कुलकर्णी**

# अवती भवती

शरद कृष्णन

## स्वमर्जीने सत्तात्याग करणारा मुख्यमंत्री

उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्रीपद ही सुळावरची पोळी आहे असे विधान त्या राज्याचे एके काळचे मुख्यमंत्री हेमवतीनंदन बहुगुणा यांनी केले होते आणि ऐसपैस पसरलेल्या या राज्याच्या मुख्यमंत्रीपदी विराजमान झालेल्या सर्व मुख्यमंत्र्यांना या सुळावरच्या पोळीची झळ लागली आहे. अपवाद असेल तर तो फक्त कै. गोविंद वल्लभ पंत यांचा. या राज्याचे आजवर १२ मुख्यमंत्री झाले.काल-परवापर्यंत मुख्यमंत्री असलेले वि. प्र. सिंग हे या राज्याचे १२ वे मुख्यमंत्री. त्यांची कारकीर्द तशी केवळ दोन वर्षांची. ही दोन वर्षांची कारकीर्द तशी मोठी सुखावह नसली तरी त्यांनी आपले स्वतःचे बस्तान तसे बरे बसवले होते. राज्यामध्ये धुमाकूळ घालणाऱ्या दरोडेखोरांनी त्यांना चांगलेच संत्रस्त करून सोडले होते. दरोडेखोरांचा बंदोबस्त करण्यात अपयश आले तर आपण राजीनामा देऊ असे ते म्हणत असले तरी ते खरोखरच असे काही अघटित करतील असे काही कुणाला वाटले नव्हते. परंतु गेल्या सप्ताहामध्ये कानपूर जिल्ह्यामध्ये दरोडेखोरांनी १० बळी घेतले. त्यापाठोपाठ मैनपुरी जिल्ह्यामध्य ६ हरिजनांचा बळी घेतला आणि मुख्यमंत्रीपदी विराजमान झालेल्या वि. प्र. सिंग यांनी राजीनामा देऊन दरोडेखोरांसमोर शरणागती पत्करली. मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री अर्जुनसिंग यांच्या समोर मारपतसिंगने शरणागती पत्करली हे ठीक आहे. कै. जयप्रकाश किंवा विनोबा भावे यांच्यासारख्या सत्पुरुषांसमोर हयातभर लुटालूट करणाऱ्या काही डाकूंनो हत्यारं टाकली, हेही ठीक आहे. पण देशामधील सगळ्यात मोठ्या राज्याचा मुख्यमंत्री, राज्याची सारी पोलीसयंत्रणा हाती असूनहो आपण दरोडेखोरांचा बंदोबस्त करू शकत नाही म्हणून राजीनामा देतो, हे काहो ठीक वाटत नाही; पण ठीक वाटत नसले तरी वि. प्र. सिंग यांनी ते कृतीत आणले आहे. या राज्याच्या १२ मुख्यमंत्र्यांपैकी एकाही मुख्यमंत्र्याने अशा प्रकारे सत्ता सोडली नव्हती. आपण आपले कर्तव्य पार पाडू शकत नाही याची मनाला टोचणी लागून राजीनामा देणारा हा उ. प्र. चा पहिला मुख्यमंत्री ! तशी राजीनामा देण्याची धमकी ते अधूनमधून देतच होते. परंतु ते खरोखरच असे काही करून बसतील असे त्यांच्या नजीकच्या सहकाऱ्यांनाही वाटले नव्हते. वास्तविक पहाता राजीनामाप्रकरणाचे नाटकहो करता येते. म्हणजे राजोनामा लिहायचा आणि तो पक्षश्रेष्ठींकडे पाठवायचा. जसा जनाब अन्तुले यांनी प्रथम पाठवला होता. असे नाटक केले को, संबंधितांवर दबाव येतो आणि प्रकरण तेवढेच गंभीर नसेल तर मग पक्षश्रेष्ठीही राजोनामा देण्याचे कारण नाही असे म्हणून संबंधित मुख्यमंत्र्यांना आपल्या जागी कायम ठेवतात पण वि. प्र. सिंग यांनी हे असे काही केलेच नाही. त्यांनी आपल्या एकाही सहकाऱ्याचा सल्ला घेतला नाही. दिल्लीशी संपर्क साधला नाही आणि आपला राजीनामा तडक राज्यपालांकडे सुपूर्त केला. त्यांना तो स्वीकारणे भाग पाडले. ४२५ सदस्यांच्या या गृहामध्ये ३२२ हून जास्त सदस्यांचे पाठबळ असताना वि. प्र. सिंग यांना असली काही दुर्बुद्धी सुचेल असे श्रेष्ठींना वाटले नव्हते. त्यात राष्ट्रपतिपदाची निवडणूक डोक्यावर आलीअसताना राज्याच्या मुख्यमंत्र्याने सत्तात्याग करण्याची टोकाची कृती का करावी, हेही पक्षश्रेष्ठींना समजू शकलेले नाही. सिंग यांनी राजीनामा दिला असला तरी राष्ट्रपतिपदाची निवडणूक होईपर्यंत तेच काळजीवाहू मुख्यमंत्री म्हणून काम पाहतील. उ. प्र. चे मुख्यमंत्रीपद स्वीकारण्यास कुणाला मोठी उत्सुकता आहे असे दिसत नाही. राष्ट्रपतिपदाची निवडणूक होऊन झैलसिंग राष्ट्रपतिभवनामध्ये दाखल झाले की, मग इंदिराजी या प्रश्नात लक्ष घालतील. तोपर्यंत राज्याचा कारभार सिंग यांनाच संभाळावा लागेल.

वि. प्र. सिंग हे उत्तर प्रदेशाचे सगळ्यात तरुण मुख्यमंत्री. त्यांची निवड तशी काहीशा अनपेक्षितपणेच झाली; पण सत्ता ग्रहण केल्यावर त्यांनी गेली दोन वर्षे प्रामाणिकपणे काम केल्याचे दिसून येते. राज्यामधील दरोडेखोरांनी घातलेला धुमाकूळ पसंत न पडल्याने त्यांनी दिलेल्या राजिनाम्याची तुलना कै. लालबहादूर शास्त्री यांनी रेल्वेमंत्रीपदाचा जो राजिनामा दिला त्याच्याशी करता येईल. रेल्वे अपघाताची नैतिक जबाबदारी स्वीकारून त्यांनी १९५४ मध्ये रेल्वेमंत्रीपद सोडले होते. अर्थात् आता अपघात ही इतकी नित्याची बाब झाली आहे की, अपघातासाठी रेल्वेमंत्र्यांनी राजिनामा देण्याचे ठरवले तर, दर दोन महिन्यांनी मंत्री बदलावा लागेल. उ. प्रदेशामधील दरोडेखोरी हेही असेच आवरता न येण्यासारखे प्रकरण आहे आणि तरीही मुख्यमंत्र्यांनी सत्तात्याग केला हे विशेष मानावे लागेल. वि. सिंग हे केवळ राजकारणी असते तर कदाचित असे झाले नसते; परंतु ते सुसंस्कारित व संवेदनाक्षम आहेत. त्यांनी काही कविताही लिहिल्या आहेत. या कविमनाच्या मुख्यमंत्र्याला कठोर वस्तुस्थितीला तोंड देता आले नाही आणि आपली जबाबदारी आपण पार पाडू शकत नसताना बळेच सत्तेला चिकटून राहण्यात त्यांना स्वारस्य वाटले नाही आणि म्हणूनच स्वतःच्या पक्षाच्या ज्येष्ठ नेत्यांचा सल्ला वगैरे घेण्याच्या भरीस न पडता त्यांनी सत्तात्याग करणे पसंत केले. गेल्याच महिन्याच्या ९ तारखेस त्यांचा ५१ वा वाढदिवस त्यांनी साधेपणाने साजरा केला. त्या वेळी काही जनकल्याणकारी योजना तातडीने राबवण्याचे त्यांनी बोलून दाखवले होते; परंतु तसा योग येण्यापूर्वीच त्यांना सत्ता सोडावी लागली.

वि. प्र. सिंग यांनी २० वर्षांपूर्वी आपल्या राजकीय जीवनास

प्रारंभ केला. विनोबांच्या भूदान चळवळीमध्ये त्यांचा क्रियाशील सहभाग होता. त्यांचे महाविद्यालयीन शिक्षण पुण्याच्या फर्ग्युसनमध्ये झाले. तेथून पदवी घेतल्यानंतर त्यांनी अलाहाबाद विद्यापीठामध्ये कायद्याचे शिक्षण घेतले. मंडा येथील संस्थानी घराण्यात त्यांचा जन्म झाला असला तरी त्यांचे विचार प्रागतिक स्वरूपाचे होते. त्यांनी आपल्या कुटुंबाच्या मालमत्तेपैकी १०० एकर जमीन भूदान चळवळीला दिली होती. साम्यवादी विचारसरणीचा त्यांच्यावर प्रभाव असल्याने रशिया व चीन येथील प्रगतीचे त्यांना कायम अप्रूप वाटत असे. तेथील परिस्थितीची पाहणी करण्यासाठी त्यांनी या दोन्ही देशांना भेटी दिल्या होत्या आणि तेथे राबवल्या जाणाऱ्या काही प्रागतिक योजना उ. प्रदेशामध्ये राबवण्याचा प्रयत्नही केला.

## अजब निवडणूक

उ. प्रदेश विधानसभेची निवडणूक त्यांनी मोठ्या अजब पद्धतीने लढवली. तिंडवाडी मतदारसंघातून निवडणुकीला उभे राहिल्यावर त्यांनी घोषणा केली की, निवडणूकप्रचारासाठी कोणचेही चार चाकी अथवा तीन चाकी वाहन वापरायचे नाही. ही केवळ घोषणा न राहता त्यांनी अतिशय कठोरपणे त्याची अंमलबजावणी केली. त्यांच्या प्रचारकार्यात भाग घेणाऱ्यांना प्राय: मोटारसायकली व सायकली या वाहनांचा वापर करावा लागला. ते स्वत: केवळ मोटारसायकलचा वापर करत असल्याने अन्य कोणाला जीप वगैरे आणण्याचे धाडसही झाले नाही. आजकाल निवडणूकप्रचारासाठी लक्षावधी रुपयांची उधळण होत असताना नियमात बसणारा खर्च करून त्यांनी निवडणूक लढवली व ती जिंकूनही दाखवली. त्यांचा विजयही तसा साधासुधा नव्हता. झालेल्या मतदानापैकी ८० टक्के मते त्यांनी पटकावली होती.

वि. प्र. सिंग यांची केवळ दोन वर्षांची कारकीर्द डोळ्यांखालून घातली तर त्यांच्या मंत्रिमंडळाने केलेली चांगली कामगिरीही चटकन डोळ्यांत भरते. दुष्काळी परिस्थिती आणि वीजनिर्मितीची तुटपुंजी यंत्रसामुग्री असूनही त्यांनी स्वत: लक्ष घालून राज्याच्या वीज उत्पादनामध्ये लक्षणीय वाढ घडवून आणली. उ. प्रदेश हे राज्य तसे मागासलेले; परंतु उद्योगपतींना आकर्षण वाटावे अशा अनेक सुविधा उपलब्ध करून देऊन त्यांनी राज्यामध्ये उद्योगधंद्यांच्या निर्मितीला अनुकूल असे वातावरण निर्माण करण्यात यश मिळवल्याने उद्योगधंद्यासाठी भांडवलपुरवठा वाढला. 'उद्योगबंधू' नावाची एक शासकीय योजना त्यांनी स्वत: राबवली आणि उद्योगधंद्यांना उत्तेजन देताना त्यांचे केंद्रीकरण होणार नाही याची दक्षता घेतली. कायदा व सुव्यवस्था या नाजूक प्रश्नाकडे त्यांनी विशेष लक्ष पुरवले असले तरी दरोडेखोरीच्या प्रश्नावरून त्यांना राजीनामा द्यावा लागावा हा एक विचित्र योगायोग मानावा लागेल. पोलीसखात्यामध्ये त्यांनी नवीन विश्वास निर्माण करण्यात यश मिळवले तरी त्यांना ज्या वेगाने दरोडेखोरीला आळा घालण्याची इच्छा होती तो वेग पोलीसखाते कधीच घेऊ शकले नाही. एक गोष्ट मात्र नक्की की, दरोडेखोरीच्या बंदोबस्ताबाबत पोलीसखाते त्यांच्या कारकीर्दीमध्ये जास्तीत जास्त कार्यक्षम होते. त्यांच्या दोन वर्षांच्या कारकीर्दीमध्ये दरोडेखोरांनी १५० नागरिकांचे खून केले; पण त्याचबरोबर दरोडेखोरांचा बंदोबस्त करताना १५३ पोलीस मारले गेले हेही लक्षात घेतले पाहिजे. खेरीज अधिकृत आकडेवारीप्रमाणे एकूण १७०० दरोडेखोरांचा बंदोबस्त करण्यात त्यांनी यश मिळवले. त्यांच्या आधीच्या कोणत्याही मुख्यमंत्र्याला इतपत कामगिरीही बजावता आलेली नाही. राजीनामा दिला त्या वेळी ते गृहामध्ये चांगले लोकप्रिय होते, प्रारंभी त्यांना विरोध करणाऱ्या अनेक आमदारांचा पाठिंबा मिळवण्यात त्यांनी यश मिळवले होते. त्यांच्या नेतृत्वाबाबत कोणतीही खळखळ नव्हती. आपल्या कर्तृत्वावर त्यांनी स्वत:साठी निश्चित स्थान निर्माण केले होते. पंतप्रधान इंदिराजींचाही त्यांच्यावर पूर्ण विश्वास होता. सत्तासंपादनासाठी मंडळी हपापल्याप्रमाणे झगडत असताना केवळ नैतिक कारणांसाठी निर्णायक स्वरूपात राजीनामा देणारा हा मुख्यमंत्री एक आदर्श मानावा लागेल. अशीही माणसे अजून आहेत याचे तरुणांना अप्रूप वाटल्यावाचून रहाणार नाही.

## उ. प्रदेशाच्या मुख्यमंत्र्यांची परंपरा

श्री. वि. प्र. सिंग यांच्या आधीचे मुख्यमंत्री बनारसी दास यांचे गृहामधील बहुमत नाहीसे झाल्याने राष्ट्रपतींनी त्यांना बडतर्फ केले होते. त्याआधी जनता पक्षाच्या कारकीर्दीत राम नरेश यादव मुख्यमंत्री होते; परंतु जनता पक्षामधील लाथाळीमुळे त्यांना सत्ताभ्रष्ट व्हावे लागले. आणीबाणी घोषित झाल्यावर त्या वेळचे कॉंग्रेसचे मुख्यमंत्री एन. डी. तिवारी यांना पदच्युत करण्यात आले. उ प्रदेशाच्या मुख्यमंत्रीपदाबाबत केंद्रीय नेते विशेष जागरूक असल्याचे दिसून येते. हेमवतीनंदन बहुगुणा किंवा कमलापती त्रिपाठी यांच्या पाठीशी बहुमत असूनही केंद्रीय नेत्यांनी आदेश दिल्यामुळे त्यांना मुख्यमंत्रीपद सोडावे लागले. चरणसिंग व टी. एन. सिंग हे कॉंग्रेसेतर मुख्यमंत्री होते. बहुमत होते तोपर्यंत ते सत्तेवर राहिले; परंतु आपल्या पाठीशी असलेले बहुमत संपुष्टात येताच त्यांना राजीनामा द्यावा लागला. सौ. सुचेता कृपलानी या काही काळ मुख्यमंत्री होत्या; परंतु मुदत संपल्यावर स्वपक्षाचा पाठिंबा न राहिल्याने त्यांना सत्ता सोडावी लागली. कै. सी. बी. गुप्ता हे उ. प्रदेशाच्या राजकारणामधील एके काळचे बडे प्रस्थ. मुंबईमध्ये एके काळी जसे कै. स. का. पाटील होते तसे लखनौमध्ये हे गुप्ता होते. कामराज योजनेचे हत्यार चालवून त्यांना प्रथम जायबंदी करण्यात आले. नंतर त्यांना मुख्यमंत्रीपद मिळाले; परंतु स्वपक्षाच्या आमदारांकडूनच विश्वासघात झाल्याने त्यांना जावे लागले. डॉ. संपूर्णानंद हे तसे हेकट होते. आपण सत्तेवर असताना राज्याचा पक्षाध्यक्ष हा आपल्या मर्जीमधील हवा असा त्यांचा आग्रह होता. तसा तो सर्वच मुख्यमंत्र्यांचा असतो. अंतुलेजींनी नाही का त्यांच्या चलतीच्या काळात प्रेमलताबाई चव्हाणांना हलवून त्यांच्या जागी गुलाबराव पाटलांची वर्णी लावली? आपल्याला नको असलेला पक्षाध्यक्ष दूर करण्यात कर्नाटकच्या गुंडूरावांनी अलीकडेच नाही का यश मिळवले? केंद्रीय नेत्याचा वरदहस्त असेल तर या गोष्टी आजकाल सहज शक्य होतात. संपूर्णानंदजींची गोष्ट १९६० सालची. त्या वेळी कै. पंडित नेहरू पंतप्रधान होते. त्या वेळी कॉंग्रेसमध्ये पक्षाच्या पदाधिकाऱ्यांच्या नेमणुका न होता निवडणुका वगैरे व्हायच्या. संपूर्णानंद राज्याचे मुख्यमंत्री होते. त्यांनी पक्षाध्यक्षपदासाठी आपला उमेदवार उभा केला. इतपत ठीक झाले; पण ही निवडणूक प्रतिष्ठेची मानून त्यांनी असे

घोषित केले की, आपण उभे केलेले मुनेश्वरदत्त उपाध्याय जर पक्षाध्यक्षपदी निवडून आले नाहीत तर आपण राजीनामा देऊ! त्यानी घोषणा केली खरी; परंतु त्यांचा उमेदवार पराभूत झाल्यावर याबाबतचा निर्णय केन्द्रीय नेत्यांनी घ्यावा अशी भूमिका त्यांनी घेतली; परंतु कै. पंडित नेहरू यांनी त्यांना राजीनामा देण्यास सांगितले आणि संपूर्णानंदांना जावे लागले. या राज्याचे पहिले मुख्यमंत्री कै. गोविंद वल्लभ पंत केंद्रशासनामध्ये गृहमंत्री म्हणून दाखल झाल्याने त्यांना जावे लागले होते. तर अशी ११ मुख्यमंत्र्यांची पार्श्वभूमी लाभलेल्या उ. प्रदेशचे वि. प्र. सिंग हे बारावे मुख्यमंत्री. आजच्या गढूळ राजकीय वातावरणामध्ये त्यांचा सत्तात्याग थोर वाटत असला तरी या सच्चा माणसाचा अन्य काही कामासाठी उपयोग केला जाणे जरूर आहे. अशी प्रामाणिक माणसे दिवसेंदिवस विरळा होत असल्याने हे विशेष तीव्रतेने जाणवते.

## □ बँकदरोडे—एक नित्याची बाब


ठरीव पद्धतीने घातले जाणारे बँकदरोडे ही आता एक नित्याची बाब झाली आहे. विशेषत: कलकत्ता व दिल्ली येथील बँकदरोड्यांचे प्रमाण विशेष वाढले आहे. चार–दोन माणसांची टोळी बंदुकीचा धाक दाखवून जनतेची ठेव दिवसाढवळ्या लुटून नेते आणि पोलीसखाते हे सारे काही पहात बसते असाच प्रकार सध्या चालू आहे. वीस दरोड्यांपैकी दोन दरोड्यांचाही धड तपास लागत नाही, याचा दुसरा अर्थ काय काढणार ? गेल्याच सप्ताहामध्ये कलकत्त्यामध्ये दोन बँकांवर डाके घालण्यात आले. युनायटेड बँक ऑफ इंडियाच्या कलकत्ता येथील लेक कोड येथील शाखेमध्ये बँकेचे नियमित व्यवहाराचे तास संपताच, एक टोळी बँकेमध्ये घुसली. हातात हत्यारे होती; परंतु त्याचा वापर करण्याची गरज भासली नाही. हत्याराचा धाक दाखवताच बँकेच्या कर्मचाऱ्यांनी शरणागती पत्करली. मग पुढचा सारा मामला केवळ वीस मिनिटांमध्ये आवरला! या टोळीमधील सहा जणांनी प्रथम आपला मोर्चा रकमांचा स्वीकार करणाऱ्या चंपा रॉयकडे वळवला. या बाई गेल्याच महिन्यात नोकरीला लागलेल्या. अजून कामामध्ये रुळतात न रुळतात तोच हा अनुभव.त्या पुरत्या गांगरून गेल्या. दरोडेखोरांनी तेथून अकरा हजारांची रोकड उचलली; पण तेवढ्याने समाधान होण्यासारखे नव्हते. त्यांनी मुख्य रोखपालाकडे आपला मोर्चा वळवला व त्याच्याकडून बँकेच्या तिजोरीच्या चाव्या हस्तगत केल्या. रोखपाल यांच्या हातावर असलेले घड्याळ काढून घेण्याचा प्रयत्न झाल्यावर रोखपाल सुबिर घोष यांनी ते आपल्या लग्नामधील भेट असल्याचे सांगितले. तेव्हा घड्याळाचा नाद सोडून देण्यात आला. तिजोरीची एक किल्ली रोखपालाकडून हस्तगत केल्यावर टोळीमधील चौघाजणांनी आपला मोर्चा बँकमॅनेजरकडे वळवला. दुसरी किल्ली देण्याची टाळाटाळ होत आहे हे लक्षात आल्यावर केवळ एक मिनिटाची मुदत देण्यात आली. मॅनेजरनेही मग शरणागती पत्करली. दोन्ही किल्ल्या हस्तगत केल्यावर लुटारूंनी बरोबर आणलेल्या बॅगमध्ये चार लाखांची रोकड भरली. मिळालेल्या नोटांमध्ये शंभरखेरीज पन्नास व दहा रुपयांच्या नोटा असल्याने बॅगेचे व नोटांचे गणित जमेना तेव्हा भाराभर नोटा प्रत्येकाने आपल्या खिशात कोंबल्या. बँकेचे सारे कर्मचारी हा प्रकार अवाक होऊन पहात होते. नोटा गोळा करण्याचे काम संपल्यावर मंडळी तत्परतेने बाहेर निसटली. बाहेर अँबेसेडर गाडी तयारच होती. त्यामध्ये बसून मंडळींनी पोबारा केला. पुढे आरडाओरड झाली, पोलीस आले, जबान्या झाल्या. चोरांचे तपशीलवार वर्णन देऊन झाले. या दरोडा पडून पंधरा दिवस होऊन गेले; परंतु अजून लुटारूंचा तपास लागलेला नाही!

## □ नक्षलवाद्यांचा डाका

वर ज्याचा उल्लेख केला आहे तो दरोडा पडून ८।१५ दिवस होतात न होतात तोच कलकत्त्यामधील बँक ऑफ इंडियाच्या बालिगंज वर्तुळाकृती रस्त्यावरील शाखेवर दरोडेखोरांनी हल्ला चढवला. या दरोड्यामध्ये तशी फारशी लूट हाती लागली नाही. केवळ १ लाख ७ हजारांच्या रकमेवर दरोडेखोरांना समाधान मानावे लागले. डाका घालण्याची पद्धत आणि कामाचा वेग नेहमीचा असला तरी या दरोड्याला थोडी राजकीय झालर होती. बँकेमध्ये प्रवेश करून आपला हेतू स्पष्ट करताच दरोडेखोरांनी आपण हा डाका राष्ट्रकार्यासाठी घालत असल्याचे घोषित केले. त्यांनी ओरडून सांगितले की, आपण स्वार्थी हेतूने हा डाका घातला नसून राष्ट्राच्या भल्यासाठी ही रक्कम वापरण्यात येणार आहे.या सत्कार्यासाठी आपण होऊन कोणी पुढे येण्याची शक्यता नव्हतीच. तेव्हा येथेही शस्त्रांचा धाक दाखवण्यात आला. रोखपाल उमाशंकर मंडल यांना पिस्तुलाचा धाक दाखवून त्यांची जागा सोडण्याचा आदेश देण्यात आला. श्री. मंडल बाजूला होताच दरोडेखोरांनी हत्याराचा धाक दाखवून बँकेमध्ये हजर असलेल्या १०–१२ खातेदारांना एका बाजूला गोळा केले. तिघांच्या टोळीपैकी एकजण त्यांच्यावर लक्ष ठेवून होता. बँकेच्या कर्मचाऱ्यांवर व ग्राहकांवर दबाव आणल्यावर बँकेचा फोन तोडण्यात आला. मग झटकन हाती लागलेली एक लाख सात हजारांची रक्कम गोळा करून लुटारू पळून गेले! बँकेचा स्वत:चा रक्षक नसल्याने लुटारूंना लूट पळवणे सोपे गेले. केवळ पंधरा दिवसांत दोन बँकांवर डाका पडल्याने पोलीसखातेही खडबडून जागे झाले. पोलीसआयुक्त निरुपम सोम यांनी सहाय्यक पोलीसआयुक्त सुब्रिमल दासगुप्ता यांच्याकडे ही दोन्ही प्रकरणे सोपवली आणि त्यातल्या त्यात दिलासा देणारी बाब म्हणजे दुसरा दरोडा पडला त्याच्या दुसऱ्याच दिवशी पहिल्या दरोड्यामधील दोन दरोडेखोर व ६५ हजारांची रोकड परत मिळवण्यात पोलिसांनी यश मिळवले. या दोन दरोडेखोरांना पकडण्यात यश मिळाल्यामुळे आणखी ५ मोठ्या दरोड्यांचा तपास लागू शकला. कलकत्त्यामध्ये अलीकडेच एका जवाहिऱ्याचे दुकान लुटण्यात आले होते. या दरोड्यामधील काही सोन्या-चांदीचे दागिने पोलिसांना मिळाले असल्याने या मोठ्या दरोड्याचा तपासही लागू शकेल असा विश्वास पोलिसांना वाटतो. पकडण्यात आलेल्या एका दरोडेखोराजवळ काही घड्याळे, टेपरेकॉर्डर व अन्य चैनीच्या महागड्या वस्तू मिळाल्या. हा माल त्याने बँकेच्या लुटीमधील आपला हिस्सा खर्चून खरेदी केल्याचे कबूल केले.

बँक दरोड्याबाबत पोलीसआयुक्त निरुपम सोम यांनी बँक-व्यवस्थापनावर कडवट टीका केली आहे. मोठाल्या रकमा सहजगत्या पळवल्या जात असतानाही बँका सुरक्षा–अधिकारी नेमत नाहीत, धोक्याची घंटा बसवली जात नाही आणि दरोडेखोरांनी धमकावले की, लगेच कर्मचारी शरणागती पत्करतात, यासारख्या गोष्टींवर पोलीसआयुक्तांनी टीका केली आहे. बँकांवरील दरोड्याचे प्रमाण वाढते असल्याने—बँक सुरक्षा सेवा निर्माण करण्याचा केंद्र शासनाचा विचार आहे असा काही बंदोबस्त होण्यापूर्वीच जास्तीत जास्त लूट मिळावी अशा हिरीरीने दरोडे घातले जात आहेत. कलकत्ता व दिल्ली येथील विविध बँकांच्या शाखांवर पडणारे दरोडे ही एक चिंतेची बाब असून या संदर्भात काही तरी तातडीचे उपाय योजले जाणे आवश्यक आहे. □

# लाल राज्यात सात दिवस



**इथली माणसं मात्र बदलली आहेत.
वाईट वाटावं इतकी खुजी झाली आहेत.
रवींद्रांचं नाव ही मंडळी आजही घेतात, पण
त्यावर आपलं पोट अवलंबून आहे म्हणून....**

## रवींद्रनाथांच्या भुताची गोष्ट

। वार्तापत्र तिसरे ।

। निखिल वागळे ।

'भीषण शुंदर !'

– शांतिनिकेतन कसं आहे विचारल्यावर माझ्या शेजारी बसलेला धृतमान चटर्जी पटकन् उद्गारला.

नंतर जवळजवळ तासभर म्हणजे मुझफ्फरपूर पॅसेंजर बोलपूरला पोचेपर्यंत धृतमान अखंडपणे बोलत होता. अर्थातच शांतिनिकेतनबद्दल. मी महाराष्ट्रातून आलोय आणि रवींद्रांबद्दल मला आस्था आहे एवढ्या कल्पनेनेच तो असा उत्साहात आला होता की, त्याला कसं थांबवावं हेच समजेना. तसं थांबवणं योग्यही नव्हतं. त्यानं जुमानलं नसतं हा भाग त्याहून वेगळा. प्रश्न भावनेचा होता !

शांतिनिकेतनची खाच न् खोच धृतमानने मला सांगितली. तिथला निसर्ग, तिथली जमीन, तिथले दगड आणि धोंडे–त्याच्या दृष्टीनं सगळं ऐतिहासिक महत्त्वाचं होतं. हे सांगताना इतर तपशील पुरवायलाही तो विसरला नाही. रवींद्रांनी शांतिनिकेतन का काढलं, या विद्यापीठाकडून त्यांच्या काय अपेक्षा होत्या, अगदी इंग्लंड–अमेरिकेहूनही इथे शिकायला विद्यार्थी कसे येतात, अनेक थोर कलावंत इथेच कसे घडले याबद्दल इयत्ता चौथीतल्या पोराला समजावून सांगावं तसंच त्यानं बौद्धिक घेतलं. या गोष्टी मला माहीत आहेत की नाही, किमान त्यात मला रस आहे की नाही याचीही त्याला पर्वा नसावी. मनानं तो केव्हाच शांतिनिकेतनला पोचला होता. त्याच्या क्षणाक्षणाला बदलणाऱ्या हातवाऱ्यांनी आणि टिपेला पोचलेल्या आवाजानं सगळ्या डब्याचं लक्ष वेधून घेतलं हे मात्र खरं.

थोड्याशा कौतुकानंच मी धृतमानला विचारलं, 'शांतिनिकेतनबद्दल तुला बरीच माहिती दिसते. अनेकदा गेलाहेस वाटतं तिकडे ?'

'छे, छे ! अनेकदा कुठचं जाणार ? या नोकरीधंद्यापायी वेळ थोडाच मिळतो ? शाळेत असताना एक-दोनदा गेलो होतो तेवढाच!' तो न बिचकता म्हणाला.

'मग एवढी माहिती...' माझी शंका.

'माहिती असायला तिथे जायला कशाला पाहिजे ? अरे, रवींद्रनाथ आमच्या रक्तातच आहेत. त्यांच्यामुळंच तर बंगालला हे आजचं रूप मिळालंय. दुर्गामातेच्या बरोबरीचं स्थान आम्ही त्यांना देतो. रवींद्रनाथांबद्दल आदर नाही अशा बंगाली माणसाला बंगालीच म्हणता यायचं नाही !'

धृतमानचं म्हणणं बरोबरही होतं. रवींद्रनाथ किंवा त्यांच्या शांतिनिकेतनबद्दल असं गदगदून बोलणं हा बंगालीपणाचाच एक भाग आहे. आपल्या घरचं कार्य असल्याच्या उत्साहात बंगालीबाबू रवींद्रांसंबंधीच्या कुठच्याही कार्यक्रमात सामील होतात. शांतिनिकेतनमधल्या अनेक उत्सवांना, सणांना आजही गर्दी लोटते ती

मुळंच. पश्चिम बंगालमधल्या दुसऱ्या कुठल्याही विद्यापीठात खुनाखुनी, जाळपोळ झाली, अगदी परीक्षा वेळेवर झाल्या नाहीत तरी बंगालीबाबू ढिम्म हलत नाही. शांतिनिकेतनमधल्या विश्वभारतीबद्दल मात्र त्याचं वागणं वेगळं आहे. याचा अर्थ या संस्थेच्या उद्धारासाठी तो रात्रंदिवस झटतो आहे असा नक्कीच नव्हे; पण इथल्या घटनांबद्दल वेळप्रसंगी नेमानं अश्रू ढाळायला मात्र तो विसरत नाही !

गुरुदेव टागोरांचं एवढं सुदैव अजून तरी आहे. याला सुदैव म्हणायचं की नाही हा मुद्दा अलाहिदा !!

¤

बोलपूर स्टेशनवर गाडी पोचली तेव्हा साडेअकरा वाजून गेले होते.

उन्हाचा ढणाणा अक्षरशः भाजून काढत होता. त्यात हातभर लांबीच्या स्टेशनवरची वीतभर शेड म्हणजे डागण्याच.

स्टेशनच्या भिंतीवर रेल्वेखात्यानं आपली प्रतिभा पाजळल्याचं दिसत होतं. टाइल्सच्या रंगीबेरंगी तुकड्यांतून काही तरी चित्र निर्माण करण्याचा तो प्रयत्न असावा. बहुधा पानं, फुलं, नर्तकी वगैरे. शांतिनिकेतनचा निसर्गाशी, कलाशी जवळचा संबंध आहे हे पर्यटकांना सुचवण्याचा हा 'जनता की संपत्ती' टाइप मार्ग पाहून मला खुद्द रवींद्रनाथांचीच दया आली. त्या चित्राच्या आसपास विधी आटपणाऱ्या तिघा-चौघा बंगालीबाबूंनी मात्र रेल्वेखात्याच्या या प्रतिभेची 'योग्य' बूज राखल्याचं दिसत होतं !

स्टेशनबाहेर ओळीनं लावलेल्या सायकलरिक्षा आणि 'आव साब!' म्हणत पुढेपुढे करणारे रिक्षावाले. बोलपूर स्टेशनपासून शांतिनिकेतन तसं लांबच आहे. रिक्षानं जाण्याशिवाय पर्याय नव्हता. एका रिक्षावाल्याला 'भाडं किती घेणार?' विचारलं तर त्यानं आकडा सांगण्याआधी 'महागाई किती वाढलीय' वगैरे पद्धतशीर रडगाणं सुरू केलं.

एखादं ठिकाण पर्यटनस्थळ झालंय की नाही ओळखण्याचे जे काही हमखास मार्ग आहेत त्यापैकी हा एक. इथली माणसं एक तर बाहेरून येणारे लोक आपली सावजं आहेत अशा आविर्भावात वावरत असतात किंवा याच मंडळीवर आपलं पोट आहे हे ओळखून पूर्णपणे अजीजीनं वागतात. रिक्षावालाही याला अपवाद नव्हता; पण त्यानं सांगितलेल्या भाड्यामागचा ओरबाडण्याचा उद्देश लक्षात येऊनही घासाघीस करण्याच्या मनस्थितीत मी नव्हतो.

रिक्षातून शांतिनिकेतनकडे जाताच गावात तीन-चार ठिकाणी उभारलेल्या पर्णकुट्या दिसल्या. खाली शेणानं व्यवस्थित सारवलेलं. पर्यटकांना विश्रांती घेण्यासाठी पर्यटनखात्यानं केलेली ही सोय. तेवढ्यातल्या तेवढ्यात केलेला हा वातावरणनिर्मितीचा प्रयत्न गावाच्या एकूण स्वरूपाशी मात्र विसंगत वाटत होता. एका पर्णकुटीत काही मंडळी चक्क पत्ते कुटत होती. बोलपूर पूर्णपणे पर्यटनस्थळ झाल्याची ही पावतीच होती !

बोलपूर उभं राहिलंय, वाढलंय शांतिनिकेतनमुळच. अगदी सुरुवातीला इथं तीन-चार झोपड्या होत्या. हळूहळू निकेतनचा व्याप वाढत गेला, बाहेरचे लोक येऊ लागले तसं बोलपूरही पसरू लागलं. ब्रांडगुळासारख्या वाढणाऱ्या अशा गावांवर नेहमी एक बकालपणाची छाया असते. धड गाव म्हणूनही त्याचं व्यक्तिमत्त्व नसतं आणि शहर होण्याची क्षमता नसते. येणाऱ्या पर्यटकांबरोबर शहरी सुखसोई येतात त्याही अर्ध्यामुर्ध्या. गावकऱ्यांना अशा सोईंची चटक लागायला वेळ लागत नाही आणि या चटकेची विकृती कधी होते याचंही भान रहात नाही. बोलपूरची गत अशीच मुडदूस झाल्यासारखी झाली आहे. गावात हालचाल सुरू होते स्टेशनवर गाडी येण्याच्या वेळेनुसार किंवा एसटयांच्या येण्या-जाण्याप्रमाणे. इतर वेळी गाव मेल्यासारखंच. त्यात गावकऱ्यांच्या नजरात सतत डोकावणारा अधाशीपणा. आता तर हा अधाशीपणा एवढा वाढला आहे की, शांतिनिकेतनमधल्या नोकऱ्या फक्त स्थानिक माणसांनाच मिळाल्या पाहिजेत अशी त्यानी मागणी केली आहे !

शांतिनिकेतनमध्ये पोचलो तेव्हा धृतमानचं बोलणं चुकीचं नसल्याची खात्री पटली. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना गर्द झाडी आणि निरव म्हणता येईल अशी शांतता. ऊन एवढं तापत असूनसुद्धा वातावरणात रखरखीतपणाला जागा नव्हती.

पण का कुणास ठाऊक झाडं-पानं-फुलं मला फार वेळ मोहात पाडू शकत नाहीत. कदाचित हा माझा करंटेपणा असेल; पण नुसता नैसर्गिक निर्मळपणा चुचकारण्याची वृत्ती माझी नाही. एका वेळेपली-कडे मला तो संथपणा वाटतो. मन ताजं रहातं हे खरं; पण या ताजेपणाचं मला वेड नाही. त्यापेक्षा मारामाऱ्या करणारी, एकमेकांवर कुरघोडी करू पहाणारी, एकमेकांच्या उरावर बसणारी माणसं निरखायला मला आवडतं. तो वेग, ती चढाओढ, त्यांचे निरनिराळे पैलू मला झिंग आणतात असं म्हटलं तरी चालेल.

कदाचित जिवंतपणाची मला गवसलेली व्याख्या वेगळी असावी.

कदाचित शांतिनिकेनमध्ये जायला मी लायक नसेनही !

पण बिचाऱ्या धृतमानला याची काय कल्पना ? 'भीषण सुंदर' असं तो म्हणाला तेव्हा त्याच्या डोळ्यांसमोर शांतिनिकेतनचं हे रम्य वातावरण होतं. त्यात काहीही बदल झालेला नव्हता. अगदी भर दुपारी कोकिळेचं कूजनही कायम होतं.

इथली माणसं मात्र बदलली आहेत. वाईट वाटावं इतकी खुजी झाली आहेत. रवींद्रांचं नाव ही मंडळी आजही घेतात. त्या नामस्मरणावर आपलं पोट आहे हे ते ओळखून आहेत.

आज शांतिनिकेतनला जी अवकळा आली आहे ती या स्वार्थी नामस्मरणामुळंच......

## लाल फितीतला स्वार्थ

विशेष म्हणजे याच खुजेपणाला शह देण्यासाठी रविंद्रनाथांनी शांतिनिकेतन सुरू केलं होतं. निसर्गाच्या सहवासात माणसातलं माणूसपण जागवलं जाईल, त्याची प्रतिभा फुलेल आणि प्रत्येकात दडलेला कलावंत जागा होईल हीच त्याची अपेक्षा होती. कारकून घडवणाऱ्या ब्रिटिश शिक्षणपद्धतीचा त्यांनी पुरेपूर अनुभव घेतला होता. निदान आपल्या पुढच्या पिढ्यांना तरी या राक्षसाचं सावज बनावं लागू नये ही या थोर कलावंताची तळमळ. यातून 'विश्वभारती'ची कल्पना पुढे आली. 'बंगमातेने सात कोटी बंगाल्यांना जन्म दिला; पण एकही जिता-जागता माणूस तिच्या पोटी जन्माला आला नाही' असं रवींद्रनाथांनी म्हटलं आहे, त्यापाठी हीच वेदना होती. बिर्नभितीची ही शाळा सुरू झाली विसाव्या शतकाच्या सुरुवातीला. 'विश्वभारती' या नावानं तिचं बारसं मात्र १९२१ साली झालं.

निसर्गाचं आणि विद्यार्थ्यांचं नातं अभेद्य असावं असा रवींद्राचा आग्रह असायचा. निकेतनातल्या मुलांनी आपल्या मेंदूची कवाडं एका विशिष्ट विषयापुरती बंद करू नयेत, एका विषयातून दुसऱ्या विषयाकडे सहजगत्या जावं म्हणून ते दक्ष असत. अनेक देशी-विदेशी भाषांचा अभ्यास तर इथे होतच होता; पण ग्रामीण जीवनात उपयुक्त ठरेल अशा तंत्रज्ञानाच्या शिक्षणासाठी 'श्री-निकेतन 'ही होतं.

पण हे सगळं सुरळीतपणे चाललं रवींद्रनाथ हयात असेपर्यंत. आपल्याभोवती नंदलाल बोस, राम किंकर, विनोदबिहारी दास यासारखे हाडाचे कलावंत रवींद्रांनी जमा केले होते. त्यांच्या मृत्यूनंतर मात्र शांतिनिकेतन अडचणीत सापडलं. आपल्या ओळखीच्या जोरावर रवींद्रनाथ निकेतनसाठी पैसा जमा करत. त्यांच्या पुस्तकांची रॉयल्टीही होतीच. त्यांच्यानंतर मुख्य प्रश्न उभा राहला तो पैशाचाच. पंचेचाळीस-सेहेचाळीस सालपर्यंत रवींद्रांच्या सहकाऱ्यांनी कसंबसं रेटलं; पण ते फार दिवस तग धरतील अशी लक्षणं नव्हती.

जवाहरलाल नेहरूंना निकेतनबद्दल पहिल्यापासून आपुलकी. अनेकदा ते इथे येऊन रहात. त्यांच्या लक्षात ही परिस्थिती आली आणि १९५१ मध्ये त्यांनी 'विश्वभारती 'ला केंद्रीय विद्यापीठ बनवून टाकलं. यामागची नेहरूंची भावना अर्थातच चांगली होती. निकेतनला ग्रासून राहिलेली पैशाची अडचण दूर व्हावी असं त्यांना मनापासून वाटत होतं. तसं झालंही. पैशाची अडचण मिटली.

आता नवेच प्रश्न उभे राहले. सरकारीकरणाबरोबर पैसा आला तसे नियम आले. बिनभिंतीची ही शाळा लाल फितीत अडकली. सरकारच्या दृष्टीनं हे आणखी एक विद्यापीठ. रवींद्रांना ते एकमेव व्हायला का हवं होतं याच्याशी या मंडळींना सोयरसुतक नव्हतं. आज शांतिनिकेतनवर आहे ते एरंडेली चेहऱ्याचे कारकून आणि पट्टेवाले यांचं राज्य. इथे नवी माणसं येतात ती बाहेरून. शांतिनिकेतनच्या मातीत त्याचा पिंड घडलेला नसतो. त्याना फक्त विद्यापीठ चालवायचं असतं. स्वाभाविकपणे रवींद्रांचे दिवस पाहिलेल्या मंडळींचा त्यांच्याशी खटका उडतो. खटकेबाजीचं हे राजकारण आज निकेतनाच्या कानाकोपऱ्यात चाललं आहे.

इथल्या पिअरसनपल्लीत रहाणारे दिनकर कौशिकदा या सगळ्या बदलांचे साक्षीदार आहेत. (पिअरसनपल्ली हा निकेतनातला गावठाणासारखा एक भाग. पिअरसन या रवींद्रनाथांच्या सहकाऱ्यावरून या भागाला हे नाव देण्यात आलं आहे.) निकेतनात जी मोजकी मराठी माणसं आहेत त्यांपैकी कौशिकदा एक. दुसरे जोगळेकर नावाचे मराठी शिक्षक आहेत; पण ते दोन-तीन वर्षांपूर्वीच आलेत. खानदेशातले अनिल समर्थही बराच काळ इथे होते. नुकतेच ते सोडून गेल्याचं कळलं.

कौशिकदा कलाभवनाचे संचालक होते. दोनएक वर्षांपूर्वी ते निवृत्त झाले आहेत. आता रवींद्रनाथांच्या पेंटिंग्जवर त्यांचं संशोधन चालू आहे. पिअरसनपल्लीतला बंगला त्यांचा स्वत:चा. त्यांनी निवृत्तीनंतर तो बांधला.

निवृत्त झाल्यावरही मुलाबाळांच्या जंजाळात न अडकता शांतिनिकेतनातच स्थानिक होणाऱ्या कौशिकदांचा पिंड खऱ्या अर्थानं रवींद्राच्या परंपरेत घडला आहे. त्यांच्या घराच्या रचनेवरूनच हे लक्षात यावं. या दुमजली बंगल्याची आखणी त्यांची स्वत:ची. चारही बाजूंनी हवा खेळावी, भरपूर उजेड यावा अशा उद्देशानं मध्यभागी एक प्रशस्त खोली आणि तिच्या चारी बाजूना बांधणी केलेला हा बंगला वास्तुशास्त्राचा अभिनव नमुना ठरावा.

विलक्षण शांत आणि प्रसन्न स्वभावाचे कौशिकदा त्या सगळ्या वातावरणाचा एक भाग बनून गेले आहेत. जुन्या आठवणी चाळवताना ते म्हणाले, 'चाळीसच्या सुमाराला मी शांतिनिकेतनात आलो मी मूळचा पुण्याचा. कुठल्या तरी मासिकात रवींद्रनाथ, शांतिनिकेतनबद्दल वाचलं होतं. मुंबईला जे. जे. स्कूल ऑफ आर्टमध्ये जायची तर इच्छा नव्हती. उठलो आणि इथे आलो. त्या काळी इथली प्रवेशाची पद्धत फारच सोपी होती. कसले फॉर्म नव्हते की लिखापढी नव्हती. नंदलाल बोस आलेल्या प्रत्येक विद्यार्थ्याशी बोलायचे. त्याला काही प्रश्न विचारायचे. शांतिनिकेतनमध्ये शिकण्यात त्या मुलाला खरोखरच रस आहे असं त्यांना वाटलं तर तिथल्या तिथे प्रवेश मिळायचा. आता एवढा साधेपणा राहलेला नाही. टक्केवारी ठरलेली असते. त्यानुसार प्रवेश मिळतो. तरी बरं, अजून इथे मेडिकल वगैरे सुरू झालेलं नाही. त्या मुलांची वृत्तीच वेगळी असते. सगळा व्यवहारी, धंदेवाईक दृष्टिकोन. मग उरलंसुरलं शांतिनिकेतन संपायलाही वेळ लागायचा नाही !'

कौशिकदांनी रवींद्रांना पाहलं ते त्यांच्या अखेरच्या दिवसांत; पण तेव्हाही रवींद्रांची पकड कायम होती. त्या आठवणीत कौशिकदा आजही रमतात. 'रवींद्रनाथांना नियमांची विलक्षण चीड होती. बाहेरून लादलेले नियम त्यांनी कधीच मानले नाहीत. स्वयंशिस्तीवर त्यांचा भर होता. मुलांना हे सारं समजावण्याचे त्याचे मार्गही खुबीदार होते. ते सुरुवात स्वत:पासून करत. मुलांतच रहात. पोशाखापासून मुलांची दृष्टी तयार करण्यावर त्याचा कटाक्ष होता. त्या काळी आमचे कपडे साधेच; पण सुंदर असत. शांतिनिकेतनातल्या विद्यार्थ्यांचा पोशाख हा तेव्हा बाहेरच्यांच्या दृष्टीनं फॅशनचा विषय असे !'

शांतिनिकेतनात ठिकठिकाणी नंदलाल बोस, राम किंकर, विनोद बिहारी यांची चित्र-शिल्पं आहेत. हाही रवींद्रनाथांचाच आग्रह. ती मुलांनी पहावीत, सहजगत्या त्या कलाकृतीचं सौंदर्य त्यांच्या मनावर नोंदलं जावं असं त्यांना वाटे. 'एखादा विज्ञानाचा विद्यार्थी साहित्याच्या वर्गाला जाऊन बसला म्हणून ओरडाआरडा करण्याची पद्धत मात्र तेव्हा नव्हती.' कौशिकदा हसतहसत म्हणाले, 'रवींद्रसंगीताच्या वर्गात तर सर्व विद्यार्थ्यांची आवर्जून उपस्थिती असे.'

अर्थात कौशिकदांना काळाचं, बदललेल्या दिवसांचं भानही आहे. 'गेले ते दिवस ' म्हणत सुस्कारे सोडत बसण्याचा त्यांचा स्वभाव नसावा, म्हणूनच सध्याच्या शांतिनिकेतनबद्दल बोलताना ते तेवढ्याच शांतपणे म्हणाले, 'काळाच्या वाहत्या ओघाविरुद्ध तुम्ही जाऊ शकत नाही. तसं तुम्हाला बदलावं लागतं. १९५१ मध्ये 'विश्वभारती 'ला केंद्राची मान्यता मिळाली तेव्हा सगळ्यात जास्त कुणाला आनंद झाला असेल तर इथल्या शिकवणाऱ्या मंडळींना ! रवींद्रनाथांच्या वेळेला ही सगळीजण एका ध्येयवादानं भारून पंचाहत्तर-साठ रुपयात काम करत होती. रवींद्रनाथांनंतर पोटाला चिमटे बसू लागले तेव्हा ही ध्येयवादाची धुंदी उतरली. केंद्राची मान्यता मिळाल्याबरोबर यू. जी. सी.चं स्केल लागू. सहाजिकच या मंडळींचे पगार वाढले.'

पगाराच्या बाबतीत ही मंडळी काळाप्रमाणे बदलली तरी इतर बाबतीत मात्र जुनेच खुंट कवटाळून बसली आहेत. कदाचित असं बदलणं त्यांच्या दृष्टीनं सोईचं नसावं. विश्वभारतीत नव्यानं भरती होणाऱ्या पगारदारांशी स्पर्धा करण्यासाठी ही मंडळी आपलं जुनेपण वापरू लागली. 'आम्ही रवींद्रांच्या वेळचे. काय ते दिवस!' असं म्हणत आठवणीचे कढ काढायचे एवढं एकच काम या जुन्या मंडळींना उरलं. नवं काही करण्याची जिद्द नव्हतीच; पण नवे येणारे आपल्याला शह तर देणार नाहीत ही पोट जाळणारी चिंता बहुधा या मंडळींना ग्रासू लागली असावी. अशा वेळी महापुरुषाच्या निर्वाणानंतर त्याचे भगतगण चक्क बडवेगिरीचा आश्रय घेतात. शांतिनिकेतनातल्या रवींद्रांच्या अनुयायांनीही दुर्दैवानं तोच मार्ग चोखाळला आहे.

शांतिनिकेतनकडून पिअरसनपल्लीकडे येताना वाटेत शांतिदेव घोष दिसले. बहात्तर वर्षांचे शांतिबाबू रवींद्र–संगीताचे दर्दी जाणकार आणि रवींद्रांचे जुने अनुयायी. त्यांचं सगळं आयुष्य निकेतनातच गेलं. '१९१० साली अवघा सहा महिन्यांचा असताना मी इथे आलो.' हे सांगताना शांतिबाबूंच्या डोळ्यांत आजही कृतार्थता चमकते. काळासावळा, थोडासा लठ्ठपणाकडे झुकणारा हा गृहस्थ बोलताना हरवल्यासारखा वाटतो. त्यात दाढीचे खुंट वाढलेले. काही तरी निराशा शांतिबाबूंना जाळत असावी. आयुष्यभर शांतिनिकेतनमध्ये घालवून अखेर आपल्याला काहीच मिळालं नाही असा भाव शांतिदेवांच्या बोलण्यात डोकावतो. निकेतनातल्या 'गेले ते दिवस' गटाचे शांतिदा म्होरके.

## पोटार्थी थयथयाट

सध्या कुलगुरु अमलान् दत्त यांच्याबरोबर शांतिदा आणि कंपनीची चांगलीच जुंपली आहे. शांतिदा तणतणत सांगतात, 'बाहेरचा एखादा माणूस आमच्या डोक्यावर आणून बसवला की, सगळ्या समस्या सुटतील हा निव्वळ भ्रम आहे. ही माणसं ब्रिटिश शिक्षणात तयार झालेली असतात. गुरुदेवांचे इरादे त्यांना माहीत असण्याची सुतराम् शक्यता नसते. आम्ही जुने लोक त्यांना पुराणमतवादी वाटतो. आम्हाला काय? फक्त रवींद्रनाथांचे आदर्श जपावेत एवढीच आमची इच्छा आहे. हल्ली अमलान दत्त माझ्यावर जाहीर टीका करतात; पण त्यानं काय साधणार आहे? गुरुदेवांचे आदर्श जपायचे म्हणजे त्यागी वृत्ती, हा त्याग आमच्या पिढीनं केलाय. या उपऱ्यांना त्याची किंमत कशी कळणार?'

आणि मग बराच वेळ शांतिदा तावातावानं वरंच काही सांगत असतात.

पण शांतिदांचा हा थयथयाट फक्त एवढ्यासाठी नाही. माणूस *एकदा पोटार्थी झाला की, त्याची भूक वाढत जाते.* एखादे वेळी हे सारं लुब्रेपणाकडे झुकतं असं म्हणतात. शांतिबाबू हे याचं मूर्तिमंत उदाहरण ठरावं. त्यांच्याबद्दल मी कौशिकदांना विचारलं तेव्हा ते थोड्याशा तिडिकीनंच म्हणाले, 'त्यांना काय झालंय भांडायला? उद्या पुन्हा एकदा प्रोफेसरकी मिळाली तर खुशाल घेतील आणि गप्प बसतील!' निकेतनाच्या आवारात शांतिदेवांबद्दल आणखीही बरंच बोललं जातं. त्यांच्याजवळ रवींद्रांची काही पत्रं आणि हस्तलिखितं आहेत म्हणे! ती जर 'विश्वभारती'नं चांगली घसघशीत किंमत देऊन विकत घेतली तर शांतिबाबूंना शांती मिळेल असं अनेकजण हसतहसत सांगतात!

रवींद्रांचा निकटचा सहवास लाभलेल्या शांतिबाबूंची ही अवस्था; मग त्यांच्याभोवती अनेक मुंगळे जमले तर नवल नाही. शांतिनिकेतन ही आपल्या पूर्वजांचीच मालमत्ता असावी अशा थाटात या मंडळींच्या बाता चाललेल्या असतात. आपण रवींद्रांच्या किती जवळ होतो हे दाखवण्याची प्रत्येकाची चढाओढ तर केविलवाणीच म्हणता येईल.

जुनेपणाच्या या दादागिरीच्या अबाधिततेसाठी ही मंडळी अगदी खालच्या पातळीवर जायलाही कमी करत नाहीत. रवींद्रभवनच्या स्पेशल ऑफिसर मानुषी दासगुप्तांना अशाच चारित्र्यहननाला तोंड *द्यावं लागलं* आहे. रवींद्रनाथांचे पुत्र रथींद्रनाथ *ज्या* खोलीत बसत तिथेच सध्या मानुषीबाईंचं ऑफिस आहे. ही खोली रथींद्रनाथांची आठवण म्हणून तशीच बंद करून ठेवावी असं या जुन्या मंडळींचं म्हणणं, मानुषीबाईंनी मानलं नाही. उलट रवींद्रभवनातला संशोधन विभाग तळमजल्यावरून वरच्या मजल्यावर न्यायचं आणि वरचं म्युझियम खाली आणायचं त्यांनी ठरवलं. त्यांच्याविषयीच्या कंड्यांना ऊत यायला मग वेळ लागला नाही. त्यांना धमक्याही देण्यात आल्या. वास्तविक अदलाबदलीचा हा निर्णय एकट्या मानुषीबाईंचा नव्हता. कमिटीनंच सोईसाठी तसं ठरवलं होतं. बळी मात्र गेला मानुषीबाईंचा! मी रवींद्रभवनात गेलो तेव्हा म्युझियम वरच होतं. जुन्या मंडळींच्या धिंगाण्यापुढं मानुषीबाईंनी हार मानलेली असावी!

कुलगुरु अमलान दत्त हा तर चक्क चेष्टेचाच विषय आहे. त्यांच्याविषयीचे अनेक विनोद आहेत. अगदी अमलान दत्तांना कुत्रा–मांजर ठरवण्यापर्यंत. एक विनोद मात्र सगळ्यांना नेमानं सांगितला जातो. कलकत्त्याहून प्रसिद्ध होणाऱ्या किमान तीन नियतकालिकांत मी तो पाहिला.

एकदा म्हणे रवींद्रनाथ रवींद्रभवनातल्या एका कारकुनाच्या स्वप्नात आले आणि म्हणाले, 'विश्वभारतीची ही अवस्था पाहून मला वेदना होतात. सगळं ठाकठीक करू शकेल अशा एखाद्या लायक माणसाला माझ्याकडे घेऊन ये!"

तो कारकून अमलान दत्तांचा चाहता होता. धावतच तो त्यांच्याकडे गेला आणि त्यानं त्यांना घडला प्रकार सांगितला.

दुसऱ्या दिवशी अमलान दत्त कारकुनाबरोबर रवींद्रनाथांच्या समाधीकडे गेले. बराच वेळ त्या दोघांनी समाधीवर ध्यान लावल्यावर गुरुदेवांनी डोळे उघडले. थोडा वेळ अमलान दत्तांना निरखलं आणि ते गरजले, "मी तुला लायक माणूस आणायला सांगितलं; लायक गाढव नाही. गाढवं विद्यापीठं चालवू शकत नाहीत!"

ज्यानं मला हा विनोद सांगितला त्यानं तो बऱ्याच जणांना सांगितलेला असावा. तरीसुद्धा तो एवढा खदखदून हसत होता की, ज्याचं नाव ते!

पण असला जळफळाट करण्यापलीकडे ही जुनी मंडळी फारसं काही करू शकत नाहीत. 'रवींद्रांचे आदर्श जपायचे म्हणजे नेमकं काय करायचं?' असं विचारलं तर त्यांच्याकडे धड उत्तरंही नसतं. एवढंच कशाला, नेमके दोषही ते दाखवू शकत नाहीत. 'रवींद्रांना निसर्ग हवा होता पूर्वी पर्णकुट्या असायच्या आता सिमेंटकाँक्रीटच्या

इमारती तयार झाल्यात. 'वगैरे काही तरी थातुरमातुर बोलतात इतकंच. कलाभवनाच्या आवारातली अशी एक पर्णकुटी कौशिकदांनी मला दाखवली. विद्यार्थी असताना ते स्वतः तिथं रहात होते. कुटी अर्थातच रमणीय होती; पण तिच्या निगेवर दरवर्षी एवढा खर्च येतो की, त्यापेक्षा सिमेंट-कॉंक्रीटची बिल्डिंग परवडते असं कौशिकदा म्हणाले. यावर ही जुनी मंडळी गप्प बसतात. एकूण आकाडतांडव करून आपल्याकडे लक्ष वेधून घ्यायचं एवढाच त्यांचा उद्योग असावा.

*मला मात्र हे नवीन नव्हतं. विटाळ गेलेल्या म्हाताऱ्यांचे थयथयाट* मी यापूर्वी सर्वोदयात पाहिले होते. पिंडाला शिवणाऱ्या कावळ्यासारखी ही मंडळी जयप्रकाशांभोवती जमायची. तिकडे सेवादलातही तोच प्रकार. जुन्या मंडळींचा त्याग, त्यांच्या निष्ठा यांचेच गोडवे साऱ्यांनी गावे हा आग्रह. स्वातंत्र्यचळवळीत ही माणसं होती हे यांचं कतृत्व आणि नवी मुलं त्या वेळी जन्मली नव्हती हा त्यांचा जणू दोषच अशा थाटात सगळं वागणं असायचं.

शांतिनिकेतनमधला अनुभव याच पठडीतला होता. जुन्या आठवणींनी तोंड कडू झालं इतकंच!

हे सगळं मान्य केलं तरी शांतिनिकेतनची विस्कटलेली घडी मात्र नाकारता यायची नाही. १९५१ पासून एकही कुलगुरु इथं धड टिकलेला नाही. अपवाद फक्त सुधीररंजन दास. एकोणसाठ ते पासष्ट ही त्यांची कारकीर्द नेहरूंच्याच कृपेमुळं टिकली होती. नेहरू गेल्यानंतर मात्र त्यांना अपमानास्पद स्थितीत निकेतन सोडावं लागलं.

अमलान दत्ताच्या आधी इथं असलेल्या सुरजित सिन्हांनी 'तर कमालच केली. ते स्वतः मार्क्सिस्ट. त्यांनी इथं आपली माणसं घुसवण्याचा जोरदार प्रयत्न केला. परिणामी त्यांनाही बाहेरची वाट धरावी लागली. आता अमलान दत्त किती काळ टिकतात याचीच सगळे वाट बघताहेत!

विद्यार्थी-शिक्षकसंबंधही पूर्वीसारखे राहिले नाहीत. रवींद्रनाथांच्या वेळची एक गोष्ट मला इथं समजली. रवींद्रनाथ नेहमी मुलाच्या बाजूनं ठामपणे उभे रहात. एकदा मुलींच्या होस्टेलमध्ये असाच तंटा उद्भवला. रवींद्रनाथ मुलींच्या बाजूचे होते. शिस्त लादायची नाही हे आपलं म्हणणं त्यांनी खरं केलं आणि रेक्टरला जावं लागलं. सहाजिकच मुलं विश्वासानं रवींद्रनाथांकडे जात. आज गुरु-शिष्यांचे असे जिव्हाळ्याचे संबंध तर सोडाच; पण चांगले म्हणता येतील असेही राहिलेले नाहीत. शिक्षकाच्या नावानं केलेला शिमगा अनुभवायचा असेल तर इथल्या होस्टेलमधून एखादा फेरफटका मारावा!

कलकत्त्यातलं राजकीय वारही शांतिनिकेतनातल्या आवारात घुमू लागलं आहे. त्याची पहिली चुणुक दहा वर्षांपूर्वीच दिसली. नक्षलवादी राक्षसानं त्या वेळी शांतिनिकेतनला पुरतं पीडलं होतं. दिवसाढवळ्या हल्ले, मारामाऱ्या करायलाही नक्षलवादी म्हणवणाऱ्यांनी कमी केलं नाही. पिअरसनपल्लीच्या रस्त्यावरच नंदलाल बोसांचा बंगला आहे. आज तिथं त्यांची मुलं रहातात. या बंगल्याला बसवलेली भक्कम लोखंडी जाळी पाहिली म्हणजे या 'क्रांतिकारक उठावा'च्या उग्रतेची कल्पना येते! आजही हाणामाऱ्यांचा हा वारसा इथल्या विद्यार्थ्यांनी सोडलेला नाही. निवडणुका वगैरे मोके साधून असे प्रसंग साजरे केले जातात. विद्यार्थ्यांमध्ये दोन राजकीय विचारांच्या संघटना असल्याचाच हा परिणाम.

श्री-निकेतनबद्दल काय सांगावं? एकच प्रसंग पुरेसा आहे. श्री-निकेतनला जायचा माझा आग्रह कौशिकदा सतत टाळत होते. मी फारच ताणतोय असं वाटलं तेव्हा ते फटकन् म्हणाले, "आहे काय तिथं? काही उरलेलच नाही!"

एरवी संयपणे बोलणाऱ्या कौशिकदांच्या बोलण्यातला हा टोकेरी तुटकपणा पाहून त्यांना पुन्हा श्री-निकेतनबद्दल विचारायची काही माझी हिंमत झाली नाही!

रवींद्र-भवन तर निव्वळ पर्यटनस्थळ झालं आहे. वास्तविक उदयन्, उदची या रवींद्रांच्या रहाण्याच्या जागा प्रसन्न आहेत. रेखीवपणा तर नुसता निरखत रहावं असा. आतली सजावटही तितकीच सुखद. शेवटच्या दिवसांत रवींद्रनाथ ज्या खोलीत होते तिथली शय्या, रवींद्रांची खुर्ची अजून जशीच्या तशी आहे; पण याहीपेक्षा जाणवत रहातो तो इथला रिकामेपणा, इथली पोकळी. बाहेर आल्यावर नुसतं ओकंबोकं वाटत रहातं. पर्यटक येतात, पहातात आणि जातात. गुरखा अधूनमधून एखाद्याला हटकण्याचं काम करतो एवढंच; त्याहून काही नाही.

रवींद्रभवनातल्या वरच्या हॉलमध्ये रवींद्रांचे फोटो, त्यांच्या काही वस्तू ठेवल्या आहेत. हे पर्यटकांचं आणखी एक आकर्षण.

समोरचं म्युझियमही तसंच. वरच्या हॉलमध्ये रवींद्रनाथ, नंदलाल आणि विनोदबिहारींची रेखाटनं. ती जपण्यासाठी पूर्ण जोमात एअर कण्डिशनर. आणि इथंतिथं पुजक्यांनी पर्यटक.

रवींद्रभवनापासून जवळच शांतिनिकेतनचा मूळ परिसर आहे. गर्द आमराई आणि थोड्या अंतरावर प्रत्येक झाडाखाली एक रेखीव अर्धवर्तुळ. त्यात बसण्यासाठी एक उंचवटा. शांतिनिकेतनातले हे वर्ग. पूर्वीप्रमाणे आजही वर्ग इथे भरतात; पण बेतावेताने. यात उपचाराचा भाग आणि पर्यटकांना दाखवण्याचा सोस अधिक असं कळलं तेव्हा पुन्हा एकदा चडफडलो.

बाजूलाच 'शालबिती' आहे. सालवृक्षांची ही रांग. रवींद्रनाथ इथंच फेरफटका करत. ती मात्र अजून पूर्वीइतकीच मनोरम आहे!


सामाजिक चळवळीच्या इतिहासाविषयी आस्था असणाऱ्या सर्वांना हे पुस्तक वाचावंसं वाटल्याशिवाय राहणार नाही.

—डॉ. य. दि. फडके

**महाडचा मुक्तिसंग्राम**

लेखक : प्रा. रा. भ. बिवलकर
प्रा. झुंबरलाल कांबळे

मूल्य : वीस रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०.

## असा कलाकार ?

संध्याकाळी फिरतफिरत कलाभवनाच्या आवारात आलो. समोरच राम किंकरची दोन शिल्पं आहेत. दोन संथाळ बायका आंघोळ करून परतताहेत, त्यांच्यापाठी त्यांचं छोटं पोरगं. नुसतं निरखत रहावं असं हे शिल्प. शिल्पकलेतलं माझं ज्ञान शून्य; पण या शिल्पानं अक्षरशः खिळवून ठेवलं. त्या बायकांचं पळणं, वाऱ्यामुळं ओलेत्या अंगाला चिकटलेलं वस्त्र, चेहऱ्यावरचे उत्फुल्ल भाव आणि मागून येणारं पोरगं...सारं कसं राम किंकरनी त्या शिल्पात साठवलं होतं. त्या कलाकृतीला वेग होता, आवेग होता आणि वर्णनापलीकडचं बरंच काही होतं. शब्द अपुरे पडतील असा जिवंतपणा ओसंडून वाहात होता.

दुसरं शिल्प संथाळ कुटुंबाचं. घरचं सगळं सामान घेऊन संथाळ जोडपं चाललं आहे. पहिल्या शिल्पातला वेग इथं संथपणा झाला होता. संथपणातली लय त्या असामान्य कलाकारानं नेमकी पकडली होती.

अशीच आणखी दोन शिल्पं. बुद्धाचं आणि सरळसोट झाडांनी वेढलेलं सरळसोट मुलीचं.

या शिल्पांचं खिळवणं काही और होतं. भावनेच्या भरात वाहात जाणारा मी माणूस नाही; पण राम किंकरच्या या शिल्पांनी कुठं तरी मेंदूलाच तडाखा दिला होता. ऐन उन्हातान्हात राम किंकर शिल्प घडवतोय आणि मी भान हरपून पहातोय असं डोळ्यांसमोर आलं, हे अगदी नक्की !

आवारात इतरही शिल्पं आहेत; पण ती आहेत इतकंच.

कलाभवनाच्या भिंतीवरचं सिरॅमिक्स असंच विलक्षण. विनोद बिहारींनी दृष्टि गेल्यावर केलेलं हे काम. मला पु. लं. चं 'वंगचित्रे' आठवलं. हाताच्या स्पर्शानं विनोद बिहारी मुलांना आकार दाखवताहेत आणि मुलं त्यावर कागद चिकटवताहेत हे डोळ्यांसमोर आलं.

पुढं नंदलाल बोसांनी राजस्थानी पद्धतीनं केलेलं रंगकाम. बारीक बारीक तपशील. प्रत्येक सारखाच रेखीव. विटक्या झालेल्या रंगातूनही चित्र बरंच बोलू शकत होतं. त्यातलं एक सेल्फ पोर्टेट. स्वतःचंच काम करताना काढलेलं.

कौशिकदा मला चित्र समजावून सांगत होते. खरं तर तशी फारशी गरज नव्हती. अशा कलाकृतीपुढं नतमस्तक होणंच जास्त चांगलं.

मनात आलं, असे विलक्षण कलाकार शांतिनिकेतननं नंतर का दिले नाहीत...?

पाठीमागून बासरीचे सूर आले म्हणून वळलो.

एक संथाळ तरुण आपल्याच नादात बासरी वाजवत चालला होता.

वाटलं, शांतिनिकेतनच्या गर्द झाडीतून अस्वस्थपणे हिंडणाऱ्या रवींद्रांच्या भुताला या सुरात दडता आलं तर किती बरं होईल !

भुतालाही हे मान्य व्हायला हरकत नव्हती.

हजारावारी वाटल्या जाणाऱ्या 'विश्वभारती'च्या सर्टिफिकेटस्‌मध्ये जाऊन बसण्यापेक्षा हे निश्चित चांगलं !

□

जे शांतिनिकेतनचं तेच इतर रवींद्रनाथांचं. बंगालीबाबूला आज रवींद्रनाथ हा जीव की प्राण आहे. रवींद्रांवरची किंचितही टीका त्याला सहन होत नाही. कलकत्त्याच्या भारतीय भाषा परिषदेत मी एका कार्यक्रमासाठी गेलो होतो. बंगाली साहित्यावरच्या त्या चर्चेचा अखेरचा एकमेव निष्कर्ष होता. सर्व साहित्यात रवींद्रांचं साहित्य थोर ! जवळजवळ दीड तास चाललेलं ते तद्दन कंटाळवाणं व्याख्यान सगळेजण कीर्तन ऐकल्यासारखं ऐकत होते. व्याख्यानानंतर मी दोघा–तिघांना छेडलं. हे कलकत्ता विद्यापीठाचे एम. ए. चे विद्यार्थी. विचारलं, 'रवींद्रांच्या अनाठायी प्रभावामुळं एका परीनं बंगाली साहित्याची हानीच झाली आहे असं नाही तुम्हाला वाटत ?'

हे तिघं प्रश्न ऐकताच असे काही चवताळून माझ्या अंगावर आले की विचारू नका ! 'रवींद्रांबद्दल आणि टीकेचा सूर ? घोर अपराधच !' असा हा आवेश मी आणखी बऱ्याच ठिकाणी अनुभवला.

बंगालीबाबूला रवींद्रांबद्दल आपुलकी वाटते म्हणजे रवींद्रांचे आदर्श, त्यांचे विचार प्रत्यक्षात आणण्यासाठी तो झटतोय असा मात्र याचा अर्थ नाही. रवींद्रांना त्यानं एक सोइस्कर देवत्व देऊन टाकलं आहे. एकदा देव म्हटलं की, ती व्यक्ती माणसाबाहेर जाते आणि त्याचं अनुकरण वगैरे करायचा प्रश्नच उरत नाही हा पूर्वापार नियम बंगालीबाबूनं रक्तातच भिनवला आहे असं म्हटलं तरी वावगं ठरू नये.

## स्टेटस सिम्बॉल

मध्यमवर्गीय माणूस रवींद्रांच्या नावानं असे टिळे लावतो तर उच्चभ्रू त्यांच्या पुस्तकांचा, रेकॉर्डस्‌चा उपयोग आपल्या बौद्धिक फॅशनसाठी करतो. अजित भट्टाचार्य नावाच्या अशाच एका व्यक्तीकडे मी गेलो. गृहस्थ एका औषधकंपनीत बडे अधिकारी आहेत आणि किधरपोर भागात त्यांचा अलिशान म्हणावा इतपत बंगला आहे. बंगल्याच्या हॉलमध्ये चारही भिंती पुस्तकांनी मढलेल्या. बहुतेक पुस्तकं रवींद्रनाथांची किंवा त्यांच्यासंबंधीची. मला नवल तर वाटलंच; पण कौतुकही वाटलं. नंतर समजलं की, अजितबाबूंना बंगालीही धड येत नाही ! मग त्यांनी ही सगळी पुस्तकं वाचायचं तर सोडाच, हा त्यांच्या स्टेटसचा एक भाग आहे ! तेव्हा मात्र सणसणीत भ्रमनिरास झाला.

रवींद्रांना जी काय थोडीफार किंमत मिळाली ती नोबेल पारितोषिक मिळाल्यावरच. त्याआधी रवींद्रनाथ हा बंगालीबाबूच्या थट्टेचा एक विषय होता. कलकत्ता विद्यापीठात तर म्हणे बंगालीच्या विद्यार्थ्यांना रवींद्रनाथांची पुस्तकं देत आणि त्यातलं बंगाली सुधारायला सांगत !

किशोर आणि मैत्रेयी चटर्जी हे कलकत्त्यातलं एक प्रायोगिक जोडपं. प्रायोगिक म्हणजे आपल्याकडच्या छबिलदासी जोडप्यांसारखं. दोघंही रवींद्र–वाङ्मयाचे गाढे अभ्यासक आहेत. त्यात किशोर कवी आणि चित्रकार. मैत्रेयी 'स्टेटस्‌मन'ची संगीतसमीक्षक. त्यामुळं त्यांच्या मताला वजनही आहे.

किशोरला शांतिनिकेतनात जायचं होतं; पण घरच्यांनी जाऊ दिलं नाही. त्याबद्दल बोलताना तो आजही कडवटपणे बोलतो, 'रवींद्रनाथांबद्दलचं बंगाल्यांचं प्रेम वगैरे सगळं झूठ आहे. कलावंत म्हणून जगणं आम्हाला अजून प्रतिष्ठेचं वाटत नाही. त्यापेक्षा कार-

कुनी केलेली बरी असं मानण्याची वृत्ती आजही आहे. रवींद्रांचा थोडा तरी परिणाम असता तर असं झालं नसतं.'

शांतिनिकेतनची कशी चेष्टा व्हायची हे सांगताना तर किशोर विशेषच चिडला. बहुधा त्याच्यातल्या कलावंताची ही तडफड असावी. दात–ओठ खात म्हणाला, 'पूर्वी शांतिनिकेतनचं नाव काढलं की लोक मस्करी करायचे. गाई–म्हशी कलकत्त्याच्या रस्त्यांतून कशा जाणार, इथं झाडावर बसून बासरी कशी वाजवता येणार असं कुजकटपणे विचारायचे. शांतिनिकेतनला जाऊ का म्हणून मी घरी विचारलं तेव्हा वडलांनी मला अक्षरशः लाथ घातली!'

बंगालच्या प्रसिद्ध शिल्पकर्ती मीरा मुखर्जी यांच्याही आठवणी काहीशा याच सुरात सूर मिसळणाऱ्या आहेत. त्या हसत हसत म्हणाल्या, 'शांतिनिकेतनला जाऊ का असं नुसतं विचारायचीही आम्हा मुलींची टाप नव्हती!'

आज रवीद्रनाथांची अशी चेष्टा करण्याची कुणाची टाप नाही; पण त्यांना देव्हाऱ्यात कोंबून बंगालीबाबूनं त्यांची क्रूर चेष्टा केली आहे असं मला वाटतं. 'अमृतबझारपत्रिका' या इंग्रजी दैनिकाच्या सोमेन मुखर्जींनी नुकताच एक सर्व्हे पूर्ण केला. रवीद्रनाथांसंबंधीचे पंधरा निरनिराळे प्रश्न त्यांनी तयार केले आणि विविध क्षेत्रातल्या सोळा जणांना विचारले. प्रश्न अगदी सोपे होते. रवींद्रांचं चरित्र वाचलेला कुणीही त्यांची उत्तरं देऊ शकला असता; पण सोळा जणांपैकी एक बारावीत शिकणारी मुलगी आणि पंचेचाळीस वर्षांचा प्राध्यापकच बहुतेक प्रश्नांची उत्तरं देऊ शकले. *विशेष म्हणजे या* सोळा जणात पश्चिम बंगालचे शिक्षणमंत्री शंभूचरण घोषही होते.

बंगालमधल्या रवींद्रनाथांच्या सध्याच्या अवस्थेवर विदारक प्रकाश टाकणाऱ्या या सर्व्हेबद्दल सांगताना मैत्रेयी चटर्जी म्हणाली, 'नेमकं सांगायचं तर रवीद्रनाथांचा आम्ही शिवाजी करून टाकला आहे!'

मी फक्त केविलवाणा हसलो. स्वतःची लक्तरं अशी परप्रांतात धुवावी लागण्याचा प्रसंग विरळाच!

रवीद्रनाथांच्या या शिवाजीपणाचे इतरही अपरिहार्य पैलू आहेत. त्यांच्या एकूण कलासृष्टीतला सगळ्यात लोकप्रिय प्रकार म्हणजे रवींद्र–संगीत. रवींद्र–संगीताची ही लोकप्रियता हेरून अनेक कंपन्यांनी रेकॉर्ड्स काढल्या. गायकांनाही रवींद्र–संगीत हा यशाचा एकमेव मार्ग वाटू लागला. रवींद्र-संगीत गाणाऱ्या गायकांची संख्या भरमसाट वाढली. त्याबरोबर या संगीताचे क्लासेसही कावळ्याच्या छत्र्यांप्रमाणे उगवले. रेकॉर्ड कंपन्यांना रवींद्रनाथांमध्ये रस असण्याची सुतराम शक्यता नव्हती. त्या फक्त धंदा बघत होत्या; पण गायकांनीही तोच मार्ग चोखाळला. रवींद्र–संगीत म्हणण्यासाठी काही पार्श्वभूमी तयार व्हायला हवी, रवींद्रांच्या साहित्याच्या अभ्यास हवा हे कुणीच लक्षात घेतलं नाही. आधीच रवींद्र-संगीतातल्या हलक्या-फुलक्या चालींच्याच रेकॉर्ड निघत होत्या. त्यातल्या कठीण शास्त्रीय प्रकाराकडे ढुंकून पहायलासुद्धा रेकॉर्ड कंपन्या तयार नव्हत्या. मग या साऱ्याला हिडिस बाजारू स्वरूप आलं असलं तर नवल नाही.

ऐन बाजारात अशी रवींद्रांची विक्री चाललेली असताना बंगालीबाबूला मात्र त्याचं काहीच सोयर–सुतक नाही. कदाचित देवाच्या मूर्ती आपण विकतोच की असं तो म्हणत असावा!

कलकत्त्याच्या नॅशनल लायब्ररीत श्री. बा. जोशी भेटले. त्यांचा बंगाली साहित्याचा चांगला अभ्यास आहे. त्यांना रवीद्रनाथांबद्दल विचारलं तर ते ताडकन म्हणाले, 'आता कसले रवीद्रनाथ? आत राहिलंय ते त्यांचं भूत!'

खरं आहे; पण भूत नुसतं राहिलंय असं नाही तर ते बंगाली माणसाच्या मानगुटीवर बसलंय. खुद्द भुताची जरी उतरण्याची इच्छा असली तरी हा बंगालीबाबू त्याला ते करू द्यायचा नाही. कारण भुताला तसं मानगुटीवर बसवून घेणंच त्याच्या सोईचं आहे. मागं–पुढं पहाण्याचा मग प्रश्नच येत नाही ना!

(क्रमशः)

---

पुस्तकाच्या प्रकाशनापूर्वी ते विकत घ्यायला रांगा लागल्याची कथा कलकत्त्यातलीच.
बंगाली माणसाला पुस्तकं भरभरून विकत घ्यायचं असं वेडंच आहे.
"साहित्याची ही एवढी आवड कशी काय?" मी सुनील गंगोपाध्यायना विचारलं.
"त्याचं मूळ आमच्या समृद्ध बालसाहित्यात आहे . . ." सुनीलदा सांगू लागले.

**लाल राज्यात सात दिवस : वार्तापत्र चौथे.**

# मुक्काम कॉफी हाउस

निखिल वागळे

पुढच्या अंकात

फिरोझ रानडे

# राधाचा बी. बी. सी. : काशीबाई

'किती उशीर काशीबाई ?' राधाचे प्रश्नात्मक वाक्य संपण्याआधीच काशीबाई खास आत्मविश्वासात म्हणाली,

'उशिराचे काय घेऊन बसलात बाई ? ती पहिल्या मजल्यावरची गेली की पळून !'

'आं !' राधाची अपेक्षित प्रतिक्रिया पाहून काशीबाईला बरे वाटले. म्हणजे आता रागवारागवी तर नाहीच; पण वर कौतुकाचा चहा होणार हा तिचा अंदाज खरा ठरल्याबद्दल तिला आनंद झाला.

खरे म्हणजे पहिल्या मजल्यावरची कधी तरी असा प्रकार करणार हे सोसायटीच्या सर्व सभासदांस माहीत होते, तसेच राधास पण माहीत होते; पण राधाची आतापर्यंत मिळालेली माहिती वरच्या स्तरावरची होती, त्यामुळे म्हणावी तेव्हढी खोलवरची नव्हती.

वरच्या स्तरावरच्या चर्चेत फार काळजीपूर्वक बोलावे लागते. म्हणजे मनातून माहिती तर हवी असते; पण ती काढताना आपल्याला त्यात फार व्याज (interest) आहे हे लोकांना कळून उपयोगी नसते. आपण दुसऱ्याच्या भानगडीत कधी पडत नाही. आपल्या खाजगी आयुष्यात आपण काय करावे वा करू नये हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे, अशा विचाराचा बुरखा घ्यावा लागतो व हा बुरखा साधारण उच्च वर्ग, मध्यम–उच्च वर्ग व उच्चतर–मध्यम वर्गाच्या स्त्रिया जास्त करून वापरतात.

पूर्वी अशा उच्च, मध्यम उच्च वा उच्चतर मध्यम वर्गातल्या बायका असा बुरखा वगैरे काही वापरत नसत. सगळ्या गावातल्या वा गाव फार मोठे असल्यास आपल्या जाती–जमातीच्या पुरुषांच्या भानगडीबद्दल अगदी कोणताही आड–पडदा न ठेवता चर्चा होत असे. त्या वेळी स्त्री–समानहक्कांचे प्रस्थ इतके बोकाळले नसल्यामुळे त्या भानगडी मुख्यत्वेकरून पुरुषांच्याच समजत असत. आता पुरुष काही एकटेच भानगडी करू शकत नाहीत. भानगड बाई–पुरुषाची मिळूनच होते हे खरेच; पण त्या वेळी सगळी सत्ता, पैसा, नाव पुरुषांकडेच असल्यामुळे भानगडीना पण पुरुषांच्याच असेच मानत.

पण पुढे पुढे स्त्री-शिक्षणाचे प्रमाण वाढले. स्त्रिया घराबाहेर पडू लागल्या. त्या नाटकासिनेमातून कामे करू लागल्या. प्रथम शाळेत, मग कचेऱ्यांतून कनिष्ठ नोकऱ्या करू लागल्या. पुढे पुढे त्या वरिष्ठ जागांवर व ज्याला Executives म्हणतात तशा हुद्द्यांवर कामे करू लागल्या. तेव्हा त्यांनाही भानगडीमध्ये समान हक्क मिळू लागले. पुढे पुढे तर काही भानगडी तर फक्त बायकांच्याच असेही लोक मानू लागले.

शिक्षणाबरोबर नवीन नवीन पद्धती आल्या त्याचप्रमाणे वेळोवेळी बुरखा घालण्याची पद्धत निघाली. पार्ट्यांतून वा लग्नसमारंभात होणाऱ्या कार्यक्रमास कोणाबद्दल

काही बोलावयाचे झाले तर ओष्ठ–शलाका बिघडणार नाही ही खबरदारी घेऊनच बोलावे लागे.

पण तसा बुरखा काशीबाईशी बोलताना घालावयाची गरज नसे. काशीबाई येत असे त्या वेळी मुळी ओष्ठ–शलाका लावण्याची वेळ नसे. त्यामुळे ती बिघडण्याचा प्रश्नच नव्हता. काशीबाई आपल्या मायदेशी भाषेत सर्वांबद्दलच सर्व माहिती सर्व रसांचा वापर करून सांगत असे. त्यामुळे ती मोठी चवदार व खमंग लागत असे.

*' बसा बघू तुम्ही जराश्या. '* राधा काशीबाईस म्हणाली, ' माझाही चहा व्हायचाय. आपण दोघी चहा घेऊ व मग कामास लागू या. '

असे म्हणून राधा चहा करू लागली. मोलकरणींना घरातली सगळी कामे करू दिली तरी खरी गृहिणी तिला कधी चहा म्हणून करू देत नाही व राधा खरी गृहिणी होती हे सर्वांस माहीत आहेच.

मग चहा घेता घेता काशीबाईने राधाला पहिल्या मजल्यावरचीच्या पलायनाची माहिती इत्थंभूतपणे सागितली.

खरे म्हणजे पहिल्या मजल्यावरचे जोडपे साधे मध्यमवर्गीय. नवरा कोठल्या तरी कचेरीत कारकून, तशीच बायको पण कोठल्या तरी कचेरीत कारकून. घरात सासू व सात आठ वर्षांचा मुलगा. बायको दिसायला बरी, चुणचुणीत वगैरे.

तिने, दोन वर्षांपूर्वी कंपनीला ७५ वर्षं पूर्ण झाली म्हणून जो महोत्सव झाला होता त्यात झालेल्या नाटकात नायिकेचे काम केले होते आणि त्या नाटकामुळे त्यांच्या कुटुंबातल्या सर्वांचे म्हणजे ती बायको सोडून बाकी सर्वांचे स्वास्थ्य पुरे बिघडून गेले होते.

आता तिला वेगवेगळ्या नाटकांतून कामे करण्याच्या मागण्या येऊ लागल्या. आतापर्यंत तिला जेमतेम सेक्शनमधले लोक ओळखत होते. आता थोरल्या साहेबापासून सगळे तिला ओळख देऊ लागले होते. आपल्या नाटकात काम करावे म्हणून कोणी प्रत्यक्षपणे व कोणी साहेबातर्फे गळ घालू लागले. नवऱ्याची चिडचिड होऊ लागली. सासू खोचून, टोचून बोलू लागली मुलाकडे दुर्लक्ष होऊ लागले; पण साहेबाना नाही कसे म्हणणार ? म्हणून ती हो म्हणत गेली.

ह्याचा व्हायचा तोच परिणाम झाला. एक दिवस ती कोणा कंपनीच्या मालकाबरोबर वा दिग्दर्शकाबरोबर पळून गेली. खरे म्हणजे ती व्यवस्थित बॅगेमध्ये कपडे वगैरे भरून नवऱ्या–सासूचा निरोप घेऊन गेली होती; पण मराठीत पद्धत आहे म्हणून पळून गेली असे म्हटले एवढेच.

वर झालेले सगळे एका दमात सांगितले आहे तसे काही एका दमात झाले नव्हते. दमादमाने झाले होते व त्याच दमादमाने काशीबाईने राधाला बी. बी. सी. जसे सकाळ-संध्याकाळ एखाद्या प्रश्नाबाबत माहिती पुरवते तशी सकाळ–दुपार माहिती पुरवली होती.

ही सांगितलेली सगळी माहिती काशीबाईने राधाला पूर्वी पुष्कळ वेळा सांगितली होती. आज त्यात पळून जाण्याच्या गोष्टीची फक्त भर होती; पण कोणीही कॉंग्रेसचा पुढारी आपल्या भाषणात १९४७ सालापासूनच्या सगळ्या घडामोडीचा आढावा घेऊन शेवटी इंदिराजीच देशाला तारणार आहेत म्हणून सांगतो, तसेच काशीबाईचे झाले. तर बाईला नाही म्हातारीची काळजी, नाही मुलाची पर्वा, नाही नवऱ्याची फिकिर, गेली की बाई पळून !

मग त्या दोघींनी योग्य तो दुखवटा साजरा केला. म्हातारीचे आता कठिण आहे, नवऱ्याला जगात दाखवायला आता तोंड नाही. आता मुलाचे कसे होणार ह्याची त्यांनी हळहळ व्यक्त केली व त्या आपआपल्या कामाला लागल्या.

इंग्लंडच्या बी. बी. सी. ला जशी सगळ्या जगाची काळजी व उचापती करण्याची सवय तसेच राधाच्या बी. सी. सी. चे म्हणजे काशीबाईचे पण होते. इंग्लंडच्या बी. बी. सी. ला हिंदुस्थानातल्या हिंदू–मुसलमानाच्या दंग्याची, पाकिस्तानातल्या लोकशाही, इस्राएल–अरब संबंधाबद्दल काळजी, तसेच काशीबाईचे होते.

बर्वेमंडळी कशी कंजूष आहेत, कर्वेबाईंनी कर्त्यांना कसे दाबून ठेवले आहे, नवीन लग्न झालेले कामत जोडपे कसे दुःख्यात पडले आहे, ह्याचे कोणतेही तिखट-मीठ वा तयार मसाले न वापरता वर्णन खमंग करून काशीबाई सांगत असे. इंग्लंडची बी. बी. सी. खमंगपणामुळे प्रसिद्ध होती तशीच राधाची बी बी. सी. पण लोकप्रिय होती.

श्यामला इंग्लंडची बी. बी. सी. आवडत नसे त्याचप्रमाणे राधाची पण आवडत नसे; पण दोन्हीची त्याला चटक मात्र लागली होती. श्याम सरकारी नोकर असल्यामुळे त्याला राजकारणात फक्त ऐकीव व वाचीव भाग घेता येत असे. बहुतेक भारतीय जनतेप्रमाणे त्याला १९७१ च्या पाक–भारताच्या युद्धापासून बी बी.सी. ऐकण्याची चटक लागली होती. आणीबाणीच्या वेळी व जगजीवनराम वगैरे कॉंग्रेस सोडून गेले त्या वेळी ती अगदी शिगेला पोहोचली होती. सकाळी बी. बी. सी. ऐकावयाची व दुपारी कचेरीत त्यावर चर्चा करावयाची हे नेहमीचेच होऊन गेले होते.

पण एखादी गोष्ट नेहमीची झाली तरी ती माणसाला आवडतेच असे नाही. श्याम बी. बी. सी. नित्याने ऐकत होता तरी बी. बी. सी. चा रोख एकंदर जगाच्या भल्याकरता नसतो हे तो ओळखून होता. भारताबद्दल तर कधीच नसतो. कोणत्याही प्रश्नात बी. बी. सी. साधारणपणे भारतविरोधी भूमिका घेत असते व भारत हित–विरोधी प्रचार करते हे त्याला आवडत नसे; पण आपण नेहमी निःपक्षपणे भूमिका घेतो असा बी. बी. सी. चा दावा असे व ब्रिटिश सरकार त्याचे कौतुक करत असे.

जशी श्यामला इंग्लंडची बी. बी. सी. आवडत नसे तशीच राधाची पण आवडत नसे. तो नेहमी म्हणावयाचा की, काय


वैराण मुलखाचे
सुजलाम् सुफलाम् भूमीत
रूपांतर करणारा
थोर निग्रो संत आणि शास्त्रज्ञ
डॉ. कार्व्हर यांचे
प्रेरणादायी चरित्र

# एक होता कार्व्हर

**लेखिका : सौ. वीणा गवाणकर**
मूल्य : रुपये पंधरा
**राजहंस प्रकाशन**
१०२५ सदाशिव पुणे ३०

लोकांच्या उखाळ्या-पाखाळ्या काढता ? पण त्यालाही उखाळ्या-पाखाळ्याची चटक लागली होती. फक्त काशीबाई असेपर्यंत तो यात आपल्याला रस नाही असे दाखवत असे; पण ती गेली की, राधा-श्यामचे कुचु-कुचू बोलणे सुरू होई.

दीड-दोन महिन्यांपूर्वीच मोठ्या अन-पेक्षितपणे फॉकलंड बेटांचा प्रश्न उभा राहिला. जित्याची खोड मेल्याशिवाय जात नाही; पण इंग्लंडची खोड आता त्यांचे महाराज्य जाऊन चांगली तीस-चाळीस वर्षे झाली तरी गेली नव्हती. आपण अजुनी जगात एक सत्ता आहोत असेच त्यांना वाटत असे. तरी बरे, सुएझ कालव्यात त्यांचे चांगले नाक कापले गेले होते. कदाचित म्हणूनच त्यांनी चांगली धारदार नाकाची पंतप्रधान निवडली होती !

फॉकलंडच्या बातम्या येऊ लागल्या होत्या. दुसऱ्या महायुद्धात जसा हिटलर जिंकला व चर्चिल हरला की, हिंदी बांधवांस पुत्र-जन्माइतका आनंद होत असे, आता तसाच पुत्र-जन्म होऊ लागला होता. परत श्याम उत्साहाने बी. बी. सी. ऐकू लागला होता.

नेहमी जगाच्या उचापती करणाऱ्या व लावालावी करणाऱ्या बी. बी. सी. ची पंचा-ईत झाली होती, खरी निःपक्ष बातमी द्यावी तर राष्ट्राच्या मानाचा प्रश्न. इंग्लडला पक्ष-पाती द्यावी तर बी. बी. सी. च्या नावाचा प्रश्न. हो ना करता करता बी. बी. सी. ने 'पॅनोरामा' ह्या कार्यक्रमात फॉकलंडबद्दल वेगळी व सरकारच्या विचाराच्या विरुद्धची बाजू मांडली व सगळ्या इंग्लंडात व त्यातल्या त्यात सरकारी पक्षात मोठा भडका उडाला. आतापर्यंत हिंदुस्थानवर व इतर राष्ट्रांवर नि.पक्षपणाच्या नावाखाली टवाळी करणाऱ्या बी. बी. सी. चे कौतुक करणाऱ्या सरकारलाच आता जखम झाल्यामुळे हे शस्त्र दुधारी आहे हे लक्षात आले होते.

जे आतरराष्ट्रीय राजकारणात होते तेच आतर-गाळ्यातून होते. त्या सकाळी राधा खाली आलेल्या भाजीवाल्याकडून भाजी घेऊन जिन्यातून वर येत होती. धाप लागली म्हणून ती मध्यावर थोडी थाबली. कर्वेबाई वरून खाली येत होत्या. कर्वेबाईंचे व राधाचे विळ्या-भोपळ्याइतके सख्य होते. येथे विळा-भोपळा हे शरीरप्रकृतीला उद्देशून नाही. वृत्ती-प्रकृतीला उद्देशून आहे.

'हल्ली साहेब हॉलमध्ये झोपतात वाटते?' कर्वेबाईंनी हे विचारले व उत्तराची वाट न पहाता राहिलेल्या पायऱ्या चटाचटा उतरून गेल्या. त्यांना उत्तराची अपेक्षा नव्हतीच. फक्त जखम करावयाची होती व ते काम झाले होते.

जखम झाल्यामुळे राधाचा चेहरा पडला व अंगाचा संताप झाला; पण त्याचे कारण साहेब हॉलमध्ये झोपले होते म्हणून नाही, तर ते सर्वजण सोडून कर्वेबाईला कळले व तेही लगेच सकाळी सकाळी म्हणून !

'ह्या टवळीला सगळ्या जगाच्या उचा-पती. आमचे साहेब कुठेही झोपतील, तिच्या घरी तर येऊन झोपत नाहीत ना? मग झाले तर,' ह्या विचारात राधा राहिलेल्या पायऱ्या चढली; पण ते फार जड गेले.

कर्वेबाईंच्या प्रश्नात खडूसपणा असला तरी सत्याचा पुरेपूर अंश होता. बाकी नवरा-बायकोत होतात तसे राधा-श्याममध्येही लहान-मोठे तणाव निर्माण होत. काल रात्री असाच तणाव निर्माण झाला होता. अर्थात हे फक्त काल रात्रीचेच होते असे नाही.

व्हायचे काय की राधा दुपारची लवंडत असल्याकारणाने रात्री तिला लवकर झोप लागत नसे. मग ती काहीबाही वाचत रहात असे; पण दिवा जळत असला की श्यामला झोप येत नसे. मग तणावाला काय मर्यादा ? काल कमाल झाली. राधा म्हणाली होती की, एकदा डोळे बंद केले की अंधार काय, उजेड काय ? एकच. श्यामचे म्हणणे हे तत्त्व झोप लागल्यावर. झोप लागेपर्यंत दिव्याचा त्रासच होतो. वादावरून वाद वाढत गेला व परिणामी श्याम आपले हंतरूण-पांघरूण घेऊन हॉलमध्ये झोपायला गेला होता. रात्री हंतरूण-पांघरूण श्यामने हॉलमध्ये नेले होते तरी सकाळ झाल्यावर ते परत नेणे राधाचे काम होते. त्यामुळे ते तसेच पडून होते.

हे सगळे काल रात्री ९॥-१० च्या सुमा-राला झाले व आता जेमतेम ८-८॥ होता-हेत तर ह्या कविणीला लगेच हे कळले कसे ? मुळात म्हणजे कळलेच कसे ? असा विचार करत राधा घरात आली. काशीबाई भांडी घासत होती. घासता घासता ती राधाला म्हणाली, 'बाई, त्या कामतांनी प्रश्न सोड-वला. म्हणजे त्याचे......'

आणि राधाच्या डोक्यात एकदम प्रकाश पडला. आपण खाली भाजी आणायला गेलो तेवढ्यात ह्या महामायेने कविणीला सांगितले असणार व अशी नेहमीच सांगत असणार. काशीबाई आपल्याला सगळ्या जगाचे सांगते तसेच सगळ्या जगाला आपले सांगत असणार हे आपल्या कधी लक्षात कसे नाही आले ? आपले तिचे खास संबंध आहेत असे आपण कसे गृहीत धरून चाललो ?

'काशीबाई, कामत आणि त्यांची बायको आपल्याला काय करायचे आहे त्यांच्याशी ?' राधा.

आज बाईंना झाले आहे तरी काय ? ह्या आश्चर्य-प्रश्नार्थक मुद्रेने काशीबाई राधाकडे बघतच राहिली.

□


## — नवीन दाखल झालेली पुस्तके —


1. **Luciano's Luck**–( Bestseller–thriller )–Jack Miggins.
2. **Love Play**–( Bestseller–Novel )–Rosemary Rogers.
3. **Chances**–( Bestseller–Novel )–Jackie Collins.
4. **Tar Baby**–( Bestseller–Novel )–Toni Morrison.
5. **License Renewed**–( James Bond thriller )–John Gardener.

१. आणि क्षिप्रा वाहात राहिली–(कादंबरी)–निरंजन जमीदार.अनुवाद–श्रीपाद जोशी
२. डॉ. रखमाबाई : एक आर्त–( चरित्र )–मोहिनी वर्दे
३. कहाणी थिबा राजाची–द्वारकानाथ लेले

★ जे ग्रंथ व कलाकौशल्यादी वस्तूंचा विध्वंस करतात त्याना Vandals म्हणतात. आपण जर ग्रंथालयाचे पुस्तक कायमसाठी परत केले नाही किंवा ग्रंथालयाची बाकी बुडवली तर ते याच प्रकारात मोडेल. ग्रंथालये ही मंदिरे असतात !

**दि फिनिक्स लायब्ररी**

७२७, सदाशिव पोस्टासमोर, पुणे ३०.



# शरद जोशींबरोबर ...पंजाबात

**शेतकऱ्यांची स्थिती कधीही सुधारू नये, तो आहे तसाच दरिद्री व परावलंबी राहावा अशी शासनाची आणि प्रचलित अर्थव्यवस्थेची इच्छाच आहे.......**

**लेखक : अरविंद वामन कुलकर्णी**
**लेखांक : तिसरा**

रविवार दि. ३० मे १९८२ रोजी किसान युनियनची जाहीर सभा होती. त्याआधी शोभायात्रा काढली जाणार होती. त्यासाठी ठरलेल्या ठिकाणी आम्ही सकाळी नऊ वाजता हजर झालो. वेगवेगळ्या ठिकाणचे किसान जमत होते. त्याच वेळी भारतीय किसान युनियनचे उपाध्यक्ष मेजर ईश्वर दयाळ त्यागी हेही दिल्लीहून आले. वडील आजारी असल्यामुळे ते आधी येऊ शकले नव्हते (असे त्यांनीच सांगितले). जमलेल्या किसानातील तीनेकशे जणांची एक खास बैठक घेण्यात आली. त्यात मेजर त्यागी बोलले; पण तिचे संचालन बलबीरसिंगांनीच केले. या तरुण माणसाची त्या वेळी कार्यक्षमता व कुशलता फार जाणवून गेली. त्याने सर्वांना मिरवणुकीचा मार्ग समजून दिला. घोषणा सांगितल्या आणि सर्वांत मुख्य म्हणजे त्यातल्या ५०–७५ लोकांचा एक ट्रॅफिक–वाहतूक विभागच तयार केला. त्यांनाही ठराविक रस्ते व चौक नेमून दिले. तिथे उभे राहून त्यांनी वाहतुकीचे नियंत्रण करायचे होते. ही पर्यायी व्यवस्था होती. पोलिसांशी तणातणी नको म्हणून आपण असे नेहमी करीत असल्याचे त्याने नंतर आम्हाला सांगितले. तोवर बाहेर आवारात खूपच गर्दी झाली होती. 'दृश्यां'ची तयारीही झाली होती. किसान युनियन झिंदाबादच्या घोषणा देत लोक जथ्याजथ्यांनी तिथून बाहेर पडले.

शोभायात्रेतील दृश्येही कल्पक व अन्वर्थक होती. नाना तऱ्हेच्या कर्जवसुलीच्या नोटिसांचे फलक पार्श्वभूमीवर लावून डोक्याला पगडी व कमरेला फक्त लंगोटी असा एक किसान उभा होता. त्याच्या एका हातात शेतीची काही अवजारे होती तर दुसऱ्या हातात 'निदान ही लंगोटी तरी ठेवा' असा एक फलक होता. दुसऱ्या एका किसानावर रासायनिक खतांची पोती व जंतुनाशकांच्या बाटल्या यांचे इतके ओझे लादले होते की, त्याची पगडी ढळायला आली होती. एका 'दृश्या'त एक बंद पडलेला ट्रॅक्टर दाखविला होता. त्याला बैल म्हणून पंजाब युनियनचे पदाधिकारीच बांधलेले होते आणि मागून डझनभर किसान तो ट्रॅक्टर ढकलीत होते. पिकांवर घेतलेल्या कर्जाचा फलक हातात घेतलेला व साखळदंडाने जखडलेला एक किसान दाखविला होता. त्याच्या साखळीचे टोक ज्याच्या हाती होते तो मागे उभा होता. त्याच्या खांद्यावरच्या फलकावर लिहिले होते, 'सोसायट्यांचा रजिस्ट्रार.' एक दृश्य तर फारच परिणामकारक वाटले. डोक्यावर भलेमोठे गव्हाचे पोते घेतलेला एक तगडा जवान शेतकरी शून्यात नजर लावून नुसता विमनस्कपणे उभा होता! या शोभायात्रेत हजारो किसान सामील झालेले होते. झिंदाबादचे नारे आसमंत दणाणून सोडत होते. पादचाऱ्यांमागून शेकडो ट्रॅक्टर्स व ट्रॉलीज रांग धरून चालल्या होत्या. किसानांची वाहतूक–व्यवस्था चोखपणे काम करीत होती. पोलिसांना दंडुके हलवीत फक्त बघ्याची भूमिका घ्यायला लागत होती. वास्तविक ही परिषद सुरू झाल्यापासून पोलिसखात्याची वर्दळ भारीच वाढली होती. एकदा तर विजय जावंधियांच्या शेजारी जेवायला बसलेल्या आणि आपण लुधियाना कृषिविद्यापीठातील व्याख्याते आहोत असे सांगणाऱ्या एका रुबाबदार तरुणाची चांगलीच खरडपट्टी अजमेरसिंगांनी काढली होती. थोडी जास्त तयारी करून किसानांमध्ये हेरगिरी करण्यास या असेही वर बजाविले होते!

मात्र असे दिसले की, पंजाबी किसान युनियनला पोलीस बरेच बिचकून वागतात. आजवर त्यांनी कशाचाही अतिरेक केलेला नाही. वास्तविक मुळात पंजाबी माणूस हा दांडगट व तसा भडक माथ्याचा आहे; पण त्याने केलेल्या आंदोलनात, महाराष्ट्र वा कर्नाटकात झालेल्या पोलिसी अत्याचारासारखे अत्याचार होऊ शकले नाहीत. कदाचित तिथले शासन किसानाला थोडी जास्त किंमत देत असेल. किसानाच्या रक्ताचीही त्या शासनाला थोडी जास्त मातब्बरी वाटत असेल किंवा असे असेल काय की, शरद जोशींच्या नेतृत्वाखाली नवा अर्थविषयक विचार घेऊन जसा कांदा, ऊस व तंबाकू पिकविणारा शेतकरी जागा झाला त्या आर्थिक भूमिकेवरून पंजाबचा शेतकरी जागा झाला नव्हता हे अत्याचार न करण्यामागचे कारण असेल ?

## पहिली जाहीर सभा

आर्य हायस्कूलच्या मैदानावर आम्ही पोहोचलो तेव्हा दुपारचे बारा वाजायला आले होते. मैदानावर खूप मोठा शामियाना उभारलेला होता. एका बाजूला भव्य व्यासपीठ उभारलेले होते. तीन-चार मायक्रोफोन्स त्यावर उभे होते. व्यासपीठाच्या मागच्या बाजूला वीज गेली तर पर्यायी व्यवस्था म्हणून बॅटरीचा पुरा सरंजाम पसरलेला होता. व्याख्याने टेप करण्यासाठी एक माणूस त्याची साधने घेऊन बसला होता. व्यासपीठ प्रशस्त असल्यामुळे त्यावर बरीच माणसे बसलेली असली तरी गर्दी भासत नव्हती. आम्ही गेलो तेव्हा लुधियानाचे विक्रमसिंग तुरकोट यांचे भाषण चालू होते. सभेचे संचालन श्री. अजमेरसिंग लाखोवाल (पंजाबचे जन. सेक्रेटरी) हे करीत होते. त्यांनी लगेच माईक ताब्यात घेतला आणि 'सरद जोसी' आल्याचे सांगून त्यांच्या स्वागतासाठी नारा देण्यास सांगितले. सर्व बाजूंनी 'किसान युनियन झिंदाबाद' हा घोष दणाणून उठला. त्यामुळे उठलेले रोमांच अंगावर असतानाच आम्ही सर्वजण व्यासपीठावर जाऊन स्थानापन्न झालो. श्रीकांत तराळ आणि मी अशा आम्ही दोघांनी खांद्याला लावलेल्या पिशव्यांतून डायऱ्या बाहेर काढल्या आणि लेखण्या सरसावल्या.

शरद जोशींची पंजाबातील (किंबहुना महाराष्ट्र-कर्नाटक ही राज्ये सोडली तर बाहेरच्या राज्यातील अशी ही) पहिलीच जाहीर सभा होती. दोन दिवसांच्या चर्चासत्रात त्यांनी चांगली छाप पाडली होती. महाराष्ट्रात व सीमाप्रदेशात त्यांनी लाखांच्या सभा गाजविल्याही होत्या; पण पंजाबसारख्या ठिकाणी भाषेची अडचण मोठी होती. आपले विचार हिंदी भाषेच्या उपलब्ध ज्ञानाच्या आधारावर चर्चासत्रात त्यांनी यशस्वीपणे उपस्थितांपर्यंत पोहोचविले होते; पण आता हजारोंच्या संख्येने पुढे पसरलेल्या सर्वसामान्य पंचनद-प्रदेशपुत्रांशी त्यांना संवाद प्रस्थापित करायचा होता. त्यावर या दौऱ्याचे नाही म्हटले तरी यशापयश अवलंबून होते. शरद जोशींच्या मनावर या जाणिवेचे दडपण आले होते की नाही हे सांगणे कठीण आहे. ते नेहमीसारखे शांत होते. समपणे दाटलेला जनसंमर्द न्याहाळीत होते. विजय जावंधिया काही महिन्यांपूर्वी संगरूर या पंजाबातील एका ठिकाणी भरलेल्या किसान मेळाव्यास हजर राहिलेला होता. त्याला एकूण पंजाबी किसानांची त्या फेरीत थोडीबहुत कल्पना आलेली असल्यामुळे तो बराच निःशंक होता. आत्मविश्वासाने आजूबाजूच्या उपस्थितांतील परिचित चेहरे शोधीत होता. भास्करराव, श्रीकांत आणि मी मात्र व्यग्र होतो. समोरच्या गर्दीचा अंदाज घेत होतो. त्या तसल्या गर्दीत, आता नेमके आठवत नाही, भास्कररावांनी किंवा श्रीकांतने एका बाजूला जागा धरून बसलेल्या पुण्याच्या गुप्तचर अधिकाऱ्यास बरोबर हेरलं !

सभेला तीसेक हजार लोक असावेत. त्या समुदायावरून नजर फिरविताना मोठी मौज वाटत होती. शामियान्याचे छत रंगीबेरंगी नक्षीदार कापडाचे होते. खांबही वेगवेगळ्या एकरंगी कापडांनी आच्छादिलेले होते. अशा या मंडपात दाटलेला जनसंमर्दही तसाच होता. बळकट शरीरे, भरगच्च दाढीमिशा, विविध रंगांतील कुडते-पायजमे आणि वेगवेगळ्या आकर्षक पद्धतीने बांधलेल्या रंगीत पगड्या यांचा एक विशाल थवाच थवा दिसत होता. जवळजवळ सर्वांच्या मुद्रेवर व डोळ्यात बालसुलभ भाव दाटलेले. मोठ्या कुतूहलाने त्यांच्यातील नजरा शरद जोशींवर आणि त्यांच्याबरोबर आमच्यावर स्थिरावल्या होत्या. एक विशेष गोष्ट जाणवली ती म्हणजे त्यांच्या नजरेत संशय नव्हता. कदाचित् त्याचे कारण किसान युनियनने गेल्या दहा वर्षांतील कार्यामुळे निर्माण केलेला विश्वास हे असावे. व्यासपीठाच्या डाव्या बाजूला पन्नासभर स्त्रिया बसलेल्या होत्या. दाढीमिशा व पगड्या वजा केल्यास पुरुषांसारख्याच भासणाऱ्या.

श्री. अजमेरसिंग लाखोवाल यांनी 'वाह गुरुजीका खालसा, वाह गुरुजीकी फते। जो बोले वो सो निहाल, सत् श्री अकाल' असा रामराम करून प्रास्ताविक केले. ते पंजाबीत बोलत होते. त्यांच्यानंतर गुरुबचनसिंग पामिया (पंजाबचे कोषाध्यक्ष-खजाची), मंजेतसिंग कातिया (जन. सेक्रेटरी, लुधियाना), डोगरसिंग (उपाध्यक्ष, फिरोझपूर), ॲड. करमसिंग (जन. सेक्रेटरी, हरयाना), डॉ. रामकृष्ण गांधी (कानपूर-उत्तरप्रदेश), विनयकुमार मुनीमजी (इंदूर-मध्यप्रदेश), विजय जावंधिया (नागपूर, महाराष्ट्र), अजेबसिंग खारा (फिरोझपूर), भूपेंद्रसिंग मान (अध्यक्ष, पंजाब), बलबीरसिंग राजेवाल (जन. सेक्रेटरी-भारतीय किसान युनियन), मांगीराम मलिक (अध्यक्ष, हरयाना), सजबीरसिंग आर्य (छपरौली-मीरत-उत्तरप्रदेश) यांची पंजाबी व हिंदी भाषेत भाषणे झाली. सर्वांनीच किसानांच्या दु:स्थितीच्या चित्रणावर भर दिलेला होता. अशा प्रतिकूल परिस्थितीवर मात करण्यासाठी सर्व शेतकऱ्यांनी एकत्र आले पाहिजे, भारतातील सारा किसान एकवटला तर त्याची उन्नती अशक्य नाही हाच विचार प्रामुख्याने सर्वांनी मांडला. यशस्वी लढे दिल्याबद्दल पंजाबच्या शेतकऱ्यांचे कौतुक व अभिनंदनही केले गेले. याच काळात हरयानात केव्हढा तरी राजकीय तमाशा चालू होता. त्याचे पडसाद भाषणांवर उमटले नाही तरच आश्चर्य ! ॲड. करमसिंग हे हरयानातील हिस्सार भागाचे. त्यांनी चाललेल्या सुंदोपसुंदीचे मार्मिक वर्णन करून टाळ्या मिळवल्या. तिथे चाललेली स्पर्धा ही केवळ सत्तेसाठी व स्वार्थापोटी आहे असे सांगून त्यामुळे किसानांचा कसलाही लाभ होणार नसल्याचे स्पष्ट केले. क्वचित काही बोचकारे सोडले तर वक्त्यांच्या भाषणाचा रोख राजकारणावर नव्हता; पण सर्वांच्यावर जोशींच्या चर्चासत्रातील विश्लेषणाचा बराच परिणाम झाल्याचे मात्र जाणवत होते. प्रत्येक वक्त्याला ५-७ मिनिटांची वेळ

दिलेली होती. एखादा वक्ता जास्त वेळ घेऊ लागला तर घंटा वाजविण्याची इथे पद्धत नव्हती. अशा वेळी सभेचा नियंत्रक फक्त त्याच्या शेजारी उभा राहात असे. भाषण आवरायला सांगतही नसे. वक्ता आपोआप भाषण गुंडाळीत असे. मोठी परिणामकारक; पण अहिंसात्मक अशी ही पद्धती आम्हा सर्वांनाच फार आवडली. तसेच देणग्यांचे. व्यासपीठावर एका बाजूला दोन माणसे त्या गोळा करीत होती. व्याख्यानामध्ये दात्यांची नावे व दानाच्या रकमा जाहीर केल्या जात.

## चार ठराव .... इंडिया विरुद्ध भारत

त्यानंतर भूपेंद्रनाथ मान आणि अजमेरसिंग लाखोवाल या दोघांनी ठराव मांडले व त्यांचे स्पष्टीकरण केले. तसे हे ठराव आदल्या दिवशीच तयार होताना ऐकले होते; पण दाटलेल्या जनसंमर्दासमोरील त्यांचे अवतरण वेगळेच वाटू लागले. पहिल्या ठरावात तीन कलमे होती.

(अ) शेतकऱ्याला रास्त भाव न देणाऱ्या शासनाच्या धोरणाचा ही युनियन निषेध करते. विशेषत: या वर्षी शासनाने स्वीकारलेले धोरण खास अन्याय्य असे आहे. त्याचा निषेध म्हणून ही युनियन ताबडतोबीने एक आर्थिक आंदोलन उभे करू इच्छिते आणि देशातील सर्व शेतकऱ्यांना असा आदेश देते की, त्यांनी ३१ ऑगस्ट १९८२ पर्यंत ट्रॅक्टर्स, डिझेल इंजिन्स आणि विजेवर चालणाऱ्या मोटर्स खरेदी करू नयेत. हे आंदोलन आणखी तीव्र करण्यासाठी, शेतीमालाला आज दिल्या जाणाऱ्या किमतीच्या पातळीत मुळीच परवडत नाहीत म्हणून शेतकरी रासायनिक खते, जंतुनाशके आणि हरितक्रांतीसाठी आवश्यक म्हणून सांगितल्या जाणाऱ्या इतर साधनांचा अवलंब करण्याचेही बंद करील. याबद्दलच्या अधिक सूचना त्या त्या वेळी देण्यात येतील.

(ब) ही युनियन देशातील विविध भागात, विशेषत: तामीळनाडू व कर्नाटक राज्यांत आंदोलने करणाऱ्या शेतकऱ्याना संपूर्ण व कृतिशील पाठिंबा जाहीर करते आहे. कर्नाटकात पोलिसाच्या गोळीबाराला बळी पडलेल्या किसान हुतात्म्यांना ही युनियन श्रद्धांजली अर्पण करते आहे.

(क) महाराष्ट्रातील शेतकरी संघटनेने दुधाला रास्त भाव मिळविण्यासाठी एक आंदोलन करण्याचे योजिले आहे. गुजराथमधील शेतकऱ्यांनी त्याला पाठिंबा दिलेला आहे. हरयाना, पंजाब, उत्तरप्रदेश, दिल्ली, तामीळनाडू व कर्नाटक येथील शेतकरीही आज असे जाहीर करतात की, तेही महाराष्ट्राच्या जोडीने आंदोलने सुरू करतील. या आदोलनाची तारीख योग्य समयी जाहीर करण्यात येईल.

संपूर्ण देशातील किसान चळवळीच्या दृष्टीने या ठरावाला उद्या एक ऐतिहासिक महत्त्व प्राप्त व्हायचे आहे. महाराष्ट्रातील शेतकरी संघटनेच्या प्रस्तुत दूध-आंदोलनाला तर यामुळे एक व्यापक आधार गवसलेला आहे. 'इंडिया 'चे आर्थिक बळ कमी करण्यासाठी 'भारता 'ने केलेली पहिली व्यापक, जागृत नि चतुर हालचाल म्हणून यातील पहिल्या कलमाची उद्याला नोंद करावी लागणार आहे. वरचेवर जोरदार टाळ्या नि घोषणा देऊन या ठरावाचे स्वागत करण्यात आले आणि दोन्ही हात वर करून तिथे जमलेल्या हजारो स्त्रीपुरुष किसानांनी तो उत्साहपूर्ण वातावरणात संमत केला.

यापुढील पास झालेले तीन ठरावही असेच महत्त्वाचे होते. राजकारणनिरपेक्षता आणि अर्थमूलकता ही त्यांची वैशिष्ट्ये म्हणून सांगता येतील. दुसऱ्या ठरावाचा पहिला भाग असा आहे. 'शेतकऱ्याच्या मालाला रास्त किमती न देण्याचे धोरण असल्यामुळे आज शेतकऱ्याला कर्जफेड करणे अशक्य आहे. अशा कर्जाबद्दल शासकीय आणि निमशासकीय संस्थांनी शेतकऱ्यांशी केलेली करारपत्रे देशातील कायद्याच्या दृष्टीने अनैतिक कराराच्या स्वरूपाची अतएव निरर्थक ठरताहेत. त्यासाठी अशी कर्जे व त्यावरील व्याज ताबडतोब रद्द करण्यात यावे अशी मागणी ही युनियन करीत आहे. जर शासनाने हे ऐकले नाही तर योग्य समय पाहून कर्जफेडीच्या प्रश्नावर किसान युनियन एक सर्वंकष लढा उभा करील.'

या ठरावातील दुसरा भाग पंजाब, हरयानातील किसानांच्या प्रश्नाशी संबंधित आहे. 'कालव्यांच्या वीट-बंदिस्तीबद्दलची (brick-lining of water channels) शेतकऱ्यांवर लादलेली कर्जे अयोग्य, अन्याय्य आणि काहींच्या बाबतीत तर लबाडीची आहेत. पंजाब व हरयानाच्या शासनांनी ती रद्द करण्याचे आश्वासनही दिलेले आहे. सध्या तरी त्यांची वसुली थांबविण्यात आलेली आहे. ती प्रशासकीय अडचणीमुळे थांबविली आहे अशी युनियनची कल्पना आहे. हे वसुलीचे काम पुन्हा सुरू झाल्यास पंजाब व हरयानातील किसान युनियनला एक व्यापक असे आंदोलन उभे करणे भाग पडेल.'

तिसऱ्या ठरावाची दोन कलमे पुढीलप्रमाणे आहेत– (अ) वादळ व अकाली वर्षाव यामुळे शेतकऱ्याचे झालेले नुकसान शासनाने पूर्णपणे भरून द्यावे अशी ही युनियन मागणी करीत आहे. (ब) त्याचप्रमाणे मार्केट-कमिट्याकडून घेतल्या जाणाऱ्या मार्केट-फीचे रूपांतर 'नैसर्गिक आपत्तिनिधी' त करण्यात यावे आणि अशा नैसर्गिक आपत्तीनंतर या निधीतून पीडित शेतकऱ्याला ताबडतोब नुकसानभरपाई मिळावी अशीही मागणी ही युनियन शासनाकडे करते आहे.

शेवटचा चौथा ठरावही एकूण कृषिजगताच्या दृष्टीने फार महत्त्वाचा आहे. तो असा–' शेतीमालाच्या साठा, प्रक्रिया, व्यापार व निर्यात यासंबंधीचे सर्व निर्बंध शासनाने दूर करावेत. शेतीमालाचे साठे व त्यावरील प्रक्रिया यासंबंधी परदेशात झालेल्या तांत्रिक सुधारणाच्या स्वीकाराबद्दल शेतकऱ्यावर कसलीही बंधने असू नयेत. त्याबाबतीत उपयोगी पडेल अशी यंत्रसामुग्री परदेशांतून आयात करण्याची शेतकऱ्याला विनानिर्बंध परवानगी असावी.'

ठरावांच्या विवेचनाला जोडूनच भूपेंद्रसिंग व अजमेरसिंग या दोघांनी शरद जोशीचा सभेला परिचय करून दिला. पंजाबी भाषेत बोलत असल्यामुळे ते नेमके काय सांगत आहेत हे आम्हाला कळत नव्हते; पण अगदी समोरच्या लोकांच्या मुद्रेवरील बदलते भाव पाहता वक्त्यांच्या तोंडून कौतुकाचे, प्रशंसेचे उद्गार बाहेर पडत असावेत असे वाटले. जोशी बोलायला उभे राहिले तेव्हा टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला. लोकांचे औत्सुक्य शिगेला पोहोचलेले दिसले. 'पुढाऱ्या 'सारखा न दिसणारा, न वागणारा आणि एखाद्या सामान्य परिचित मुलकी वा सनदी अधिकाऱ्यासारखा वाटणारा, साध्या सुती पँट–बुशशर्टमधील हा माणूस आता काय व कसे बोलतो याकडे सभेला जमलेल्या ग्रामीण भागातील किसान सभाजनांचेच नव्हे तर

व्यासपीठावर उपस्थित असलेल्या छोटयामोठया नेत्यांचेही लक्ष लागून राहिले होते. जाहीर सभेत सर्वचजण जोशींना प्रथम ऐकणार होते.

### शरद जोशी–रिश्ता जुनाच

त्या दिवशी जोशी बोललेही फार छान! हिंदी भाषेबद्दल प्रारंभी ते साशंक असावेत; पण लवकरच त्यांच्या लक्षात आले की, श्रोते पंजाबी आहेत आणि त्यांना आपली हिंदी त्रासदायक वाटत नाही. 'जेल'च्या ऐवजी 'खिसा' हा शब्द वापरून, तो हाताने दाखविला की भागते! त्यातून आलेल्या विश्वासाच्या जोरावरच ते त्यांचे नवे 'भारतीय' बनावटीचे अर्थशास्त्र (महाराष्ट्राप्रमाणे पंजाबतही) आपल्या पहिल्याच (हिंदी) भाषणात सर्वसामान्य श्रोत्यापर्यंत पोहोचवू शकले.

व्याख्यानाच्या प्रारंभीच त्यांनी शहीद भगतसिंगाचा गौरवपूर्ण उल्लेख केला आणि असे सांगितले की, 'आपली स्वतःची शेती ज्या चाकणनजीकच्या आंबेठाण नावाच्या खेडयात आहे ते गाव राजगुरूनगर तालुक्यात आहे. ह्या राजगुरूने भगतसिंगाला क्रांतिकार्यात मृत्यूच्या घटकेपर्यंत साथ दिलेली आहे. तेव्हा पंजाब आपणास किंवा आपण पंजाबास नवखे नाही आहोत. हा रिश्ता जुना आहे. त्याला उजळा देण्यासाठीच आपले आगमन घडते आहे. त्यातही पंजाबची भूमिका वडील बंधूची आहे. १९७२ साली स्थापन झालेली 'खेती बाडी युनियन' ही महाराष्ट्रातील 'शेतकरी संघटने'चे वडील भावंडच होय.' जोशीच्या या 'नमना' ला कडाडून टाळया मिळाल्या नसत्या तरच आश्चर्य!

जोशी पस्तीसेक मिनिटे बोलले. त्यांनी आपल्या या भाषणाची बांधणीही मोठी ठाशीव केली होती. आटोपशीर नि नेमक्या स्वरूपात त्यांनी अनेक मुद्द्याना स्पर्श केला. स्वातंत्र्य मिळून ३५ वर्षे झाली तरी देशातील ग्रामीण परिसराचे व शेतकऱ्याचे दैन्य व दारिद्र्य का दूर झाले नाही या सवालाला केंद्रस्थानी ठेवून त्यांनी आपले विचार मांडले. शेतकऱ्याची स्थिती कधीही सुधारू नये, तो आहे तसाच दरिद्री व परावलंबी राहावा अशी शासनाची आणि प्रचलित अर्थव्यवस्थेची इच्छाच आहे असे त्यानी सांगताच सर्वच श्रोत्यांनी कान टवकारले..

त्यानंतर त्यानी अतिशय सुलभपणे गोऱ्या इंग्रजांचा आणि ते गेल्यानंतर त्यांची जागा घेणाऱ्या काळया इंग्रजांचा वसाहतवाद सर्वांना समजावून दिला. औद्योगिक प्रगतीसाठी शहरातच भांडवलसंचय व्हावा असाच सर्वांचा प्रयत्न असून त्यासाठी शेतकऱ्याच्या शेतीमालाला नेहमीच पडेल भाव देण्याचे धोरण अंगिकारले जात आहे. शेतीमालाला कधीच संरक्षण मिळत नाही. ज्या वेळी शेतीमालाचे उत्पादन कमी आलेले असते तेव्हा शेतकऱ्याला बऱ्यापैकी भाव मिळून चार पैसे गाठी लादण्याची संधी आलेली असते. अशा वेळी त्याच्याकडून कमी भावाने सक्तीची लेव्ही वसूल केली जाते. उलट ज्या वेळी शेतीमालाचे उत्पादन मुबलक होते तेव्हा बाजारातील भाव कोसळलेले असतात अशा वेळी शासनाने किमान भाव बांधून देणे आवश्यक असते; पण शासन शेतकऱ्याला वाऱ्यावर सोडून देते. बाजारात येईल तो दाम घेऊन त्याला गप्प बसावे लागते. शेतीमालाला लेव्ही; पण जीवनाच्या दृष्टीने तितक्याच आवश्यक असलेल्या औषधांना मात्र शासन लेव्हीचे नियम लावीत नाही.

शेतीमालाचे भाव नक्की करण्यासाठी सरकारने नेमलेल्या ए. पी. सी. चे त्यांनी व्यवस्थित वाभाडे काढले. अत्यंत चुकीच्या माहितीचा आधार घेऊन खर्चाचा तपशील जमा करताना औषधफवारणीचा दर दर हेक्टरी दहा–बारा पैसे धरला जातो हे सांगताच लोकांनी निषेधपर उद्गार काढले. औद्योगिक उत्पादनाच्या किमतीबाबत मात्र शासन इतके काटेकोर नसते. गेल्या काही वर्षांत कपाशीचा भाव मुळीच वाढला नाही; पण कापडाच्या किमतीत मात्र सतत वाढ होते आहे.

शेतीमालाला भाव मिळू नये म्हणून शासन काहीही करायला तयार असते. पाकिस्तान व अमेरिका ही शत्रुराष्ट्रे म्हटली जातात. शासनाला अडचणीत आणणाऱ्या कसल्याही हालचालीत अशा परकीय सत्ताचा हात आहे, असे सांगण्यात येते. आमचे शासन या देशातल्या गहू पिकविणाऱ्या शेतकऱ्याला, त्याचा उत्पादनखर्च भरून काढणारा २४५ रुपये हा दर द्यायला तयार नाही; पण अमेरिकेतील शेतकऱ्याला निकृष्ट गव्हाचे मात्र २७० रु. प्रतिक्विंटल दाम मोजायची तयारी दाखविते. भारतातील कापूस–उत्पादकाला ७०० रुपये देत नाही; पण पाकिस्तानातील कापूस–उत्पादकाला मात्र ९०० रु. चा भाव देते. तेव्हा शत्रुराष्ट्रांना मदत करते आहे तरी कोण?

### लढा शासनाशीच!

आज सत्तेसाठी वाटेल त्या गोष्टी करायला तयार असलेले भजनलाल–देवीलाल आपल्याला सर्वत्र दिसत आहेत. अशी माणसे पुढे यावीत म्हणून का भगतसिंगाने बलिदान केले? आज त्याच्या आत्म्याला काय वाटत असेल बरे? कोणत्या लायकीची माणसे आज सर्व तऱ्हेचे अधिकार बळकावून बसली आहेत? शेतकऱ्यांचे शोषण करण्याचे धोरण फक्त सत्ताधारी इंदिरा पक्षाचेच नाही तर सर्वच राजकीय पक्ष या धोरणाचे आहेत.

केवळ आर्थिक प्रश्नावर शेतकरी एकवटतो हे यामुळे कुणालाही पाहवत नाही. शेतकरी–शेतमजूर, छोटा शेतकरी–मोठा शेतकरी, उत्पादक–ग्राहक अशा रीतीचे काल्पनिक भेद बळेबळेच पसरवले जात आहेत. राजकीय पक्षाच्या ध्वजाखाली शेतकरी गेला तर शासनाला फारसे दुःख नाही; पण शेतकऱ्याने स्वतंत्रपणे शेतकऱ्याचा ध्वज उभारला तर मात्र शासनाला ते सहन होत नाही. मग हा जागा झालेला शेतकरी चिरडण्यासाठी शासन काहीही करते हे सांगताना त्यांनी निपाणीच्या तंबाकू आंदोलनाचा व अत्यंत शांत आंदोलकावर पोलिसांनी निर्घृण गोळीबार करून तेरा किसानाचा बळी घेतला, त्याचा वृत्तांत सादर केला. तेव्हा प्रक्षुब्ध झालेल्या जमावाने शेमशेमच्या आरोळया दिल्या.

शेवटी देशातील गरिबी कमी करण्यासाठी काय करावे हे सांगताना जोशी म्हणाले की, इतर काहीही न करता गरिबाच्या उरावर जे तुम्ही बसला आहात ते फक्त उठा म्हणजे झाले! शरीरावरील फक्त फोडावर इलाज करून काय होणार? बिघडलेले रक्त दुरुस्त करायचा प्रयत्न करायला हवा. हे सांगताना त्यांनी रामायणा-

तील एक दृष्टांत दिला. रामाने रावणाचे तोडलेले प्रत्येक शीर पुन्हा धडाला चिकटत असे. असेच होत गेले तर रावण मरणे अशक्यच होते. तेव्हा हनुमानाने शोध घेतला. त्याला समजले की, काही भुंगे अमृताचे थेंब आणून ते शिपडतात व शीर धडाला चिकटून रावण पुन्हा सजीव होतो आहे. मग त्या भुंग्यांचा रामाने नाश केला आणि रावणाचा वधही केला. दारिद्र्यरूपी रावणाचा वध होत नाही याचे कारण भुंग्यांइतकेच मामुली व छोटे आहे. ते म्हणजे उत्पादन-खर्च भरून येईल अशी शेतीमालाला किंमत न देण्याची इच्छा !

एकदा प्रस्थापितांच्या या इच्छेचा वध केला की, दारिद्र्याचा रावण मेलाच म्हणून समजा ! त्यासाठी आपण सर्व किसानांनी या एकाच कलमाचा स्वीकार करायला हवा. कुणी वीस कलमी कार्यक्रम देतो, कुणी पाच कलमी कार्यक्रम देतो. आपणाला त्यांचा काहीही उपयोग नाही. आपला कार्यक्रम फक्त एक कलमी. ते कलम म्हणजे उत्पादन-खर्चानुसार आमच्या शेतीमालाला रास्त भाव मिळणे. तो भाव फक्त आम्हाला शासनाने द्यावा. मग आम्हाला कर्जमाफी नको; मोफतच्या शाळा नकोत, मोफतचे दवाखाने नकोत. आम्हाला कसलाही धर्मादाय नको, लाचारी नको. आमच्या घामाचा योग्य दाम एकदा आम्हाला मिळाला की, आम्ही या सर्व गोष्टी आपापल्या भागात नगदी किंमत मोजून करू. मग आमचे बांधव खेडी सोडून रोजगारासाठी शहरात जायचे नाहीत व फूटपाथवर पडून एखाद्या दिवशी बेवारश्यासारखे मरायचेही नाहीत !

आपली ही मागणी साधीसोधी आहे; पण ती नुसती मागून पुरी होणार नाही. ती आपल्याला खेचून घ्यावी लागेल. त्यासाठी आंदोलने करावी लागतील. लाठ्या झेलाव्या लागतील. प्रसंगी पोलिसांच्या गोळ्यांची शिकारही व्हावे लागेल. या दृष्टीने ३० मे १९८२ हा दिवस किसान चळवळीतील सोन्याचा दिवस गणला जाईल. आज जे ठराव तुम्ही सर्वांनी संमत केले आहेत ते ठराव म्हणजे तुमच्या किसानांच्या मुक्तीचा प्रारंभ आहे. अशा तऱ्हेचे डावपेच आखूनच गनिमी काव्याने आपल्याला हे युद्ध अहिंसात्मक व शांततामय मार्गाने खेळायचे आहे.

यानंतर त्यांनी महाराष्ट्रातील कांदा व ऊस आंदोलनाची थोडक्यात माहिती दिली. तिथे योजिलेल्या युद्धनीतीचे विवरण केले. अशा मार्गाने सर्वच प्रांतातील किसान एकवटले तर काळ्या इंग्रजाचा आणि इंडियाचा पराभव अशक्य नाही, असे सांगून देशाला जगविणाऱ्या किसानाच्या मुक्तीमुळेच शहीदांचा आत्मा शांत होणार आहे असे सांगितले आणि आपले भाषण संपविले.

जोशींचे भाषण संपल्यावर दीर्घ काळ टाळ्या वाजत राहिल्या नि 'किसान युनियन झिंदाबाद'च्या घोषणांनी आसमंत दुमदुमत राहिले. एक वेगळेच चैतन्यदायी वातावरण जाणवू लागले. व्यासपीठावरील मंडळी तर बेहोष झाल्यासारखी दिसत होती. प्रत्येकजण काही नवीन साक्षात्कार झाल्यासारखा तल्लीन झाला होता. मी डायरी पुढे ओढली आणि फक्त लिहिले- 'हे पहिले जाहीर भाषण यशस्वी.'

जोशींच्या नंतर अध्यक्ष मेजर ईश्वरदयाळ त्यागी यांचे आभाराचे भाषण झाले. त्यात त्यांनी संमत केलेल्या ठरावांची अंमलबजावणी करण्याचे सर्वांना आवाहन केले. सभा संपली आणि जोशींना पत्रकारांनी वेढले. आम्ही थोडा वेळ तिथे रेंगाळलो. तिथला एक कार्यकर्ता मला सहज म्हणाला, 'गहू-कापणीचा हंगाम आहे म्हणून, नाही तर लाखांनी आज किसान जमले असते आणि त्यांनी जोशीजींना ऐकले असते.' एक-दोन पत्रकारांशी उभ्या उभ्या काही बोललो आणि भास्कररावांचे एक काम होते म्हणून निसटलो.

राष्ट्रसेवादलाच्या शाम पटवर्धनांचा सत्कार व्हायचा होता, त्यात भास्कररावांच्या मनाचा एक पाय गुंतलेला. एक सायकलरिक्षा करून आम्ही दोघे पोस्टऑफिसात गेलो. तारेला थोडा वेळ लागला. आम्ही उभे होतो तितक्यात मघा सभास्थानी भेटलेला पत्रकार आला. त्याच्याशी बोलताना समजले की, तो अनेक महत्त्वाच्या हिंदी वृत्तपत्रांचा वार्ताहर असून एक स्थानिक साप्ताहिक चालवितो. तसेच तो लोकदलाच्या युवक विभागाचा जिल्हाध्यक्षही आहे. हरयानामध्ये राज्यपाल तपासे यांनी दगाबाजी करून भजनलाल यांना मंत्रिमंडळ बनवायला पाचारण केले याचा त्याला संताप आलेला होता. हे काम करण्यासाठी दहा लाख रुपये राज्यपालांनी घेतले असे सांगून तो आम्हाला तपासे यांच्याविषयी विचारू लागला. मी म्हटले की, ते महाराष्ट्रात-म्हणजे जुन्या मुंबई राज्यात एक मंत्री होते खरे; पण त्या फार जुन्या गोष्टी झाल्या. आज गणपतराव तपासे यांची कुणाला फारशी आठवण नाही. ज्यांना असावी तिचे स्वरूपही फारसे चांगले नसावे. महाराष्ट्रातले एक थोर पत्रकार आचार्य अत्रे यांनी अमृताचा एखादा डोस पाजला आहे अशापैकी प्रस्तुत तपासेमहाशय आहेत. नंतर तो म्हणाला की, आठवा आणि काही डीटेल्स सांगा. त्याने खिशातून नोटबुक काढलेले पाहताच मी त्याचा हात धरला नि म्हटले बाबा, आम्हाला या तपासेसाहेबांबद्दल खरोखरच काही माहिती नाही. वार्ताहराला द्यावी अशी तर नाहीच नाही. त्याने तोंड कसनुसे केले आणि म्हणाला, हाही मराठा माणूसच; पण इतका गद्दार कसा ? जे केले त्याचे त्याला मोल द्यावेच लागेल वगैरे वगैरे. तर असो.

### खग्रा सोडले....आता मानसा

या दिवशीचा आणखी एक किस्सा असाच सांगण्यासारखा आहे. दुपारी काही कामासाठी विजय जावंधिया बाहेर गेला होता. किसान युनियनची शोभायात्रा त्याच वेळी आली म्हणून स्वारी त्या दिशेला बघायला गेली. तो तिथे या मिरवणुकीने ट्रॅफिक जाम केलेला. त्या गुतवळ्यात जालंधर येथे योजिलेल्या सभेसाठी चाललेली श्रीमती मनेका गांधी यांची मेटॅडॉर गाडी अडकली होती. खिडकीशी बसलेली मनेका पाहताच विजयला कसली उसण आली कोणास ठाऊक. तो सरळ तिच्या पुढ्यात जाऊन ठाकला. नागपूरचा रहिवासी असल्याने हिंदीवर बऱ्यापैकी प्रभुत्व असलेल्या विजयने छातीवर लावलेल्या किसान युनियनच्या बॅचकडे बोट दाखवीत मनेकाला सांगितले की 'हम किसानोंके लिये कुछ काम करनेवाले लोग है।' तिला काही करायचेच असेल तर तिने किसानांना उत्पादनखर्चानुसारी भाव मिळवून देण्याचा प्रयत्न करावा. त्यातच या देशाचे भले आहे. तसेच दहेज-हुंडापद्धतीविरोधी मोहीम मनेकाने हाती घेतलेली आहेच; पण तिथेच न थांबता तिने घरात व शेतात राबणाऱ्या किसान

स्त्रिया व त्यांचे आर्थिक प्रश्नही ध्यानी घ्यावेत आणि त्यांचे भले करण्याचा प्रयत्न करावा. विजयने त्याच्या नेहमीच्या 'फटाफट स्टायली'त सांगितलेल्या या गोष्टीमुळे मनेका नक्कीच गोंधळलेली असणार. किसानांच्या जुलुसाचा तिच्या गाडीवरचा रेटा आणि त्यात विजयने दिलेल्या या वास्तव बौद्धिकाचा रेटा. विजयने सांगितले की यामुळे मागच्या बाजूला बसलेला 'डम्पी' अकबर भांबावूनच गेला. काही काळ तो नुसता स्तब्ध स्तब्ध होता आणि मिरवणूक पुढे गेल्यावर जेव्हा रहदारी सुरू झाली तेव्हा त्याने विजयला नेमके शोधून काढले आणि फक्त एक सलाम केला!

सारे उरकेपर्यंत चार वाजले होते. जीतसिंगाच्या घरी जाऊन सामान आणायचे होते. घाईघाईने आम्ही जमलेल्या सर्वांबरोबर चहापानाचा कार्यक्रम उरकला. जीतसिंगाच्या घरी गेलो. सामान आवरले. सर्वांचा निरोप घेतला आणि 'किसान युनियन'ने सांगितलेल्या ठिकाणी येता येता एक खाजगी मत्स्योत्पादनाचा तलावही पाहून घेतला.

खन्ना हे लुधियाना जिल्ह्यातील पन्नासेक हजार लोकवस्तीचे शहरवजा गाव आहे. शहराच्या खुणा अंगावर नांदवत असतानाच या गावाने शेतीउद्योगाच्या काही आभरणांचा स्वीकार केलेला आहे. गावात नव्याने औद्योगिक वसाहती वाढत आहेत; पण गावाचे मुख्य वैभव म्हणजे गव्हाची विक्री हेच आहे. पंजाबातील १/३ गहू या केन्द्रात जमा होतो. गावात शाळा, कॉलेजे आहेत. मोठी बाजारपेठ आहे. १५ मैलांचा परिसर नियंत्रित करणारे तारघर आहे. सर्वतऱ्हेची दुकानेही आहेत; पण मित्रांबरोबर कॉफीच्या एखाद्या कपासोबत किंवा लस्सीच्या एखाद्या ग्लासासोबत गप्पागोष्टी कराव्यात असे एकही हॉटेल नाही! सारी रस्त्याच्या कडेला आसरा घेऊन उभी केलेली छप्परातील हॉटेल्स. रस्त्यावरील रहदारीबाबत तर काही कायदेकानू अस्तित्वात आहेत याचे कुणालाही भान नाही अशी परिस्थिती. कुणीही कुठेही आपली गाडी, आपला ट्रक, आपला ट्रॉलीसह ट्रॅक्टर उभा करावा. त्यातूनच इतरांनी व त्यांच्या वाहनांनी जमेल तशी वाट काढायची.

या अशा खन्नाचा आम्ही ३० मे १९८२ रोजी सायंकाळी ५–५॥ वाजता निरोप घेतला. 'किसान युनियन'ने सर्व प्रतिनिधींसाठी एक बसच ठरविली होती. तिने आम्ही सर्वजण भटिंडा जिल्ह्यातील मानसा या गावाच्या रोखाने निघालो. (क्रमशः)

---

## एशियाड : पृष्ठ ६ वरून

मध्ये गैरव्यवहार होणार नाहीत असे जाहीर आश्वासन (सध्या तरी) दिले आहे. तिकिटांची छपाई–वाहतूक–वाटप या गोष्टींवर सावध नजर ठेवण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा निर्माण केली आहे. तिकिटांचं दुसरं वैशिष्ट्य म्हणजे विद्यार्थी व जवान यांच्यासाठी खास सवलतीचे दर आणि अपंगांना 'विनामूल्य प्रवेश' असं धोरण ठेवलं आहे.

मैदानात किंवा क्रीडामंदिरात निम्म्याहून अधिक जागा सामान्य वर्गासाठी राखून ठेवण्याचं ठरवलं आहे. त्या दृष्टीनं स्पर्धेच्या प्रत्येक ठिकाणी आसन–क्रमाकाचे हिंदी, उर्दू व इंग्रजी भाषांतून 'आराखडे' ठेवण्यात येतील. प्रत्येक जागी कमीत कमी सहा व जास्तीत जास्त वीस खिडक्या विक्रीसाठी खुल्या असतील. प्रवेशद्वारावर पोलीस आणि खास स्पर्धारक्षकही असणार आहेत.

तिकिटाच्या वाटपव्यवस्थेची जबाबदारी प्रामुख्यानं स्टेट बँकेवर असून त्यामार्फत ५० टक्के तिकिटे दिल्ली (शहर व नगर विभाग), २० टक्के दिल्लीच्या आसपासच्या परिसरातील (हरियाना, पंजाब, राजस्थान वगैरे) प्रदेशांसाठी राखून ठेवण्यात येतील. राहिलेली ३० टक्के बाकीच्या प्रांतासाठी असून त्यात तेथील क्रीडासंस्था, शाळा–महाविद्यालये, क्रीडासमालोचक यांना प्राधान्य मिळेल. या प्रवेशपत्रिकांपैकी ज्या विकल्या जाणार नाहीत त्या सर्व प्रवेशपत्रिका स्पर्धा सुरू होण्यापूर्वी सहा आठवडे दिल्लीला आणून त्यांचं वाटप होईल. खास आमंत्रितात परदेशी वृत्तपत्रीय–क्रीडालेखक–खेळाडू (माजी विजेते), क्रीडासंस्था-प्रतिनिधी याना अग्रक्रम राहील. येथील क्रीडाप्रेमींना कमी किंमतीत निमंत्रणपत्रिका मिळतील. स्टेट बँकेच्या भारतभरच्या शाखांतून जून महिन्यापासून प्रवेशपत्रिकांचे वाटप सुरू झाले आहे. एशियाड–८२ बद्दलची माहिती आकाशवाणी, दूरदर्शन, वृत्तपत्रे, माहितीकेंद्रे यासारख्या प्रसारमाध्यमांतून सतत दिली जात आहेच. ¤

येणार येणार म्हणून एशियाड–८२ स्पर्धा आता अशी समोर येऊन ठाकली आहे. स्पर्धेवर अपरिमित खर्च झाला आहे, हे तर उघडच आहे; पण हा खर्च काही वाया जाणार नाही. थायलंडने या स्पर्धेतून सुमारे ३१ दशलक्ष डॉलर्स कमावले होते!

एकूण काय एशियाडचा 'टेम्पो' तर तयार झाला आहे. आता १९ नोव्हेंबरकडे डोळे लावून बसायला हरकत नाही. दिल्ली एशियाडची पूर्वतयारी पाहून आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक समितीच्या सदस्यानी १९९२ चे ऑलिंपिक सामने आयोजित करण्यासंबंधी भारताने केलेली विनंती मान्य होऊ शकेल असे सांगितले आहे.

स्पर्धेत सर्वांत महत्त्वाचे ते खेळाडू. एवढा अवाढव्य पैसा, प्रतिष्ठा पणाला लावून भारतानं स्पर्धेचं आयोजन तर केलं. भारताची मान ताठ आहे याबद्दल कौतुकानं मन भरून येत असतानाच यजमान सघाच्या खेळाडूंनी आपली जबाबदारी लक्षात घेतली आहे की नाही, त्याची तयारी कितपत आहे याची माहिती अजून तरी हातात आलेली नाही.

जात, धर्म, देश याचे अडसर बाजूला करून आशियायी स्पर्धा १९ नोव्हेंबरला धूमधडाक्यात साजऱ्या होतील. सुमारे ५००० स्पर्धक-खेळाडू भारतातल्या एशियाडनगरीकडे यायला लागतील, नगरी जिवंत होईल आणि अप्पू एक पाय नाचवत, सोंड उचलून पहिलं स्वागत करेल–

'Welcome Players !

–क्रीडाप्रतिनिधी–दिल्ली

रंगभूमी

## ' मोदी अँड मोदी '

# १५ मिनिटांचे अडीच तास ! वपु, बोला आता !

सदानंद बोरसे

प्रत्येक कलावंताचे आवडते ठेवणीतील विषय असतात; त्याप्रमाणे स्वतःचा आशय व्यक्त करण्यासाठी निवडलेली अभिव्यक्तीची खास पद्धत असते. सत्यजित रेंना एखादी कथावस्तू दिसते तीच मुळी कॅमेऱ्याच्या भिंगातून. विजय तेंडुलकर एखाद्या गोष्टीचा ती रंगभूमीवर घडत असल्याप्रमाणेच विचार करीत असतील. व. पु. काळयांचे नाव उच्चारले की, आपल्या नजरेससोर येतात त्या कथा. कथा म्हणजे जी कथन केली जाते, सांगितली जाते ती. मुद्रणकला अस्तित्वात येण्यापूर्वी निरनिराळ्या वस्त्यांमधून कथा सांगून लोकांना रिझवणारी आणि त्यावरच उपजीविका करणारी एक जमात होती. कित्येक लोककथांचा वारसा या जमातीने संस्कारित करून एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे दिला, जगाच्या एका भागातून दुसऱ्या भागात पोहोचवला. आजसुद्धा खेड्यापाड्यांच्या पारांवर अशा गोष्टीवेल्हाळ माणसाभोवती जमलेले कडे पाहायला मिळते. सहज एखादा किस्सा, चुटका म्हटला तर आपणसुद्धा कान टवकारतो. वपुंचे, त्यांच्या कथांचे नाते थेट या गोष्टीवेल्हाळांपर्यंत जाते. वपुंच्या पुस्तकांमधील कथासुद्धा कागदांवर छापलेल्या नसतात; तर एक पक्का गोष्टीवेल्हाळ माणूस त्या श्रोत्यांना सांगत असतो. अशा सांगितल्या जाणाऱ्या गोष्टींची स्वतःची अशी अनेक वैशिष्टये असतात, अनेक खासियती असतात. उदाहरणार्थ–श्रोत्याला लक्षात ठेवायला जड जातील अशी तात्त्विक वाक्ये वा चीरफाड टाळून छोटया छोटया प्रवाही वाक्यांमधून कथा पुढे सरकवणे. कथेमध्ये पुरेसे वैविध्य आणण्यासाठी वेगवेगळ्या व्यक्तिरेखांचा आणि त्यांच्या वैशिष्टयांचा वापर. साहजिकच व्यक्तिदर्शनासाठी तिच्या रूपाचे वर्णन पेरलेले असले तरी कथाकथन या श्राव्य माध्यमामध्ये मुख्य भर त्या व्यक्तीच्या बोलण्यावर, त्याचा आवाज, बोलण्याची ढब यांच्यावरच दिलेला असतो. (कथाविषय या बाबतीतही या कथेचे स्वतःचे वैशिष्टय असते. वपुंच्या कथेचेही आहे; त्याचा उल्लेख पुढे येईलच.) श्रोत्याला हमखास भिडणारी काही ठेवणीतील चमकदार वाक्येही मधूनमधून पेरावी लागतात. अशी अनेक वैशिष्टये सांगता येतील. वपुंच्या कथा या साऱ्या आविष्करणतंत्राच्या बाबतीत आदर्श ठराव्यात, इतक्या सुरेख बांधलेल्या असतात. स्वतःचा स्वाभाविक पिंडच कथाकथनकाराचा असल्यामुळे छापील कथाकथनाबरोबरच वपुंनी कथाकथनाच्या मैफिलीही गाजवल्या. जिंकल्या.

वपुंच्या सर्व वैशिष्टयांनी भरलेल्या ' इंटिमेट ' या कथासंग्रहातील ' मोदी अँड मोदी ' या कथेचे त्यांनी स्वतःच केलेले ' मोदी अँड मोदी ' याच नावाचे नाटयरूपांतर पुण्याच्या ' प्रोग्रेसिव्ह ड्रॅमॅटिक असोसिएशन ' या संस्थेने रंगभूमीवर आणले. त्या निमित्तानेच आधीचा आणि यानंतरचाही कथाकथनाबद्दल प्रपंच लिहावा लागत आहे. त्यापूर्वी प्रत्यक्ष नाटयप्रयोगाविषयी लिहितो.

स्पर्धेचे निमित्त नसताना पी. डी. ए. चे रंगभूमीवर आलेले हे बऱ्याच दिवसांनंतरचे नाटक. नाटकाचे दिग्दर्शक दस्तुरखुद्द प्रा. भालबा केळकर. कथानकाचा उल्लेख आणि नाटकाची प्रकृती यांच्यासाठी अन्यत्र जागा राखून ठेवलेली असल्याने त्याची पुनरुक्ती करून जागा अडवत नाही. दिग्दर्शक भालबांनी संपूर्ण नाटकाची केलेली अत्यंत संयमित हाताळणी ही नाटयप्रयोगाची सर्वांत मोठी जमेची बाजू. कथानकाला त्यामुळे अतिशय मोठा न्याय मिळाला. अन्यथा अतिरेकाच्या पातळीवर जाऊन रुगळा तोल बिघडवण्याच्या जागा नाटकात भरपूर आहेत. नाटकातील त्या त्या पात्राचे प्रयोजन वा अप्रयोजकता या गोष्टी बाजूला ठेवल्यास सर्वच कलाकारांनी अत्यंत सुंदर अभिनयाने त्या त्या व्यक्तिरेखा सुरेख उभ्या केल्या. श्रीराम खरे (मोदी), विश्वास गद्रे (सोनाळकर), शशिकांत कुलकर्णी (साळवी), भालबा केळकर (घाटपांडे) आणि माधुरी आगरकर (ललिता देशपांडे) यांचा आवर्जून उल्लेख करावासा वाटतो. कथेचे नाटयरूपांतर करताना दोन फ्लॅशबॅक, एक भासदृश्य, आणि शेवटी मोदीचे टेप केलेले भाषण त्याच्याच तोंडून दृश्य स्वरूपात ऐकविणे या चार जागा निर्माण करताना त्यात दिग्दर्शक भालबांचा बराच हात असावा, असे (विशेषतः नेपथ्यरचना आणि दोन्ही अंकांतील त्या नेपथ्याचा वापर पाहून) मला उगीचच वाटून गेले.

व्यर्थ ' दिन दिन दिवाळी ' न करता जरुरीपुरतीच केलेली प्रकाशयोजना आणि वापरलेले पार्श्वसंगीत किंवा ध्वनी हीही या नाटकाची वैशिष्टये, जी सध्याचा इतर नाटकांमध्ये जरा अभावानेच सापडतात.

थोडक्यात पी. डी. ए. च्या कलाकारांनी ' मोदी अँड मोदी 'चा एक सुंदर आणि प्रेक्षणीय प्रयोग सादर केला.

तर पी. डी. ए. ने असा पुरेसे प्रयत्न आणि परिश्रम घेऊन केलेला नाटयप्रयोगही पुरेसा प्रभाव पाडू शकत नाही, याचे मर्म संहितेत आहे. कथानकाकडे जाण्यापूर्वी कथाकथन आणि नाटक या दोन्ही माध्यमांचा विचार करू. कथाकथन म्हणजे जेमतेम वीस मिनिटे ते तीस मिनिटे चालणारी एक गोष्ट. अशा पाच-सहा गोष्टी एकत्र सांगितलेल्या. तीस-पस्तीस मिनिटांपेक्षा अधिक वेळ एकच गोष्ट चालली तर लोक मांड्या बदलायला लागतात, जांभया लपवण्यासाठी चेहऱ्याच्या स्नायूंना ताण द्यायला लागतात. साहजिकच अपेक्षित परिणाम साधण्यासाठी अनावश्यक

फापटपसारा टाळून कथाकथनामध्ये गोष्ट अधिकाधिक टोकदार बनवावी लागते. या टोकदारपणासाठी कथानकावरही क्वचित बंधने येतात. आता अशा मुळातच कणभर जीव असलेल्या प्रकारचे माध्यम बदलून जेव्हा तुम्ही ते रंगभूमीच्या मदतीने दृक्‌श्राव्य बनवता, तेव्हा वेळेचे भान ठेवून तुम्हाला त्याची तीस-चाळीस मिनिटांची एकांकिका बनवावी लागेल किंवा फापटपसारा न वाटता श्रोत्याना बांधून ठेवील अशी अर्थवाही भर घालून मगच दोन वा तीन अंकी पूर्ण नाटकाच्या (किंवा एकाच दीर्घांकाच्या स्वरूपात) ते सादर करावे लागेल. ( खुद्द व. पु. काळयांच्या 'संवादिनी' नावाच्या कथासंग्रहातील 'आज तरी भांडशील ना' आणि 'एका मिठीची गोष्ट' या कथांना एकांकिका-रूप देऊन महाराष्ट्रीय कलोपासक या संस्थेने त्याचे अतिशय सुंदर प्रयोग केले होते.) या दोन्ही गोष्टी न केल्यामुळे 'मोदी अँड मोदी' नाटकात फापटपसारा प्रचंड वाढला आणि त्यात बिचाऱ्या कथेचा परिणामकारकपणा मात्र अधिकाधिक आकसत गेला. साहजिकच सोनाळकरानी सांगितलेल्या एखाद्या चुटक्याला तुम्ही हसता, दाद देता; पण नाटकाची लांबी आणि वेळ वाढवण्याव्यतिरिक्त या चुटक्याचे प्रयोजन काय, या प्रश्नाचे उत्तर तुम्हाला मिळत नाही. तोच प्रकार ललिता आणि सचिन यांच्या हॉटेलातील भेटीचा. दोघांचे एकमेकांवर मनापासून प्रेम असून दोघे अधूनमधून लटके भांडणही करतात, हे नाटकात वारंवार सांगूनही पुन्हा तेच सांगण्यासाठी सुमारे बारा मिनिटांचा हा प्रवेश का घातला? त्यातून ललिता आणि सचिनच्या स्वभावांची काही अन्य वैशिष्ट्ये दिसली म्हणावे, तर तसेही होत नाही. शंकर शिपायाने केलेल्या नकला, सोनाळकरांनी सांगितलेली स्वतःची स्वप्ने इत्यादी कथेमध्ये नसलेल्या अनेक गोष्टी नाटकामध्ये घुसखोरी करून परिणामकारकता हा प्रकार घटवितात.

आता कथाकथनाचा किंवा नाटकाचा प्रमुख गाभा म्हणजे त्याची कथावस्तू. 'मोदी अँड मोदी'ची थोडक्यात गोष्ट अशी—

'मोदी अँड मोदी' या खाजगी कंपनीचे मुंबईतील ऑफिस. ऑफिसातील सारेच जण एका कुटुंबाचे घटक असल्याप्रमाणे एकमेकांशी बांधले गेलेले. कंपनीचा पारशी मालक मोदी हा या कुटुंबाचा प्रमुख. ऑफिसातील प्रत्येकाची चिंता ही आपली मानून ती शक्यतोवर सोडविणारा हा मोदी ऑफिसातील ललिता देशपांडे नावाच्या मुलीचा पैशाअभावी अडलेला लग्नाचा प्रश्नही सोडवतो; पण त्याच वेळी उपकृत झालेल्या देशपांडेकडे एक चमत्कारिक मागणी करतो. मधुचंद्राच्या पहिल्या रात्री तिचे नवऱ्याशी होणारे सर्व संभाषण टेप करून ती टेप तिने मोदीला द्यायला हवी. मोदीच्या उपकाराच्या ओझ्याखाली दबलेली देशपांडे टेप त्याला देते. शेवटी अशा टेप्स मोदी गोळा करीत असण्याचे कारण कळते, मोदीची बायको मुकी आणि बहिरी असल्यामुळे बायकोकडून मोदीला संवादसुख कधीच मिळालेले नसते. ते सुख हा विक्षिप्त माणूस या टेप्समधून मिळवीत होता.

कथाकथनकार वपुचे एकूण कथाविषय झटकन नजरेपुढून सरकवले तर लक्षात येते, वपुंनी त्यांना त्यांच्या मध्यमवर्गीय जीवनात आलेल्या अनुभवाची विविध रूपेच त्यांच्या कथेमधून मांडली हे सारे अनुभव हळवे असतात; पण उद्ध्वस्त करणारे नसतात, चटका लावणारे असतात; पण जाळून टाकणारे नसतात. शेवटच्या एखाद्या परिच्छेदातून वा पाच-सात ओळीमधून कथानकाला अनपेक्षित कलाटणी देणारे धक्का-तंत्र ही वपुची खासियत; पण ही अनपेक्षित कलाटणीही वाचकाचा अपेक्षाभंग न करणारी असते, त्याला मुळापासून हादरवून टाकणारी,सुन्न करणारी नसते. वपुच्या कथा अशा असतात याला त्यांचे अनुभवविश्व, त्यांच्यावर झालेल्या संस्कारानी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची झालेली जडणघडण ही कारणे तर असतीलच; पण त्याहीपेक्षा कथाकथनामध्ये आपल्या श्रोत्यांचे वपुंनी ठेवलेले भान हेही त्याचे एक महत्त्वाचे कारण आहे. 'एक क्षण भाळण्याचा, बाकी सारे सांभाळण्याचे.' अशा शब्दचमत्कृतीने 'चक् चक् सः हाय्' करीत धाडदिशी बेशुद्ध पडणारा, जबरदस्त आघात पचविणारे संरक्षक-कवच अंगावर घातले,तरी त्या कवचाची जर एखादी ढलपी काढली तर त्याकडे पाहून हळवा बनणारा माणूस हा वपुंच्या कथेचे लक्ष्य आणि भक्ष्य असतो. अशा माणसाला 'माणूस' नावाचे खरेखुरे रसायनही असेल त्या तीव्रतेत थोडी भेसळ करून जरा मवाळ बनवलेले लागते, अन्यथा त्याची तीव्रता त्याला सोसवत नाही. वपुंची पात्रेही मग अशी धगधगणारी बनून न येता उबदार बनून येतात, बर्फासारखी थंड न बनता नुसता ओलावा घेऊन येतात. त्यांच्या प्रतिमा त्या माणसाच्या दैनंदिन आयुष्याला जास्तीत जास्त जवळच्या असतात.

## मोदी विकृतच !

नाटक पाहून आणि त्यानंतर 'मोदी अँड मोदी' कथा वाचून देशपांडेकडे तिच्या मधुचंद्राच्या रात्रीची टेप मागणे ही मोदीच्या स्वभावातील विकृती आहे, असे माझे प्रामाणिक मत बनले आहे; पण वपु मात्र इतर वेळी मोदीच्या स्वभावात दिसणारी nobility, चांगुलपणा (आणि त्यामुळे त्याला श्रोत्यांची मिळणारी सहानुभूती) कायम ठेवण्यासाठी या विकृतीला विक्षिप्तपणा, गमावलेला आनंद मिळविण्यासाठी केलेली धडपड वगैरे ठरवण्याचा प्रयत्न करतात, त्यासाठी 'मोदीने त्या टेपचा मिस्यूज केला नाही. त्याची अॅक्शन सागते की, तो विकृत नाही.' असे समर्थन देतात. (कथेमध्ये देवधर आणि त्यानंतर पुन्हा देशपांडेकडे मधुचंद्राच्या रात्रीच्या टेप्स मागणारा मोदी अधिकच विकृत आहे. तो फक्त देवधरकडून टेप मिळवून समाधानी का होत नाही?) हे समर्थन प्रमाण न मानण्याची कारणे तीन-१) मोदीने टेपचा 'मिस्यूज' केला की नाही, याच्याशी त्याच्या विकृतीचा संबंध नसून आपल्या उपकारांनी दुसऱ्याला दबवून त्याच्या संपूर्णतः खाजगी गोष्टीमध्ये त्याच्या इच्छेविरुद्ध प्रवेश मिळविणे याच्याशी ती विकृती संबंधित आहे. २) इतराचा मधुचंद्राच्या रात्री झालेला संवाद ऐकून स्वतःचे संवादसुख उपभोगल्याचा आनंद मिळविणे ही विकृती नसून विक्षिप्तपणा मानल्यास इतरांना नकळत त्यांचा संभोगसोहळा पाहून स्वतः तृप्त होणारे peeping toms हेही विकृत नसून विक्षिप्त आहेत, असे मानायला हवे. ३) मोदीने इतरांकडून मिळविलेल्या टेप्स या संपूर्णतः अशा प्रसंगाच्या आहेत की, त्या मोदीनेच नाही, साऱ्या जगाने ऐकल्या तरी बोलणाऱ्या व्यक्तीना ते जाचक वाटणार नाही-उदाहरणार्थ साळवीच्या पत्नीने गायलेले अभंग, सोनाळकरांच्या बायकोचे आणि छबकड्याचे संवाद, पतिपत्नीचे भांडण. थोडक्यात इतर

सर्व वेळी भला, चांगला, प्रेमळ आणि लाडका वाटणारा हा मोदी स्वतःच्या या विकृतीचे समर्थन विक्षिप्तपणा म्हणून करू शकत नाही. या विकृतीची तीव्रता कमी करण्यात त्याचे इतर वेळचे वागणे, त्याच्या बायकोचा मूक-बधिरपणा आणि श्रीराम खऱ्यांचा अभिनय यांचा वाटा फार मोठा. हीच गोष्ट ललिता देशपांडेच्या बाबतीत. मोदीने केलेल्या विचित्र मागणीमुळे होणारी तगमग, उलघाल, स्वतःशी चाललेला झगडा या साऱ्यांसाठी नाटकात अतिशय छोटीशी जागा दिली गेल्यामुळे ललिता (जी मुलगी मुंबईत नोकरी करते, स्वप्नात दिलेले वचन पाळण्याचा हरिश्चंद्री बाणा प्रत्यक्ष आयुष्यात पाळायचा नसतो, याची जिला जाणीव असायला हरकत नाही) मोदीला फारच झटकन आणि सहजासहजी टेप्स देते, अशी भावना निर्माण होते.

मोदी काय किंवा ललिता देशपांडे काय दोन्ही व्यक्तिरेखा स्वतःच्या खऱ्या भावना पूर्णांशाने उभ्या करू शकत नाहीत, याला कारण नाटकाच्या आड आलेले कथाकथनकार वपु. कथाकथनकार म्हणून वपु. दुसऱ्याच्या भावना त्रयस्थपणे सांगू शकतात, त्यांचे भिडणारे वर्णन करू शकतात; पण स्वतःचा त्रयस्थपणा टाकून देऊन ती पात्रे स्वतः जगू शकत नाहीत. नेमक्या याच अलिप्तपणामुळे वा त्रयस्थपणामुळे वपुंनी मोदी वा ललिता देशपांडे एखाद्या कथाकथनकाराने आपल्या गोष्टीत बसवावी, तशी नाटकात मांडली आणि त्यामुळेच ही पात्रे सर्वार्थाने जिवंत होऊन प्रेक्षकाला भिडू शकत नाहीत. विश्वास गद्र्यांनी अतिशय सुंदर रंगवलेल्या सोनाळकरच्या (वपुंनी दिलेले लाडके नाव स्वप्नाळकर) स्वप्नांना मोही दाद दिली, शशिकांत कुलकर्णींच्या साळवींच्या 'पांडुरंग पांडुरंग' वर मीही खूष होतो; पण ही दाद अथवा हे खूष होणे हे सर्वस्वी त्या अभिनेत्यांचे कर्तृत्व होते. काही विनोद टवाळ गप्पांमध्ये थोडा वेळ सहज खपून जातात; पण त्याच पद्धतीचे विनोद जर एकाच बैठकीत सतत व्हायला लागले तर हसणे आणि सांगणाऱ्याचे तोंड एकाच वेळी बंद करावेसे वाटते. उदाहरणार्थ—एका कॉलेजात एक मुलगा आणि मुलगी ए तुकडीत शिकत होते. मुलाचे मुलीवर प्रेम होते. परीक्षेनंतर दुसऱ्या वर्षी मुलगा 'ए' तुकडीत राहिला, मुलगी मात्र 'बी' तुकडीत गली. अशा वेळी तो मुलगा कोणते गाणे म्हणेल? तर 'मेरा सुंदरा सपना 'बी' त गया.' हा विनोद किंवा 'ती मुंगी खोटं बोलली' चा विनोद. सोनाळकर अथवा साळवींच्या विनोदांची गत संपूर्ण नाटकाच्या संदर्भात नेमकी अशी झाली. म्हणूनच दोन्ही कलाकार काम छान करीत असूनही संपूर्ण नाटकाच्या संदर्भात या पात्रांना मिळायला हवी होती ती जागा आणि प्रत्यक्ष मिळालेली जागा यांचे प्रमाण वपुंनी फारच व्यस्त ठेवले आहे, असे वाटले. कथांचे नाटक करताना वपुंनी केलेले नावांमधील अथवा पात्ररचनेतील किरकोळ बदल वगळता नाटकातील हेडक्लार्क घाटपांडे (हे कथेतील देवधर आणि कालेलकरचे मिश्रण) हे पात्र एकदम चोख उतरलेले. ललिता देशपांडेसाठी फ्रेंड, फिलॉसॉफर आणि गाईड ठरलेला हा जाणता, विश्वासू आणि मनमिळाऊ म्हातारा.स्थितप्रज्ञ तितकाच समंजस असा हा प्रसन्न म्हातारा नाटकाचा आवश्यक भाग म्हणून येतोच, शिवाय भालबा या भूमिकेत शोभलेही फिट्ट.

नाटकामध्ये अशी अनावश्यक भर घालतानाच कथेमधील नेमका नाट्यपूर्ण भाग कापून टाकण्याचे कौशल्य वपुंनी कसे काय दाखवले, याचे मला अतिशय आश्चर्य वाटले. ललिता आणि सचिनचा (कथेमधील शकुन आणि सत्यजितचा) मधुचंद्राच्या रात्रीचा संवाद मोदीने ऐकणे, मोदी तो ऐकत असल्याची ललिताला झालेली जाणीव, त्यामुळे तिची झालेली कुचंबणा, संवाद ऐकतानाची मोदीची वेडावून जाण्याची प्रतिक्रिया हा सगळा अत्यंत नाट्यपूर्ण आणि अत्यंत आवश्यक भाग आहे, असे मला वाटते. वपुंना तसेच वाटत असल्यामुळेच त्यांनी तो कथेत लिहिला असावा. मग नाटकात नेमकी त्यांची कात्री या प्रकारावरच कशी चालली? त्याऐवजी रेगन नावाच्या वेटरकडून काही आगाऊ आणि फुटकळ विनोद दाखवणे वपुंना अधिक नाट्यपूर्ण आणि अधिक आवश्यक वाटले का?

असो. वपुंच्या कथांचा मीही श्रोता आणि एक चाहता आहे. त्यामुळेच त्यांना त्यांचेच शब्द थोडेसे बदलून सांगावेसे वाटते,

'वपु, नाटक 'माणूस' नावाच्या प्राण्याचे होते, त्याच्या व्यक्तिमत्त्वातील गुंतागुंतीच्या धाग्यांचे होते, नियती नावाच्या अतर्क्य, अनाकलनीय खेळाचे होते. सोनाळकर वा साळवींच्या क्षुल्लक विनोदांचे किंवा शंकर वा रेगनच्या चिल्लर नकलांचे होत नाही.

हा लेख जमल्यास वाचा. वाचल्यावर मला अभिप्राय नाही कळवळात तरी चालेल.

फक्त एकच कराल का?

तुमच्या स्वतंत्र कथेसारखंच एखादं स्वतंत्र नाटक बांधाल का?

वपु, बोला!'

□




# देवघर

चौकट ठरली, पण कथानक?

सिनेमा संपल्यावर थिएटरबाहेर पडणाऱ्या बायाबापड्यांचे लाल-लाल झालेले नाक-डोळे पाहिल्यानंतर जगदीश खेबूडकरांच्या 'देवघर'नं अगदी 'काळजाला हात घातल्याचं जाणवतं आणि त्याचबरोबर महिलावर्गाची महत्त्वाची फ्रंट जिंकल्याचंही लक्षात येतं. 'देवघर' ही जगदीश खेबूडकरांची पहिलीच निर्मिती. गेली २२ वर्षं वेगवेगळ्या प्रकारच्या गीतांची बरसात करणाऱ्या खेबूडकरांनी या सिनेमाद्वारा निर्मितिक्षेत्रात पदार्पण केलं आहे. 'देवघर' हे सिनेमाचं नावच चित्रपटाची जातकुळी स्पष्ट करणारं असलं, कथेची एकूण घाटणी लक्षात घेता ते अनुरूप होत असलं तरी out of fashion झाल्यासारखं वाटतं. तरीही सर्व थरांतल्या आणि सर्व वयांच्या प्रेक्षकांची करमणूक व्हावी म्हणून आवश्यक तो सारा मसाला सिनेमात असूनही शेवटपर्यंत देवघर मराठी सिनेमातील कौटुंबिक जिव्हाळ्यातून बाहेर येत नाही. त्यामुळे परंपरेच्या ठराविक चौकटीतून प्रवास करणारा 'देवघर', 'जग हे देवघर, जनता देव', 'घर देवघर, आईवडील दैवत', 'शरीर देवघर, पंचप्राण परमेश्वर' असे

देवघराचे अनेक 'नमुने' दाखवत आणि 'तरुणानो, शहरापेक्षा खेड्याला तुमची गरज आहे', 'स्वावलंबी व्हा', 'आपलीच संस्कृती अधिक श्रेष्ठ आहे' वगैरे संदेशाचे ज्ञानामृत पाजत नाविन्याचा अनुभव न देताच संपतो.

आबा वैद्यांनी (चंद्रकांत गोखले) आपला मुलगा रवी (रवींद्र महाजनी) लहानपणीच गावाच्या ओटयात घातलेला असतो. रवीला याची काहीच कल्पना नसते. तो रंजूला (रंजना) घेऊन थोड्या दिवसांसाठी म्हणून गावी येतो. मुलानं परस्पर लग्न केलं याचा रवीच्या आईवडिलांना धक्का बसतो, तर आपल्याला इथेच प्रॅक्टिस करायला लागणार याचा रवी–रंजूला धक्का बसतो; पण सगळे सावरतात. रवीचे आईवडील सुनेचा स्वीकार करतात आणि रवी गावीच प्रॅक्टिस करायचं ठरवतो. रंजूही नाखुशीनंच या बेताला मान्यता देते; पण सोन्यासारखं हॉस्पिटल सोडून मुलीनं आणि जावयानं त्या दळभद्री गावात दवाखाना घालावा हे रंजूच्या ममीला (पद्मा चव्हाण) आणि मामाला (अशोक सराफ) मान्य नसतं. त्यामुळं ममी रंजूला जबरदस्तीनं घेऊन येते. रंजू गेल्यावर रवीचं कामातलं लक्ष उडतं. तशातच गावातील बाळमहाराजांचा (हे एक शेवटपर्यंत नीटसा संदर्भ न लागणारं पात्र) मृत्यू होतो आणि त्याच खापर रवीच्या माथ्यावर फुटतं. गावकऱ्यानी हाकलून दिलेला रवी सासूकडे येतो. तिकडे रवीच्या आईचा हाय खाऊन मृत्यू होतो. वडील अपंग होतात. अपंग वडिलांना रवी आपल्या (म्हणजे सासूच्या) घरी घेऊन येतो आणि बापलेक मिळून अन्याय सहन करीत जगतात. शेवटी मामा स्वत: चोरी करून आळ आबावर घालण्याचा चावून चोथा झालेला मार्ग चोखाळून स्वत:च गोत्यात येतो; पण एव्हाना रवी शहाणा झालेला असतो. वडलापाठोपाठ तोही गावाला निघून जातो. रंजूलाही सासरची महती पटते आणि तीही सासूचे गोडवे गात गावी जाते.

अशी ही ताई–भाऊ परंपरेतली कथा जुन्या जमान्यात खपावी अशीच आहे. तसंच कथेची हाताळणीही नाविन्यपूर्ण नाही. सिनेमा पाहिल्यानतर कथेचा नायक इतका बुळा का? डॉक्टर झालेला तरुण बाहेर कुठेही प्रॅक्टिस करू शकत असताना सासूच्या वर्चस्वाखाली इतका दबलेला का? पदोपदी आई–वडिलांचा अपमान होत असताना, आपल्याला, आपल्या अपंग वडलाना घरात कशी वागणूक मिळते हे समोर दिसत असूनही याचा स्वाभिमान कसा जागृत होत नाही? घराबाहेर पडून तो सासूला धडा का शिकवत नाही? एक बाळमहाराजाचा मृत्यू होत नाही तो गावकरी रवीला हाकलून कसे देतात? मुळात हे बाळमहाराज कोण? रंजूही थोडीथोडकी नाही, डॉक्टर झालेली मुलगी इतकी कशी आईच्या सल्ल्यानं वागते? तिला थोडं–फारही स्वत:चे बरे–वाईट कळण्याइतपत अक्कल नाही का? ...अशा एक ना दोन अनेक प्रश्नाची मालिका डोळ्यासमोर उभी राहते; पण या प्रश्नाची उत्तरं मिळवणे म्हणजे 'देवघर'ची संपूर्ण कथाच बदलावी लागेल. त्यामुळे हे प्रश्न सोयिस्करपणे बासनात गुंडाळून ठेवून फक्त पडद्यावर काय घडते आहे, हे बघणे हाच उत्तम मार्ग.

एका लावणीचे ठिगळ वगळता 'देवघरा'तला शालीन, सोज्वळ भाव कायम ठेवण्याचा खेबूडकरानी बराच प्रयत्न केलाय; पण पिटातल्या प्रेक्षकासाठी लावणी, महिलावर्गासाठी डोहाळजेवण, तरुण–तरुणीसाठी गोव्याच्या पार्श्वभूमीवरचे प्रेमप्रसंग, म्हाताऱ्याकोताऱ्यासाठी अभंग,...अशी वेगवेगळ्या थरातील लोकाची 'आवड' यात 'जागरूकतेनं' जपण्याचा प्रयत्न कौतुकास्पद असला तरी त्या नादात मूळ कथानक मात्र मागे पडले आहे. खबूडकर मूळचे गीतकारच; त्यामुळं सिनेमात गाण्याची अगदी लयलूटच आहे; पण ही गाणी काही ठिकाणी मुद्दाम घुसडल्यासारखी वाटतात. त्यामुळे अपेक्षित परिणाम साधला जात नाही. प्रभाकर जोग याचे संगीतही फारसे नवीन नाही; पण तरीही 'हात दे हात दे' आणि 'देवकीचा कान्हा, यशोदेचा कान्हा' ही दोन गाणी जमली आहेत.

आजकाल मराठी सिनेमाही लावणीचं स्टेज आणि खेडेगाव याची चौकट सोडून जरा गोव्याबिव्यातनं फिरून यायला लागलाय. 'देवघर'ही याला अपवाद नाही. या प्रसंगातलं बाह्यचित्रणही उल्लेखनीय आहे. तसंच मराठी सिनेमातली नायिका नऊवारीतून पाचवारी, पाचवारीतून पंजाबी ड्रेस असे बदल होता होता 'देवघर'च्या नायिकेनं मिडीपर्यंतची मजल गाठली आहे. (अर्थात शेवटी नऊवारी साडी नेसून नवऱ्याला लाजत लाजत 'अहो' अशी हाक मारत ती पहिले पाढे पंचावन्नसारखी मूळ पदावर जाते ही गोष्ट अलाहिदा).

ही कथा आहे खरी आबा वैद्याची; पण अनेक पात्रांमुळे आबाच्या व्यक्तिरेखेला उठाव मिळत नाहीच; पण इतरही कुठल्या पात्राची जडणघडण व्यवस्थितपणे साकार होत नाही. याचा परिणाम कलावंतांच्या अभिनयावर झाल्याचं दिसून येतं. चंद्रकांत गोखले यांनी आपली भूमिका नेहमीच्या सफाईनं वठवली आहे; पण काही काही ठिकाणी लेखनच कमी पडल्याने चंद्रकांत गोखले यांचा नाइलाज झालाय. रवींद्र आणि रंजना यांना फारसा वाव नाहीच. (पण तरीही मागच्या रांगेत बसलेल्या बाळघाने 'बाबा, हिचा चेहरा सारखा असा (म्हणजे चिडका) का हो?' असा प्रश्न विचारून बाबाची भलतीच पंचाईत करून टाकली.) कॉमेडियनच्या भूमिकेत धमाल उडवणाऱ्या अशोक सराफनं या सिनेमात मात्र अगदीच निराशा केलीय. मराठी सिनेमातल्या खलनायकाला अशोक सराफ काही तरी नवीन दिशा देईल असं वाटत होतं; पण तसं होत नाही. जिकडे तिकडे भाडणं लावणारा मामा दाखवण्यासाठी काड्या ओढायला लावायची कल्पना अगदीच पोरकट आणि जुनाट वाटते. वत्सला देशमुख आणि पद्मा चव्हाण याच्या अभिनयाविषयी नव्यानं लिहिण्यासारखं काही नाही.

अर्थात आपल्या सिनेमातील या दोषांची खेबूडकराना पूर्ण कल्पना आहे. ते या चुका मान्यही करतात. अनुभवातून या चुका दूर होतील असही ते सागतात आणि खेबूडकरांसारख्या संवेदनाशील कवि–लेखकाला त्यात अशक्य काहीच नाही. त्यामुळे खेबूडकर मराठी सिनेमाला नवीन दिशा निश्चित दाखवतील, अशी अपेक्षा करायला काहीच हरकत नाही.

¤

## 'प्रभात'चा आदर्श

**प्रश्न :** गीतलेखनातून निर्मितीकडेच कसे काय वळलात?

**खेबूडकर :** त्याचं असं झालं–मी २३ वर्षे गीतलेखक म्हणून चित्रपटव्यवसायात आहे आणि जवळजवळ २०० च्या वर गाणी मी

लिहिली. इतकी वर्षं एकाच क्षेत्रात राहिल्यानंतर दुसऱ्या क्षेत्रातही आपण काही तरी करावं असं वाटत होतं.शिवाय money making चा उद्देशही होताच. त्यामुळे मी निर्मितीकडे वळायचं ठरवलं. माझ्याकडे अनेक चांगली चांगली कथाबीजं होती आणि आपल्या मनातल्या कल्पनेवर आपणच चित्रपट काढावा असं बऱ्याच दिवसांपासून मनात घोळत होतं; पण चित्रपटनिर्मितीसाठी आवश्यक तेवढा पैसा हातात नसल्यानं माझे हात बांधलेले होते; पण त्याच सुमारास महाराष्ट्र बँकेने 'सिंहासन'ला कर्ज दिल्याचं मला कळलं. ते कळल्यानंतर चित्रपट निर्माण करण्याच्या योजनेनं परत उचल खाल्ली आणि मी महाराष्ट्र बँकेकडे कर्ज मिळवण्याची धडपड सुरू केली. आधी मी 'चंद्रमुखी' ही कथा निवडली होती; पण बँकेतर्फे 'देवघर'ला जास्त response मिळेल म्हणून 'देवघर'वर चित्रपट काढण्याची सूचना मिळाली. त्याप्रमाणे मी सिनेमा काढला.

: सिनेमा काढायचं ठरवलं तेव्हा कोणाचा आदर्श डोळ्यांसमोर होता?

: व्ही. शांतारामच्या प्रभातपरंपरेचा आदर्श माझ्यापुढे होता. प्रभातपरंपरेला जागून सिनेमातून सामाजिक आशय मांडायचा मी प्रयत्न केलाय.

: आपण जेव्हा एखाद्या वेगळ्या क्षेत्रात जातो, तेव्हा त्या क्षेत्रात काही तरी 'वेगळे' करायची ईर्षा असते. मग 'देवघर'मध्ये काही वेगळेपण का जाणवत नाही?

: मराठी निर्मात्याच्यापुढची सगळ्यात महत्त्वाची अडचण असते ती पैशाची. सिनेमासाठी मला आलेला खर्च कसा काय भरून निघेल? याचा विचार तो पहिल्यांदा करेल. कारण नाही तर पहिल्याच सिनेमात बुडल्यानंतर तो निर्माता कशाच्या बळावर पुढे उभा राहील? साहजिकच मीही हाच विचार केला आणि अशा परिस्थितीत लोकांना आवडेल असाच विषय घेतला. या चित्रपटाचा विषय परंपरेतला आहे ही गोष्ट मी मान्य करतो; पण त्यातही मी विशिष्ट मूल्ये जतन केली आहेत. ताई–भाऊ, आईवडील–मुलं यांच्यातलं प्रेम हे काल होतं, आज आहे आणि उद्याही असेल. मग तो कथेचा विषय का होऊ शकणार नाही? मी स्वतः चिरंतर चांगल्या गोष्टींचा भोक्ता आहे. त्यामुळे मी या चित्रपटातही खेड्यात जायला तयार नसणाऱ्या तरुणांना एक प्रकारचं आवाहनच केलं आहे. तसंच नव्या प्रवाहात खपतील असे विषय माझ्याकडे नाहीत, अशातला भाग नाही. असे विषय आताही माझ्याजवळ आहेत. त्यावर सिनेमा काढायची इच्छा आहे; पण आता एवढ्यात नाही. योग्य वेळ येताच मी ते करीन.

: हा चित्रपट अगदी कल्पनेबरहुकूम उतरला आहे का?

: अजिबात नाही.माझ्या कल्पनेतले किती तरी प्रसंग चित्रपटातून गळले आहेत आणि हे प्रसंग त्यात असते तर चित्रपट निश्चितच आणखी उंची गाठू शकला असता. त्यामुळे मी तर म्हणेन की, जेमतेम ५० टक्के चित्रपट माझ्या कल्पनेप्रमाणे उतरला.

: चित्रपट ठरलेल्या बजेटातच पूर्ण झाला का?

: नाही. तसा अगदी ठरलेल्या बजेटात पूर्ण अशक्यच. कारण आयत्या वेळेस किती तरी नवीन प्रश्न समोर उभे राहतात. आम्ही साधारण ८–८॥ लाखांचं बजेट धरलं होतंच. त्यानुसार ५॥ लाख मला महाराष्ट्र बँकेकडून मिळाले. २–२॥ लाख मी उभे केले; पण सिनेमा पूर्ण होऊनही कित्येक दिवस थिएटर मिळत नसल्याने एकीकडे व्याज मात्र वाढत गेलं आणि दुसरीकडे तितक्या दिवसांचं भाडं बुडत गेलं अशी चमत्कारिक परिस्थिती निर्माण होत गेली आणि परिणामी बजेट फुगत गेलं.

: कथा-पटकथा-संवाद-गीतं आणि निर्मिती याबरोबरच दिग्दर्शनही आपणच करावं असं नाही का वाटलं?

: होय–पहिल्यांदा मीच दिग्दर्शन करणार होतो; पण इतक्या सगळ्या आघाड्या सांभाळता सांभाळता दिग्दर्शनाकडे तितक्या बारकाईनं लक्ष द्यायला जमणार नाही; असं वाटून आणि या बाबतीत इतरांचा सल्ला घेऊन मी दिग्दर्शनाची जबाबदारी घेतली नाही; पण पुढच्या चित्रपटाचं मात्र दिग्दर्शन मीच करणार आहे.

: समजा, देवघर पडलाच, तर ती जबाबदारी कुणाची?

: अर्थातच दिग्दर्शकाची. दिग्दर्शनाच्या बाबतीत मला अजिबात समाधान नाही!

: पुढचे काय प्लॅन्स आहेत?

: याच्यापुढचा सिनेमा संगीत – नृत्याच्या पार्श्वभूमीवरचा घेणार आहे. 'पिंजरा', किंवा आता अलीकडे लागलेला 'शंकराभरणम्'या चित्रपटातल्यासारखी treatment या चित्रपटाच्या कथेला मी दिली आहे.

—शुभदा रानडे

---

## बातम्या अशाही

मीना कर्णिक

---

### □ पीएच. डी. चा मोबदला

स्त्रीच्या शरीराची किंमत काय? "पीएच. डी. ची डिग्री!" असं उत्तर लखनौ विद्यापीठाचे एक प्राध्यापक करतील. देतील म्हणण्यापेक्षा, त्यांच्या एका विद्यार्थीनीला त्यांनी हेच सांगितलं.

श्रीमती उषा सक्सेना तशा पहिल्यापासून हुशारच. बी. ए. ला पहिल्या वर्गात उत्तीर्ण झाल्यावर त्यांनी एम. ए. साठी लखनौ विद्यापीठाच्या हिंदी शाखेत प्रवेश घेतला. त्यांचा विषय होता 'भाषाशास्त्र'. साधारण १९६८ सालची ही गोष्ट. त्या वेळी उषा सक्सेनांचं लग्न झालेलं नव्हतं.

एक दिवस बोलता बोलता 'त्या' प्राध्यापकाने सक्सेनांना म्हटलं, "तुम्ही कशाला अभ्यासात एवढा वेळ वाया घालवताय? माझ्या घरी एकदा या. तुम्हाला पहिल्या वर्गातच नव्हे तर विद्यापीठात पहिली आणतो!" त्यांच्या बोलण्याचा अर्थ न समजण्याइतक्या उषा सक्सेना दुधखुळ्या निश्चितच नव्हत्या. तरीही वरवर त्यांनी याकडे दुर्लक्ष केलं; पण प्रोफेसरांना आपला हेतू विसरायचा नव्हता. परत एकदा ह्याविषयी बोलताना त्यांनी सांगितलं, "घाबरू नका. तुमच्याआधी कित्येक मुलींनी या प्रकारे पहिल्या वर्गात पदवी मिळवलीय. तेव्हा आपण नवीन काही करणार आहोत या जाणिवेने अजिबात बावचळून जाऊ नका."

उषा सक्सेना तशा खंबीरच. त्यांनी प्राध्यापकांच्या वक्तव्यांना जरादेखील किंमत दिली नाही आणि याचा व्हायचा तोच परिणाम झाला. आयुष्यात प्रथमच सक्सेनांचा पहिला वर्ग चुकला! पहिल्या वर्गासाठी त्यांना केवळ दोन मार्क कमी पडले होते;

पण यामुळे त्या बावचळून गेल्या नाहीत. त्यांनी पीएच्. डी. ला प्रवेश घेतला. मात्र या वेळी त्यांनी आपला गाईड बदलला. दुसऱ्या प्राध्यापकांच्या देखरेखीखाली त्यांनी आपला थिसिस लिहायला सुरुवात केली.

थिसिस लिहून पुरा झाल्यावर चार वर्षं तो नव्या प्राध्यापकांच्या टेबलवर तसाच पडून होता. नंतर चौकशी केल्यावर कळलं की, 'त्या' प्राध्यापकाने उषा सक्सेनांना त्रास द्यायचा चंगच बांधला होता. त्याने या नवीन प्राध्यापकांवर दडपण आणून जबरदस्तीने तो थिसिस वाचायला बंदी केली होती.

या त्रासाला कंटाळून श्रीमती सक्सेनांनी संबंधित अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार नोंदवली. त्याचा काही उपयोग झाला नाही. विद्यापीठाच्या कुलगुरूंकडे असंख्य फेऱ्या मारल्यावर त्यांना गाईड बदलून मिळाला. १९७५ साली उषाताईंनी परत आपला थिसिस लिहिला; पण प्राध्यापकमहाशयांनी अजूनही त्यांची पाठ सोडली नव्हती. या ना त्या मार्गाने त्याने सक्सेनांचे सर्व परीक्षक विद्यापीठाबाहेरचे असतील अशी व्यवस्था केली. तीन परीक्षकांपैकी दोघांनी तो थिसिस वाचायलाच नकार दिला. तिसरे परीक्षक मात्र चांगले निघाले. त्यांना उषा सक्सेनांचं लिखाण अतिशय आवडलं; पण त्यांच्या एकट्याच्या आवडीमुळं काय होणार ?

विद्यापीठाने परत तीन परीक्षक नेमले. यात हे चांगले परीक्षक, सक्सेनांचे गाईड यांचा समावेश होता. याची बातमी प्राध्यापकसाहेबांना लागताच त्यांनी ताबडतोब त्या परीक्षकाला आपल्या घरी लखनौला बोलावलं. काहीही कारण नसताना पार्टी दिली. याचा परिणाम म्हणून सुरुवातीला चांगल्या स्वभावाचे वाटणारे ते परीक्षक फिरले. थिसिसवरचा अहवाल त्यांनी विद्यापीठाकडे पाठवलाच नाही ! वारंवार विद्यापीठाकडून विचारणा होत असतानाही त्यांनी चालढकल केली. १९८० च्या जुलैमध्ये अखेर विद्यापीठाने त्या परीक्षकाला निर्वाणीचा इषारा दिला, तेव्हा कुठे त्यांनी आपला अहवाल सादर केला; पण त्यात थिसिसविषयी चांगलं काहीच नव्हतं. 'आधीचे दोन परीक्षक बदलायची वेळ विद्यापीठावर का आली ?' असाच प्रश्न त्यांनी विद्यापीठाला विचारला.

उषा सक्सेना अजूनही पीएच. डी. झालेल्या नाहीत. अनेक वेळा जबाबदार व्यक्तींकडे तोंडी, लेखी तक्रार करूनही काहीच झालं नाही. गेली चौदा वर्षं उषा सक्सेना मानसिक त्रास, अपमान सहन करताहेत. केवळ त्यांनी आपल्या प्राध्यापकांची शय्यासोबत न करण्याचा निर्णय घेतला म्हणून !

ही झाली एक घटना. आज अशा किती तरी उषा सक्सेना सापडतील ! 'बायकांची ही अशी विटंबना आणखी किती वर्षं चालणार आहे' असे प्रश्न विचारूनसुद्धा आता बरीच वर्षं झाली. परिस्थिती मात्र अजून जैसे थेच आहे ! □

## सर्चलाइट

अमृत पुरंदरे

# शास्त्रज्ञांना सापडलेली 'सिंड्रेला' : टिटॅनियम

टिटॅनियम हा तसा गेली १५० वर्षं माहीत असलेला धातू आहे. पृथ्वीवर उपलब्ध असणाऱ्या मूळ घटकांमध्ये याच्या साठ्याचा नववा क्रमांक लागतो. जस्त, तांबे, शिसे इ. धातूंपेक्षा हा विपुल प्रमाणात सापडतो. मग एवढे असून आत्ताच एकदम शास्त्रज्ञांना याचा एवढा का पुळका आला ? त्याचे कारण, पूर्वी शुद्ध टिटॅनियम बनवायची पद्धतच माहीत नव्हती. त्यामुळे त्याचे अनेक सुप्त गुण नजरेसमोर आले नाहीत आणि म्हणूनच मी या धातूला 'सिंड्रेला' अशी उपमा दिली.

शुद्ध टिटॅनियम धातू हा चकचकीत स्टेनलेसस्टीलसारखा दिसतो; परंतु तो स्टीलच्या निम्म्यापेक्षा थोडा जास्त जड आहे.तो लोखंडापेक्षा बराच हलका, अॅल्युमिनियमपेक्षा बराच ताकदवान आणि जवळजवळ प्लॅटिनमइतका गंजण्याला विरोध करणारा आहे. म्हणजे जवळजवळ सर्व धातूंमधले चांगले गुण याच्यात आहेत. याची तुलना करायची तर ऑलिंपिकमधल्या डेकेथलॉन चॅंपियनबरोबरच करावी लागेल. मग एवढे असून हा धातू मोठ्या प्रमाणावर का वापरला जात नाही?

त्याचे एक कारण मी वर दिले ते म्हणजे हा शुद्ध स्वरूपात मिळण्यासाठी येणाऱ्या अडचणी आणि त्यामुळेच वाढलेली किंमत. हा धातू स्टीलइतका स्वस्त मिळणे कधीच शक्य नाही. परंतु त्याचे कमी वजन व जास्त ताकद यामुळे त्याचा उपयोग अनेक ठिकाणी म्हणजे बॉलपॉइंटपासून ते इंजिने व विमानाचा सांगाडा बनवण्यापर्यंत होऊ शकतो.

टिटॅनियम हा तसा 'नवीन' धातू आहे. कारण त्याचे शुद्धीकरण नुकतेच शक्य झाले आहे. अजूनही त्याचे उत्पादन प्रायोगिक अवस्थेतच आहे.

हा धातू शुद्ध स्वरूपात भारतात बनत नाही. आपल्या प्रयोगशाळांना तो अवाच्यासवा किंमत मोजून परदेशातून आणायला लागतो; परंतु या धातूचे अतिशय मोठे साठे भारतात आहेत. केरळमध्ये त्रावणकोरला हा धातू थोरियमबरोबर ऑक्साइडच्या स्वरूपात सापडतो. हे टिटॅनियम डाय ऑक्साइड खाणीमध्ये काळ्या स्वरूपात असते.

या टिटॅनियम डाय ऑक्साइडवर ($TiO_2$) काही प्रतिक्रिया केली की ते अतिशय स्वच्छ पांढरे बनते. याचा उपयोग पांढरा रंग बनवण्यासाठी करतात. आज भारतातले नव्वदपेक्षा जास्त टक्के टिटॅनियम हे रंगामध्ये वापरले जाते.

$TiO_2$ वापरून बनलेला रंग हा सर्वांत पांढरा रंग. याच्यापेक्षा पांढरा रंग बनवताच येत नाही. लिथोपोन किंवा झिंकऑक्साइड ही रंगद्रव्ये (Pigments) पूर्वी पांढरा रंग बनवण्यासाठी वापरली जात. परंतु $TiO_2$ नी या सर्वांची सुट्टी करून टाकली. कारण त्याची पृष्ठभाग झाकण्याची क्षमता लिथोपोनपेक्षा पाचपट जास्त आहे. तसेच त्याची भुकटी अतिशय बारीक असते. काही प्रमाणात तो गंजण्यालासुद्धा विरोध करतो. तसेच पाण्याला, अॅसिडला आणि अल्कलीलासुद्धा तो चांगलाच विरोध करतो. यापैकी कोणाचाच त्याच्यावर काहीही परिणाम होत नाही. सूर्यप्रकाशामुळे तो लवकर पिवळा पडत नाही इ. अनेक गुण असल्यामुळे, तसेच याची दुसरे रंग फिके करण्याची ताकद (Tinting Strength) सुद्धा जास्त असल्यामुळे आज तरी $TiO_2$ ला रंगाच्या व्यवसायात पर्याय नाही.

इलेम्नाइट आणि रूटाइल ही टिटॅनियमची दोन महत्त्वाची खनिजे आहेत. अमेरि-

केत इलेम्नाइटचे प्रचंड साठे आहेत. भारतात रूटाइलचे साठे आहेत. हे साठे बाहेर काढणे सोन्यासारखे अजिबात त्रासाचे नाही परंतु त्याचे शुद्धीकरण मात्र कर्मकठीण आहे.

हा धातू वितळवल्यानंतर हाताळणे अतिशय अवघड आहे. कारण तो उच्च तपमानाला एकदम अॅक्टिव्ह बनतो, आणि वेड्यासारखा ऑक्सिजन आणि नायट्रोजन खेचून घेतो. या वायूचे प्रमाण १ टक्क्यापेक्षा जास्त झाले तरी या धातूचा लवचिकपणा नष्ट होतो. त्यामुळे धातू बनवायच्या प्रत्येक क्रियेमध्ये हवेपासून सरक्षण द्यावे लागते. तेवढ्यासाठी सर्व प्रक्रिया ही वायूविरहित किंवा इनर्टगॅसेस (उदा. हेलियम, आर्गॉन) वापरून करावी लागते. तपमानाचा समतोल सुद्धा अतिशय काळजीपूर्वक साधावा लागतो. कारण जर का तपमान १६०० फॅ. पेक्षा जास्त झाले तर टिटॅनियम ही प्रक्रिया चालू असलेल्या मुशीवरच हल्ला करतो आणि त्यामुळे मुशीच्या बाजू विरघळून जातात. तपमानावर नियंत्रण करणेसुद्धा अतिशय अवघड आहे. कारण शुद्धीकरणाच्या क्रियेत जी रसायने वापरतात. त्यांच्याशी झालेल्या प्रक्रियेतून प्रचंड उष्णता तयार होते. बरं, एवढी उष्णता झाली तर झाली; ती काढून घेण्यासाठी म्हणून काही करायला जावे तर हा धातू उष्णतेचा मंदवाहक आहे. त्यामुळे एका वेळेला मोठ्या बॅचेस बनवणे अशक्य आहे याचमुळे हा धातू अजूनही मोठ्या प्रमाणावर बनवता येत नाही. या धातूचा विलयबिंदू ही आणखी एक मोठी कटकट आहे. ३१४०° फॅ. ला टिटॅनियम वितळते. पण ते वितळले की लगेच हवेतील ऑक्सिजन शोषून घेते. त्यामुळे ही क्रियासुद्धा संपूर्णपणे निर्वात अवस्थेत करावी लागते आणि याचमुळे या धातूच्या निर्मितीचा खर्च अफाट झाला आहे.

अशा समस्यांवर शास्त्रज्ञ बरेच संशोधन करत आहेत. त्यात एक नवीन शोध शास्त्रज्ञांनी लावला आहे. जर का टिटॅनियम तांब्याच्या गोल मुशीमधे वितळवले तर ते मुशीवर प्रक्रिया करत नाही. ही मूस मात्र सतत थंड ठेवायला लागते. अशा थंड मुशीमध्ये टिटॅनियमचा रस, ज्याप्रमाणे राजहंसाच्या पंखावरून पाणी ओघळून जाते त्याप्रमाणे न चिकटता रहातो.

एकदा का हा धातू बनला की मग त्याची तार काढणे, पत्रे बनवणे, गज बनवणे, नळ्या बनवणे इ. कामे व्यवस्थित करता येतात. परंतु टिटॅनियमची अॅलॉइज (धातुमिश्रणे) ही जास्त महत्त्वाची आहेत. यातली काही शुद्ध टिटॅनियमपेक्षा किंवा स्टील आणि लोखंडापेक्षा उच्च प्रतीची आहेत.

टिटॅनियम धातूचा सर्वात मोठा उपयोग विमानउद्योगाला होणार आहे. कारण अॅल्युमिनियम व मॅग्नेशियम हे जरी हलके असले तरी ३५० फॅ. या तपमानाला त्यांची ताकद बरीच कमी होते. त्यामुळे सध्याच्या अतिवेगवान विमानात स्टीलचा जास्त वापर होत आहे. परंतु प्रत्येक पौंड वजनवाढीला विमानाच्या इंधनाचा जो खर्च वाढतो तो जवळजवळ २५०० रुपयांच्या घरात जातो. टिटॅनियम या खर्चात नक्कीच मोठी बचत करेल.

टिटॅनियमचा दुसरा गुणधर्म म्हणज उष्णतेमुळे होणाऱ्या आकुंचन-प्रसरणाला विरोध करणे त्यामुळे जिथे उच्च तपमानाला आणि कमी तपमानाला अचूक मापे घ्यावयाची असतात त्या ठिकाणी या धातूचा उपयोग होऊ शकतो. त्याच्या अति टणकपणामुळे कापडगिरण्यांमध्ये सुताच्या चात्यांसाठी याचा उपयोग होऊ शकेल.

माणसाच्या शरीरातले एखादे हाड निकामी झाले तर त्या ठिकाणी स्टीलचे हाड बसवतात. त्याच्याऐवजी जर टिटॅनियम वापरले तर त्याच्या हलकेपणाचा फायदा मिळू शकेल.

टिटॅनियमवर कोणत्याही थंड किंवा गरम अॅसिड किंवा अल्कलीची प्रक्रिया होत नाही. त्यामुळे अनेक रासायनिक कारखाने, टिटॅनियमचा विचार करू लागले आहेत.

अमेरिकन नेव्ही, एक संपूर्ण युद्धनौका टिटॅनियमची बनवण्याच्या विचारात आहे. कारण मिठाच्या पाण्याचा या धातूवर काही परिणाम होत नाही असे लक्षात आले आहे. एका प्रयोगात टिटॅनियम, स्टील, प्लॅटिनम, लोखंड, तांबे, जस्त, या धातूंचे पत्रे समुद्राच्या पाण्यात निम्मे बुडवून ठेवले आणि दोन महिने सतत खाऱ्या पाण्याचा फवारा त्यांच्यावर केला. दोन महिन्यानंतर टिटॅनियम व प्लॅटिनम सोडल्यास सर्व पत्रे गंजलेले आढळले. गंमत म्हणजे टिटॅनियमचा पत्रा दोन्ही बाजूनी इतका चकचकीत होता की नेमक्या कोणत्या बाजूला फवारा मारला हेच कळू शकले नाही !

टिटॅनियमचा उपयोग इलेक्ट्रॉन बीम स्पेक्ट्रोस्कोपमध्ये स्टॅंडर्ड म्हणून केला जातो. थोडक्यात सागायचे झाले तर याच्या उपयोगांना चिक्कार वाव आहे. प्रश्न येतो तो फक्त किमतीचा व बनवण्याच्या पद्धतीचा; परंतु या सिंड्रेलाचा मोह शास्त्रज्ञ केवळ एवढ्या कारणासाठी सोडणार नाहीत. अॅल्युमिनियम हे विमान, मोटारी या उद्योगात मोठ्या प्रमाणावर वापरले जाईल असे कोणाच्या स्वप्नातसुद्धा आले नसते; परंतु विजेचा उपयोग करून अॅल्युमिनियम बनवायची स्वस्त पद्धत सापडली आणि हा धातु म्हणजे वेगवेगळ्या उद्योगांचा एक अविभाज्य घटक बनला. त्याचप्रमाणे टिटॅनियमच्या बाबतीत काही किमया घडेल आणि त्याला सुद्धा चांगले दिवस येतील, अशी आपण आशा करू या. □

---


# डॉ. चंद्रशेखर

– सर सी. व्ही. रामन यांचा हा मुलगा.

– चीनमधे हिंडताना ते चक्रावून जातात. चिनी तरुणी चिनी भाषेत सर सी. व्ही. रामन यांच्या संशोधनावर काम करतात पण रामन यांच्या मातृभाषेत रामन अजून समजावूनही देता देता येत नाहीत ही त्यांची खंत आहे.

# पेकींग ते टिंबकटू

**डॉ. चंद्रशेखर यांची**

**डॉ. दाभोळकर यांनी घेतलेली मुलाखत**

**माणूस पुढील अंकी**

MANOOS ( Marathi Weekly ) 1.50 Paise Regd No. PNC-W 28
( Licensed to post without prepayment of postage-No. 11 )

# तीन वर्षांची वर्गणी एकदम भरल्यास

‘ माणूस ’ साप्ताहिकाची वार्षिक वर्गणी रुपये पन्नास आहे. या वर्गणीत दिवाळी अंक वर्गणीदारांना दिला जातो. शिवाय वर्षातून निघणारा एकाद-दुसरा विशेषांकही.

पोस्टाचे दर भरमसाठ वाढले आहेत.

वार्षिक वर्गणीदारांप्रित्यर्थ होणारा टपाल व इतर कार्यालयीन खर्च वाचविण्यासाठी तीन वर्षांची वर्गणी एकदम पाठवून सगळ्यांचाच त्रास थोडा कमी करणे शक्य आहे.

# सप्रेम भेट

आपण आपली वर्गणी संपेपर्यंत वाट न पाहता ३ वर्षांची वर्गणी चालू किंवा जुलै महिन्यातच पाठवणार असाल तर एक नवी कोरी करकरीत पुस्तकभेट आपल्याला आम्ही देऊ शकू

# पटक आणि पटकार

**लेखक : संदीप पाटील**
**रवी शास्त्री**

**आदित्य प्रकाशन, मुंबई**

**किंमत : पंचवीस रुपये**

ही पुस्तकभेट पाठविण्याचा खर्च मात्र आम्ही करू शकणार नाही !

जून-जुलै महिन्यात ३ वर्षांची १५० रुपये वर्गणी भरणाऱ्यांनी वरील पुस्तक माणूस कार्यालयातून १ जुलै नंतर घेऊन जावे किंवा फक्त टपाल-पाठवणी खर्चाची व्ही. पी. केली जाईल, ती सोडवून घ्यावी.

## आपणास ही पुस्तकभेट नको असल्यास

## आपण सरळ एकशे पंचवीस रुपये पाठवा

तीन वर्षांची वर्गणी एकदम भरल्यास ही पंचवीस रुपयांची सूट आहे. ही सूट-सवलतही फक्त ३१ जुलैपर्यंत !

**साप्ताहिक माणूस १०२५ सदाशिव, पुणे ३०.**